रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८९ | अंक २०९ | पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

# कृषीवल

रायगड, सोमवार, दि. ५ जानेवारी २०२६
किंमत ४ ₹

## सिडकोच्या भूखंडासाठी संघर्ष

**चिरनेर :** सिडकोकडून संपादित करण्यात आलेल्या जमिनीच्या बदल्यात मिळणाऱ्या साडेबारा टक्के भूखंडासाठी गेली आठ ते नऊ वर्षे न्यायासाठी झगडणाऱ्या प्रकल्पबाधित शेतकरी कुटुंबातील कमल अरुण मुंबईकर आजही न्यायाच्या प्रतीक्षेत आहेत. सिडकोकडून प्रशासनाच्या कथित भ्रष्टाचारामुळे त्यांच्या वडिलांची संचिका गहाळ झाल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला आहे. नवी मुंबईतील कोपरीपाडा सेक्टर २६, वाशी येथील रहिवासी कै. बाळकृष्ण काळू भोईर यांची सुमारे पाच ते साडेपाच एकर जमीन सिडकोने पान २ वर

## महामार्गावर बर्निंग कारचा थरार


**मुंबई :** मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील खेड-चिपळूणदरम्यान एक्सेल फाटा परिसरात रविवारी पहाटे धावत्या कारला अचानक आग लागल्याची थरारक घटना घडली. पहाटे सुमारे पाचच्या सुमारास गोव्याच्या दिशेने जाणारी मारुती एर्टिगा कार महामार्गावरील दुभाजकावर आदळली. अपघातानंतर काही क्षणातच कारने पेट घेतल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. प्राथमिक माहितीनुसार, कार चालकाला डुलकी आल्यामुळे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि कार थेट दुभाजकावर आदळली. अपघातानंतर कारच्या पुढील भागातून अचानक धूर पान २ वर

# मापगाव येथे सशस्त्र दरोडा

- पेट्रोल ओतून जीवे मारण्याची धमकी
- २० लाखांचा ऐवज लुटला
- चिमुकल्याचे अपहरण करुन पाथरे कुटुंबाला बांधून ठेवले

**। रायगड । प्रतिनिधी ।**

**रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यात मापगाव-मुशेत परिसरात शनिवारी (दि.३) मध्यरात्री थरारक आणि अंगावर काटा आणणारा सशस्त्र दरोडा पडल्याने संपूर्ण परिसर हादरून गेला आहे. कुक्कुट खाद्यनिर्मिती कंपन्यांमध्ये अग्रेसर असलेल्या कुकूचकू कंपनीचे मालक दिलीप पाथरे यांच्या बंगल्यावर तब्बल नऊ सशस्त्र दरोडेखोरांनी फिल्मीस्टाईल दरोडा टाकत २० लाख रुपयांचा ऐवज लुटला. दरोड्यादरम्यान कुटुंबियांवर पेट्रोल ओतून जाळण्याची धमकी देण्यात आली, तर चिमुकल्या आयानला हत्याराच्या धाकाने घराबाहेर नेऊन कुटुंबाला अक्षरशः मृत्यूच्या छायेत ठेवण्यात आले.**





शनिवारी रात्री साडेबारा वाजण्याच्या सुमारास दरोडेखोरांनी बंगल्याच्या मागील बाजूस असलेल्या वॉल कंपाऊंडवरील तारेचे कुंपण तोडून प्रवेश केला. स्लायडिंग विंडो उघडून लोखंडी ग्रीलचे कुलूप आणि कडी कोयंडा तोडत त्यांनी घरात घुसखोरी केली. विशेष म्हणजे, बंगल्याच्या आवारात श्वान मोकळे असतानाही कोणताही आवाज न होता हा धाडसी दरोडा टाकण्यात आला. पाथरे यांच्या बंगल्यामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे आहेत. परंतु, घराच्या मुख्यद्वारावरच हे कॅमेरे आहेत. आणि, तेदेखील बंद अवस्थेत आहेत. यामुळे दरोडेखारांचे फावले असल्याची चर्चा आहे.

घरात प्रवेश करताच दरोडेखोरांनी चिमुकल्या आयान पाथरेला शस्त्राचा धाक दाखवत बाहेर नेले आणि मोबाईलवरून घरातील साथीदारांशी संपर्क साधला. त्यानंतर मुख्य दरवाजा आतून बंद करून कटावणी अडकवण्यात आली. झोपेत असलेल्या कुणाल पाथरे व त्यांच्या पत्नी विनिता पाथरे यांना शस्त्रांच्या धाकात ठेवून त्यांच्या अंगावर पेट्रोल ओतण्यात आले. दरम्यान, कुणाल पाथरे यांनी विरोध करण्याचा प्रयत्न केला, मात्र दरोडेखोरांपुढे त्यांचे काही चालले नाही. उलट, दरोडेखोरांनी त्यांना मारहाण केली.

> अलिबाग तालुक्यातील मापगाव-मुशेत येथे झालेल्या सशस्त्र दरोड्याचा तपास सुरू आहे. या गुन्ह्यात सहभागी असलेल्या काही आरोपींना ताब्यात घेतले असून, उर्वरित आरोपींचा शोध युद्धपातळीवर सुरू आहे. लवकरच हा गुन्हा उघड केला जाईल.
> – आंचल दलाल, जिल्हा पोलीस अधीक्षक, रायगड

हळूहळू घरातील सर्व सदस्यांना शस्त्राचा धाक दाखवून उठवले. दिलीप पाथरे आणि त्यांच्या पत्नी माधवी यांनीदेखील दरोडेखोरांना प्रत्युत्तर केले; परंतु या झटापटीत माधवी पाथरे यांच्या हाताला चाकू लागून गंभीर जखम झाली, तर दिलीप पाथरेंनाही बेदम मारहाण करत त्यांच्या अंगावर पेट्रोल ओतण्यात आले. "तिजोरी, दागिने आणि पैसे त्वरित काढा, अन्यथा आयानला ठार मारू," अशी अमानुष धमकी पान २ वर

## वेधक

### हत्येतील आरोपींना पोलीस कोठडी

**सोलापूर :** सोलापुरातील मनसे पदाधिकारी बाळासाहेब सरवदे यांच्या हत्या प्रकरणातील ११ आरोपींना चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. माजी नगरसेविका शालन शिंदे यांचे पती शंकर शिंदेसह ११ आरोपींना ही पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. राजकीय वादातून मनसे पदाधिकारी बाळासाहेब सरवदे यांची शुक्रवारी संध्याकाळी हत्या झाली होती. या हत्या प्रकरणात एकूण १५ आरोपीवर पोलिसांनी गुन्हे नोंदवले होते. माजी नगरसेविका शालन शिंदेसह चार आरोपींना या आधीच पोलिसांनी अटक केली असून, ते पोलीस कोठडीत आहेत. उर्वरित ११ आरोपींना पोलिसांना रविवारी अटक करून न्यायालयात हजर केलं असता त्यांना ८ जानेवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. सोलापुरातील जोशी गल्ली, रविवार पेठ परिसरात निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर झालेल्या वादातून बाळासाहेब पांडुरंग सरवदे याची तलवार व कोयत्याने वार करून निर्घृण हत्या केली होती.

### खाणीत स्फोट, दोन मजूर ठार

**नवी दिल्ली :** ओडिशामधील ढेंकनाल जिल्ह्यातील मोटांगा पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या गोपालपूर गावाजवळील एका दगडाच्या खाणीत शनिवारी रात्री उशिरा भीषण स्फोट झाला. या स्फोटामुळे खाणीचा काही भाग कोसळून दोन मजुरांचा मृत्यू झाला, तर अनेक मजूर ढिगाऱ्याखाली अडकल्याची भीती व्यक्त केली जात आहे. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे. घटनेची माहिती मिळताच ओडापाडा तहसीलदार आणि मोटांगा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ अधिकारी पथकासह घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी सुरक्षेच्या कारणास्तव संपूर्ण परिसर सील केला असून, नागरिकांना प्रवेशावर बंदी घातली आहे. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, या खाणीला ब्लास्टिंगसाठी परवानगी नसल्यामुळे ८ सप्टेंबर २०२५ रोजीच खाण बंद करण्याचे आदेश देण्यात आले होते.

## २० लाखांची सुपारी, पुणे कनेक्शन उघड

### काळोखे हत्या प्रकरणाचा पर्दाफाश

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

खोपोली शहरासह संपूर्ण रायगड जिल्हा आणि महाराष्ट्र राज्याला हादरवून टाकणाऱ्या नगरसेविका मानसी काळोखे यांचे पती मंगेश काळोखे यांच्या निर्घृण हत्येप्रकरणी रायगड पोलिसांनी मोठा खुलासा केला आहे. ही हत्या तब्बल २० रुपयांच्या सुपारीतून करण्यात आल्याचे पोलीस तपासातून स्पष्ट झाले असून, या गुन्ह्याचे पुणे कनेक्शन समोर आले आहे.

रायगड पोलीस अधीक्षक आचल दलाल यांनी दिलेल्या माहितीनुसार, या हत्येचा मुख्य सूत्रधार रवींद्र देवकर असून, त्याने इशा पापा शेख हिच्यामार्फत कॉन्ट्रॅक्ट किलरना सुपारी दिली होती. आदिल मुखत्यार शेख, खालीद खलिल कुरेशी आणि एका फरार आरोपीला मिळून २० लाख रुपयांची सुपारी देण्यात आल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. आर्थिक व्यवहार, मोबाईल कॉल डिटेल्स आणि आरोपींच्या जबाबांच्या आधारे हा संपूर्ण कट उघडकीस आला आहे.



पोलीस तपासानुसार ही हत्या पूर्णतः पूर्वनियोजित होती. आरोपींनी अनेक दिवस मंगेश काळोखे यांचय हालचालींवर लक्ष ठेवत रेकी केली आणि योग्य संधी साधून हा हल्ला केला. सुपारी घेणाऱ्या कॉन्ट्रॅक्ट किलरला पुण्यातून ताब्यात घेण्यात रायगड पोलिसांना यश आले असून, त्याच्याकडून मिळालेल्या माहितीनंतर तपासाला वेग आला आहे. एक आरोपी अद्याप फरार असून, त्याचा शोध घेण्यासाठी विशेष पथके तैनात करण्यात आली आहेत.

ही खळबळजनक घटना २६ डिसेंबर रोजी सकाळच्या सुमारास घडली होती. मंगेश काळोखे हे आपल्या मुलीला शाळेत सोडून घरी परतत असताना खोपोलीतील जया बार परिसरात काळ्या रंगाच्या वाहनातून आलेल्या पान २ वर

## वाहनाच्या धडकेत दोन युवक ठार

- महामार्गावरील अपघातांची मालिका सुरूच
- स्कुटीला अज्ञात वाहनाने धडक दिल्याने अपघात

**। महाड । प्रतिनिधी ।**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर अपघाताचे सत्र सुरूच आहे. महामार्गावर रोज अपघात होऊन अनेकांचे जीवदेखील जात असताना, महाड तालुक्यातील नडगाव गावाच्या हद्दीत रात्रीच्या सुमारास भीषण अपघात झाला आहे. या अपघातात दोन युवक जागीच ठार झाले आहेत.

पोलीस सूत्रांच्या माहितीनुसार, मयत हे त्यांच्या ताब्यातील स्कुटी ही मुंबई बाजूकडून गोवा बाजूकडे चालवीत घेऊन जात असताना त्यांना पाठीमागून येणाऱ्या कोणत्यातरी अज्ञात वाहन चालकाने जोरदार धडक दिल्याने राहुल वसंत पाटील, वय-२९ वर्षे, रा. कलनाकवाडी, पो. कसबा तरले, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर, सध्या रा. बापट नगर बिरवाडी, ता. महाड आणि अनुष्का जालिंदर मानकर, वय-२५ वर्षे, रा. येडे मच्छिंद्र, ता. वळवा, जि. सांगली, सध्या रा. लक्ष्मी नगर, बिरवाडी, ता. महाड, हे दोघे गंभीर जखमी झाल्याने जागीच मृत्यू झाला आहे.

महत्त्वाचे म्हणजे, अज्ञात वाहन चालक घटनास्थळी कोणतीही माहिती न देता फरार झाला आहे. या अपघाताचा पुढील तपास महाड एमआयडीसी पोलीस करीत आहेत.

## ३२ कोटींचा प्रतिबंधित हुक्का साठा जप्त

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

अन्न व औषध प्रशासन विभागाने राज्यभर प्रतिबंधित वस्तूंच्या उत्पादनाविरोधात कारवाईचा बडगा उगारला आहे. याच कारवाई अंतर्गत पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यातील टाकवे येथील मे. सोएक्स इंडिया प्रा.लि. या कंपनीवर छापा टाकून अन्न व औषध प्रशासनाने तब्बल ३१ कोटी ६७ लाख २१ हजार ९८७ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी कंपनीचे संचालक आणि व्यवस्थापकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अन्न सुरक्षा अधिकारी श्रीमती अस्मिता टोणपे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, ही कारवाई २ जानेवारी रोजी करण्यात आली. यापूर्वी १ डिसेंबर २०२५ रोजी या कंपनीच्या उत्पादनांचे नमुने तपासणीसाठी घेण्यात आले होते. मुंबईतील अन्न पान २ वर

## उमेदवार झाले रीलस्टार

### मतदारांच्या मोबाईल स्क्रीनवर राज्य करण्याचा प्रयत्न

**। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।**

पालिका निवडणुकीत पारंपरिक प्रचाराला आधुनिकतेची जोड देऊन प्रचार करण्याला पालिका निवडणुकीच्या रिंगणात उतरलेले उमेदवार प्राधान्य देत आहेत. व्हॉट्सअॅप स्टेटसवर ठेवण्याजोगी रिल्स बनवून प्रचार करण्याला सध्या सर्वच राजकीय तसेच अपक्ष म्हणून निवडणूक रिंगणात उतरलेले उमेदवार देत आहेत. यामुळे इन्स्टाग्रामवरील गाजलेल्या गाण्यांवर किंवा संवादांवर उमेदवार आपले प्रचाराचे मुद्दे गुंफत आहेत. येत्या १५ जानेवारीला मतदान होणार आहे. या रील-प्रचारामुळे मतदारांच्या पसंतीवर किती परिणाम होईल, हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल.

एंट्री व्हिडिओ: उमेदवाराची प्रभागात एन्ट्री होताना मागे स्लो-मोशन संगीत आणि समर्थकांची गर्दी असलेले सिनेमॅटिक व्हिडिओ तरुणांमध्ये लोकप्रिय ठरत आहेत. तसेच मिम्सचा पान २ वर

### आयोगाची डिजिटल हालचालींवर नजर

**खर्चाचे गणित :** रीलच्या शूटिंगसाठी होणारा खर्च, पेड प्रमोशन आणि इन्फ्लुएन्सरला दिलेले पैसे हे आता उमेदवाराच्या अधिकृत निवडणूक खर्चात समाविष्ट केले जात आहेत.

**आचारसंहिता :** चिथावणीखोर किंवा खोटे दावे करणाऱ्या रीलवर आचारसंहितेनुसार कारवाईचे संकेत देण्यात आले आहेत.

## अजित पवार आज रायगडात

**। तळा । प्रतिनिधी ।**

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार उद्या सोमवार, दि. ५ जानेवारी रोजी रायगड जिल्ह्याच्या दौऱ्यावर आहेत. दरम्यान, पवारांच्या हस्ते तळा नगरपंचायत इमारतीच्या कामाचे भूमीपूजन करण्यात येणार आहे. तळा शहरात नागरी सेवा व सुविधा योजनेंतर्गत नगरपंचायत इमारत मंजूर करण्यात आली असून, या कामाचे भूमीपूजन अजित पवार यांच्या हस्ते सकाळी १०.३० वाजता पार पडणार आहे.

तसेच शिवसेना उबाठा पक्षाचे दक्षिण रायगडमधील नेते आणि रायगड जिल्हा सहसंपर्क प्रमुख तसेच रायगड जिल्हा परिषदेच्या नागोठणे गटाचे सदस्य किशोर जैन यांच्यासह नागोठणे शहर व विभागातील सरपंच, पदाधिकारी आणि असंख्य कार्यकर्ते सोमवारी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जाहीर प्रवेश करीत आहेत. हा कार्यक्रम नागोठणे आठवडा बाजारच्या मैदानावर दुपारी १ वाजता अजित पवारांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. या पार्श्वभूमीवर तळा आणि नागोठण्यात कार्यक्रमाची जय्यत तयारी करण्यात आली असून, पोलिसांकडूनही सुरक्षेच्या दृष्टीने उपाययोजना आखण्यात आल्या आहेत.



## जनतेच्या सेवेसाठी शेकाप कटिबद्ध

### चित्रलेखा पाटील यांचे प्रतिपादन

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

शेतकरी कामगार पक्षाचे नेते जयंत पाटील यांनी नेहमीच सर्वसामान्यांना केंद्रस्थानी ठेवून काम केले असून, हीच परंपरा पुढे नेत गोरगरीब विद्यार्थ्यांसाठी मोफत सायकल देण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. सहाणपासून सुडकोलीपर्यंतच्या गावांमधील हजारो मुले व मुलींना सायकल दिल्याचा खऱ्या अर्थाने आनंद आहे. शाळेत जाण्याचा मार्ग सुकर करण्याचा प्रयत्न यातून केला आहे. जनतेच्या सेवेसाठी शेकाप कायमच कटिबद्ध आहे, असे प्रतिपादन शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी केले.

चित्रलेखा पाटील यांच्यामार्फत मुला-मुलींना मोफत सायकल वाटप कार्यक्रम अलिबाग तालुक्यातील नांगरवाडी येथे रविवारी (दि.४) आयोजित पान २ वर

### सृष्टी धुमाळ यांचा सन्मान

सैन्य दलात निवड झाल्याबद्दल नांगरवाडी येथील तरुणी सृष्टी धुमाळ यांचा या कार्यकमाच्या निमित्ताने विशेष सन्मान करण्यात आला. शेकाप प्रवक्ता चित्रलेखा पाटील यांच्या हस्ते पुष्पगुच्छ, सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

### हजारो मुला-मुलींच्या चेहऱ्यावर हसू

ग्रामीण भागतील अनेक विद्यार्थ्यांना दररोज तीन ते पाच किलोमीटर अंतर चालत किंवा इतर वाहनांच्या आधाराने शाहेत जावे लागते. शिक्षणापासून कोणीही वंचित राहू नये आणि शाळा गळती थांबावी, या भूमिकेतून शेकाप प्रवक्तया चित्रलेखा पाटील यांच्या सौजन्याने शासनाच्या पुढे पाऊल टाकत हजारो विद्यार्थ्यांना सायकली वाटप करण्यात आल्या. सहाण ते कुदेदरम्यानच्या ३०हून अधिक गावांतील विद्यार्थ्यांना सायकलचा आधार मिळाल्याने त्यांच्या चहेऱ्यावर आनंद झळकत होता. हा आगळावेगळा कार्यक्रम नांगरवाडी येथे घेण्यात आला.



# कारागृहातील उपक्रमाला जिल्हाधिकाऱ्यांची दाद

## उज्ज्वल भविष्य सामाजिक संस्थेच्या पुढाकारातून कार्यक्रम



। अलिबाग । प्रतिनिधी ।

रायगड जिल्हा कारागृह, अलिबाग येथे आयोजित विशेष कार्यक्रमात जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या प्रभावी आणि प्रेरणादायी भाषणाने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत सकारात्मक बदल पोहोचवणे हीच खरी सामाजिक सेवा असल्याचे त्यांनी आपल्या भाषणातून अधोरेखित केले. महिला बंदींच्या मानसिक व शारीरिक आरोग्यासाठी उपयुक्त ठरणाऱ्या उपक्रमांना प्रशासन सदैव पाठिंबा देईल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

रायगड जिल्हा कारागृहात उज्ज्वल भविष्य सामाजिक संस्था, अलिबाग यांच्यावतीने आयोजित या कार्यक्रमास जिल्हाधिकारी किशन जावळे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी त्यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी जिल्हा व विधीसेवा प्राधिकरणाच्या सचिव तेजस्विनी निराळे, कारागृहाचे जेलर श्री. वारगे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमादरम्यान संस्थेच्या अध्यक्षा उज्ज्वला चंदनशिव यांनी महिला बंदींसाठी दैनंदिन वापराच्या आवश्यक साहित्याचे मोफत वाटप केले.

या उपक्रमाचे विशेष कौतुक करत जिल्हाधिकारी जावळे यांनी आगामी एक वर्षासाठी अलिबाग जिल्हा कारागृहातील महिला बंदींसाठी योग व प्राणायाम वर्ग सुरू करण्यास अधिकृत परवानगी जाहीर केली. अशा उपक्रमांमुळे बंदींमध्ये आत्मविश्वास, सकारात्मक दृष्टिकोन आणि आरोग्याची जाणीव वाढीस लागते, असे त्यांनी आपल्या भाषणात नमूद केले. पुढील काळातही उज्ज्वल भविष्य सामाजिक संस्थेने असेच समाजोपयोगी कार्य सुरू ठेवावे, असे आवाहनही त्यांनी केले.

कार्यक्रमाच्या शेवटी उज्ज्वल भविष्य सामाजिक संस्थेच्या अध्यक्षा उज्ज्वला चंदनशिव, सचिव डॉ. राजाराम हुलवान, खजिनदार डॉ. नितीन गांधी तसेच सर्व कार्यकर्त्यांचे आभार मानण्यात आले.

गुरुवार, दि. १ जानेवारी या नववर्षाच्या प्रारंभी मिळालेली ही प्रशासकीय परवानगी संस्थेच्या सामाजिक कार्यासाठी नवी दिशा देणारी ठरली आहे.

## पत्रकार दिनानिमित्त विविध उपक्रम

। रसायनी । प्रतिनिधी ।

६ जानेवारी रोजी पत्रकार दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ खालापूर यांच्यावतीने खास महिलांसाठी चौक ग्रामीण रुग्णालय येथे रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड, पाताळगंगा व रिलायन्स फाऊंडेशन, चौक ग्रामीण रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने महिलांसाठी मूलभूत आरोग्य तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले आहे.

दरम्यान, कुपोषित माता बालक यांची तपासणी, खालापूर तहसील कार्यालय यांच्यावतीने तुपगाव चौक ग्रामपंचायत येथील ज्येष्ठ नागरी सभागृहात रेशन कार्ड दुय्यम प्रत, नवीन आधार कार्ड व आधार कार्ड दुरुस्ती शिबीरदेखील आयोजित करण्यात आले आहे. याचे उद्‌घाटन खालापूर तहसीलदार अभय चव्हाण, गटविकास अधिकारी संदीप कराड, पोलीस निरीक्षक सचिन पवार, वैद्यकीय अधीक्षक डॉ. सरिता कालेल, महिला व बाल प्रकल्प अधिकारी विशाल, रिलायन्स फाऊंडेशन प्रमुख संतोष विचारे यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. या कार्यक्रमास उपस्थित राहून आम्हास उपकृत कराव, असे आवाहन जिल्हाध्यक्ष राकेश खराडे, खालापूर तालुका अध्यक्ष अर्जुन कदम यांनी केले.

## सावित्रीबाईंच्या जयंतीनिमित्त महिलांचा सत्कार




। रसायनी । प्रतिनिधी ।

राजिप शाळा तुराडे यांच्यावतीने सावित्रीबाई फुले यांची १९५ वी जयंती साजरी करण्यात आली. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर महिलांचे स्वागत ढोलताशांच्या गजरात करण्यात आले. यानंतर सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. महात्मा ज्योतिबा फुले यांनी सावित्रीबाईंना शिकवल्यामुळे व त्यांच्या धाडसामुळे आज महिलांना भारतामध्ये शिक्षण मिळण्याला सुरुवात झाली त्यामुळेच आज महिलांचा सर्वांगीण विकास होताना दिसत आहे, असे मत सरपंच रंजना गायकवाड यांनी व्यक्त केले.

यावेळी प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक चोपडे यांनी आपलं मनोगत व्यक्त करताना सांगितलं की, यावेळी आम्ही ज्या महिलांनी आपल्या कार्यक्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटवला अशा महिलांचा सत्कार करून ही जयंती साजरी करण्यात यावी असा मानस त्यांचा होता. त्याप्रमाणे तुराडे ग्रामपंचायत सरपंच रंजना गायकवाड, उपसरपंच मालती वाघमारे, सदस्य लीना ठाकूर, डॉ. अंजली केने, युट्युबर जिया गायकर, आशा वर्कर जयश्री चव्हाण, शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष पिंगळे ताई या सर्वांचं शाळेच्यावतीने पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी उपस्थित माजी सरपंच विश्वनाथ गायकवाड, मयूर ठाकूर, प्रदीप माळी, संतोष वाघमारे आणि मुख्याध्यापक चोपडे, श्रीवंत सर आणि पाटील सर उपस्थित होते.

## कोंझर शाळेच्या विद्यार्थ्यांना साहित्य वाटप



। महाड । प्रतिनिधी ।

महाड शहरातील सामाजिक सांस्कृतिक क्षेत्रात नावलौकिक प्राप्त केलेल्या व नाविन्य उपक्रम राबविणाऱ्या बाल मित्र मंडळ व महिला मंडळ शिंपी आळी महाडतर्फे कोंझर येथील शालेय विद्यार्थ्यांना मोफत साहित्य वाटप करण्यात आले. मंडळाने गेली अनेक वर्षे शालेय विद्यार्थ्यांना आर्थिकसह साहित्य वाटप करत आपण काहीतरी समाजाला देणे लागत आहोत या उक्तीला जागरुक राहात साहित्य वाटप करण्यात आले.

गावागावातील मुले/मुली शिक्षणापासून दूर राहू नये, त्यांना कोणत्याही साहित्याची कमी पडू नये यासाठी आपल्याकडून जे जे लागेल, ते सहकार्य केले जाईल, विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षणासह उत्पादक क्षेत्राकडे वळावे, असे मत नवनिर्वाचित नगरसेविका अक्षया हेलेकर यांनी व्यक्त केले.

महाडमधील सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व अनेक विद्यार्थ्यांना दत्तक घेत त्यांच्या शिक्षणाचा भार उचलणाऱ्या बाल मित्र मंडळ व महिला मंडळ पेठेचा राजातर्फे शालेय साहित्य वाटप २ जानेवारी रोजी कोंझर येथील रायगड शिक्षण प्रसारक मंडळाच्या जिजामाता माध्यमिक शाळेमध्ये आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला मंडळाचे अध्यक्ष सुयोग पोरे, महिला अध्यक्ष तथा नगरसेविका अक्षया हेलेकर, मंडळाचे पदाधिकारी, मुख्याध्यापक संतोष इनामदार, शिक्षक वृंद कर्मचारी उपस्थित होते.यावेळी सुधीर शेठ यांनी मंडळाच्या आजपर्यंत केलेल्या कार्याचा आढावा घेतला. यापुढे मार्गदर्शन करताना विद्यार्थीवर्गाने शिक्षणासह कवायती, क्रीडा प्रकारात नाव उंचवावे, मैदानी खेळाप्रमाणे इनडोअर खेळ आत्मसात करावे, असा सल्ला दिला.

## द्रोणागिरी नोड वसाहतीमधील बत्तीगुल

। उरण । प्रतिनिधी ।

उरण तालुक्यातील द्रोणागिरी नोड शहरातील विद्युत पुरवठा खंडित झाल्याने या ठिकाणच्या रहिवाशांना दोन दिवस अंधारात चाचपडत राहण्याची वेळ आली आहे. एकंदरीत, महावितरण विभागाच्या गलथान कारभारामुळे रहिवाशांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

उरण तालुक्यातील वाढते औद्योगिकीकरण आणि नागरिकरण यामुळे सिडकोने द्रोणागिरी नोडमधल सेक्टर ४५ ते ५४ सह इतर ठिकाणी विकसित शहर उभारण्याचा निर्णय घेतला. सध्या याठिकाणी झपाट्याने नागरीकरण वाढत आहे. मात्र, येथील रहिवाशांना नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सिडको प्रशासन अकार्यक्षम ठरत आहे. त्यामुळे उघडी गटारे, अस्वच्छ दुर्गंधीयुक्त रस्ते, वाढते डासांचे साम्राज्य यांचा सातत्याने सामना हा येथील रहिवाशांना करावा लागत आहे. त्यात शुक्रवारी ( दि. २) ते शनिवारी (दि.३) या दोन दिवसांत या ठिकाणचा विद्युत पुरवठा खंडित झाल्याची घटना समोर आली. त्यामुळे रहिवाशांच्या दैनंदिन जीवनात त्याचा नाहक त्रास सहन करावा लागला आहे.

## कुलाबा गौरवने सन्मान



### प्रा. प्रशांत म्हात्रे पुरस्काराने सन्मानित

। चिरनेर । प्रतिनिधी ।

शिक्षकी पेशाच्या माध्यमातून आदर्श विद्यार्थी घडविण्याचे काम करणारे, त्याचबरोबर सामाजिक व क्रीडा क्षेत्रात काम करणारे स्वातंत्र्यवीर सावरकर उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्रा. प्रशांत म्हात्रे यांना यंदाचा शिक्षण क्षेत्रातला राज्यस्तरीय कुलाबा जीवन गौरव पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. ॲड उमेश ठाकूर, माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, काँग्रेसचे आमदार भाई जगताप, नगरसेवक प्रवीण ठाकूर, सुनील थळे यांच्या हस्ते सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्र व शाल देऊन त्यांना गौरविण्यात आले. काँग्रेस सेवा फाऊंडेशन रायगड अलिबाग, मुरुड काँग्रेस कमिटी, भारतीय राष्ट्रीय विद्यार्थी संघटना, ओबीसी व अल्पसंख्याक कमिटी आणि युवक काँग्रेस यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच सरचिटणीस मधुशेठ ठाकूर चॅरिटेबल ट्रस्ट अध्यक्ष काँग्रेस सेवा फाऊंडेशन रायगड, अध्यक्ष भाई जगताप मित्र मंडळ यांच्या संयोजनातून शनिवारी (दि.३) ॲड. उमेश मधुकर ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधत, विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्तिमत्त्वांना कुलाबा जीवन गौरव पुरस्काराने गौरविण्यात आले. प्रा. प्रशांत म्हात्रे यांचे स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालय तसेच सारडे विकास मंच, प्रीतम स्पोर्ट्स कडापे, निगा फाऊंडेशन आवरे व सुयश क्लासेस आवरे यांच्यातर्फे अभिनंदन करण्यात आले आहे.

### कीर्तनकार रामकृष्ण महाराज मोकल यांना पुरस्कार



। खरोशी । प्रतिनिधी ।

अखिल भारतीय वारकरी मंडळ रायगड जिल्हा अध्यक्ष, रायगड भूषण पुरस्कार प्राप्त, समाज प्रबोधनकार, रामकृष्ण महाराज मोकल यांना अलिबाग येथे ३ जानेवारी रोजी कुलाबा जीवनगौरव राज्यस्तरीय पुरस्कार २०२६ देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमासाठी शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस भाई जयंत पाटील, आमदार भाई जगताप, खासदार बाळ्या मामा तथा सुरेश म्हात्रे, तसेच अध्यक्ष ॲड. उमेश ठाकूर, ॲड. प्रवीण ठाकूर, माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक व इतर मान्यवर उपस्थित होते.

गेली २५ ते ३० वर्ष रामकृष्ण महाराज मोकल समाजामध्ये व्यसनाधीनता नष्ट करण्यासाठी तरुणाईमध्ये समाज प्रबोधन करत आहेत. प्रवचन, कीर्तन, हरिपाठ, भजनाच्या माध्यमातून समाजामध्ये जनजागृती करून ज्ञानामृत देऊन अनेक समाज बांधवांनी माळ घालून माळकरी झालेले आहेत. तसेच पायी दिंडी आळंदी अनेक वर्षांपासून चालू करून हजारो लोकांना एक चांगलं वळण तथा परमार्थाला लावण्याचा काम केलेले पहावयास मिळते. समाजाला उत्तम ज्ञानामृत देणाऱ्या कीर्तनकारांना कुलाबा जीवनगौरव राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित केले, त्यामुळे समाजामध्ये महाराजांचे स्थान आणखी उंचावलं आहे. सर्व भागांतून अभिनंदन होत आहे.



### प्रतिक दर्णे यांच्या कार्याची दखल घेत सन्मान

। उरण । प्रतिनिधी ।

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधून सामाजिक शैक्षणिक कला क्रीडा वैद्यकीय सांस्कृतिक तसेच पत्रकारिता या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मान्यवरांना कुलाबा जीवनगौरव राज्यस्तरीय पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमात प्रतिक दर्णे यांनाही हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. उरणचे सुपुत्र प्रतिक प्रविण दर्णे (नवीन शेवा) यांनी यापूर्वी अनेक राज्यस्तरीय, आंतरराष्ट्रीय पदके, बक्षिसे पटकाविली आहेत. प्रतिक प्रविण दर्णे यांनी यापूर्वी आंतरराष्ट्रीय शरीरसौष्ठव स्पर्धेत भाग घेऊन भारताला कांस्यपदक मिळवून दिले आहे. २०२५ मध्ये द्रोणागिरी भूषण पुरस्कार मिळाला आहे. प्रामाणिक, मेहनती, स्वच्छ चारित्र्यसंपन्न व्यक्तिमत्त्व व देशासाठी महत्त्वाचे योगदान देणाऱ्या प्रतिक प्रविण दर्णे यांना कुलाबा जीवन गौरव राज्यस्तरीय पुरस्कार मिळाल्याने त्यांच्यावर सर्वच क्षेत्रातून शुभेच्छा व अभिनंदनचा वर्षात होत आहे.

पान १ वरून

## मापगाव येथे सशस्त्र दरोडा

देत दरोडेखोरांनी संपूर्ण कुटुंबाला दोरीने हात-पाय बांधून ठेवले. घरातील सर्व मोबाईल जप्त करण्यात आल्याने मदतीची कोणतीही संधी उरली नव्हती.

हा सर्व प्रकार घरात असणारी पाथरे यांची नात ओवी पात्रे पाहात होती. तिला या दरोडेखोरांनी काहीच केले नसल्याचे किंवा घरातील कोणत्याही महिलेला काहीच केले नसल्याचे दहशतीमध्ये असणाऱ्या पाथरे कुटुंबियांनी सांगितले. आपला मुलगा दरोडेखोरांच्या ताब्यात आहे, हे कळताच त्याचा जीव वाचवण्यासाठी कुणाल पाथरे यांनी प्रसंगावधान राखून वडील दिलीप पाथरे यांना सांगून घरातील दागिने व रोख रक्कम असा सुमारे २० लाखांचा ऐवज दरोडेखोरांच्या स्वाधीन करण्यास सांगितले. तरीही समाधान न झाल्याने दरोडेखोरांनी तळघर दाखवण्याची मागणी करत घरातील फोटो, साहित्याची तोडफोड करत सर्वत्र शहानिशा केली. मात्र, त्यांच्या हाती अधिक काही लागले नाही.

तब्बल एक तास सुरू असलेल्या या दहशतीनंतर दरोडेखोर चारचाकी वाहनाने पसार झाले. सीसीटीव्ही फुटेजमध्ये चारचाकी गाडी आणि मार्ग दाखवणारी दुचाकी स्पष्ट दिसत आहे. धक्कादायक बाब म्हणजे, पसार होताना दरोडेखोरांनी आयानला पुन्हा घरात सोडले आणि जखमी माधवी पाथरेंच्या हातावर पट्टी बांधल्याचेही कुटुंबियांनी सांगितले.

घटनेनंतर धैर्य एकवटत पाथरे कुटुंबियांनी अलिबाग पोलीस ठाण्याशी संपर्क साधला. तातडीने पोलीस पथक, फॉरेन्सिक टीम आणि पोलीस निरीक्षक किशोर साळे घटनास्थळी दाखल झाले. जिल्हा मुख्यालयापासून जवळ असणाऱ्या परिसरात दरोडा पडल्याने स्वतः जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनीही घटनास्थळी भेट देऊन कुटुंबियांना धीर दिला. तपासादरम्यान दरवाजाला अडकवलेली कटावणी सापडली असून, त्यावरील पांढऱ्या कागदावर इंग्रजीत ‘डीएआर’ असे शब्द लिहिलेले आढळले आहेत. सीसीटीव्ही फुटेज व वाहन क्रमांकाच्या आधारे तपासाला वेग देण्यात आला असून, काही संशयितांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. या थरारक आणि धाडसी दरोड्यामुळे जिल्हा मुख्यालयाजवळील परिसरातही नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला असून, पोलिसांसमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे.

## उमेदवार झाले रीलस्टार

वापर करून विरोधकांच्या विधानांवर मिश्किल भाषेत उत्तर देण्यासाठी प्रभावी वापर केला जातोय. पालिका निवडणुका या स्थानिक मुद्द्यांवर लढवल्या जातात. त्यामुळे उमेदवार आपल्या प्रभागातील रस्ते, कचरा समस्या किंवा पाणीप्रश्नावर ऑन द स्पॉट रील बनवून आपण किती सक्रिय आहोत, हे दाखवत आहेत.

प्रभागातील प्रश्न : तुंबलेली गटारे किंवा खराब रस्त्यांजवळ उभं राहून ‘‘बघा ही स्थिती, मी बदलणार!’’ अशा आशयाचे व्हिडिओ.

मतदारांशी संवाद : वस्तीत किंवा चाळीत जाऊन लोकांसोबत संवाद साधतानाचे भावनिक व्हिडिओ बनवून मतदारांना आपल्याकडे वळवण्यासाठी उमेदवार प्रयत्न करत आहेत. यासाठी स्थानिक स्तरावर प्रसिद्ध असलेल्या इन्फ्लुएन्सर्सना आपल्या प्रचारात सामील करून घेण्यात आले आहे. विशेष बाब म्हणजे, अनेक उमेदवारांनी केवळ रील बनवण्यासाठी विशेष सोशल मीडिया मॅनेजर्स आणि व्हिडिओ एडिटर यांची टीम आपल्या ताफ्यात तैनात केली आहे.

## ३२ कोटींचा प्रतिबंधित हुक्का साठा जप्त

विश्लेषकांच्या अहवालानुसार, या नमुन्यांमध्ये निकोटिन पॉझिटिव्ह आढळले. हे उत्पादन मानवी आरोग्यास घातक असून महाराष्ट्र सरकारने १६ जुलै २०२५ रोजी काढलेल्या प्रतिबंधात्मक आदेशाचे उल्लंघन करणारे असल्याचे स्पष्ट झाले. एकूण किंमत ३१ कोटी ६७ लाख,२१,९८७ रुपये (३१.६७ कोटी) रुपयांचे विविध फ्लेवर्सचे तयार हुक्का प्रॉडक्ट्स, कच्चे पदार्थ आणि फ्लेवर्सचा साठा जप्त करून कंपनीच्या दारांना सील ठोकले आहे.

अनिल कुमार चौहान (असिस्टंट मॅनेजर), असिफ फाजलानी (संचालक), फैजल फाजलानी (संचालक), मे. सोएक्स इंडिया प्रा. ली. (कंपनी) या व्यक्तींविरुद्ध पोलिसांनी गुन्हा नोंदवला आहे.

## २० लाखांची सुपारी, पुणे कनेक्शन उघड

हल्लेखोरांनी त्यांचा पाठलाग केला. तोंडाला रुमाल बांधलेल्या हल्लेखोरांनी तलवार, कोयता आणि कुऱ्हाडीने त्यांच्यावर सपासप वार करत निर्घृण हत्या केली. दिवसाढवळ्या झालेल्या या हत्येमुळे खोपोली शहरासह महाराष्ट्र राज्यात तीव्र संतापाची लाट उसळली होती. या प्रकरणात आतापर्यंत रवींद्र देवकर, त्याचा मुलगा दर्शन देवकर व धनेश देवकर, पत्नी उर्मिला देवकर, इशा पापा शेख, आदिल मुखत्यार शेख, खालीद खलिल कुरेशी, सचिन चव्हाण यांच्यासह एकूण १२ जणांना अटक करण्यात आली आहे. हत्येमागे जुने वैमनस्य आणि निवडणूक पराभवाचा राग कारणीभूत असल्याची शक्यता पोलिसांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

## जनतेच्या सेवेसाठी शेकाप कटिबद्ध

करण्यात आला. यावेळी शेकापचे माजी तालुका चिटणीस अनिल पाटील, शेकाप तालुका चिटणीस सुरेश घरत, मोहन धुमाळ, राजेंद्र म्हात्रे, प्रकाश खडपे, गणेश धुमाळ, विक्रांत वार्डे, निकीता राऊत, जनार्दन शेळके, नामदेव तांबडकर, प्रीती तांबडकर, बाळू पाटील, अमित देशमुख आदी मान्यवर, शेकापचे वेगवेगळ्या आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, कुदेपासून सहाणपर्यंतच्या गावांतील पाचवी ते दहावीतील विद्यार्थी, विद्यार्थिनी, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शेतकरी कामगार पक्षाच्या प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांच्या हस्ते हा सायकल वाटप वितरण सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला.

यावेळी मार्गदर्शन करताना चित्रलेखा पाटील म्हणाल्या की, ग्रामीण भागातील गावे, वाड्या-वस्तांमध्ये राहणारी मुले आणि मुलींची शैक्षणिक प्रगती व्हावी, हा उद्देश ठेवून शेकाप नेते जयंत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सायकल वाटपाचा नाविन्यपूर्ण उपक्रम सुरू करण्यात आला आहे. कष्टकरी, कामगारांचे नेते माजी जिल्हा परिषद अध्यक्ष दिवंगत प्रभाकर पाटील, माजी विरोधी पक्षनेते दिवंगत दत्ता पाटील यांनी शिक्षणाचा सुरु केलेला वारसा जपण्याचे काम केले जात आहे. शिक्षण हेच सर्वेसर्वा आहे, हे लक्षात घेऊन गोरगरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा मार्ग सायकल देऊन सुकर करण्याचा प्रयत्न केला आहे.

या परिसराचा सर्वांगीण विकास हा शेकापच्या माध्यमातून करण्यात आला असून, उमटे धरणातील गाळाचा प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केला जाईल. तसेच ज्येष्ठ नागरिकांसाठी सभागृह लवकरात लवकर पूर्ण केले जाईल, असे आश्वासन त्यांनी दिले.

या भागातील रस्त्यांची समस्या बिकट असून, सक्षम लोकप्रतिनिधी असल्यास गावांचा विकास निश्चित होतो. आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये शेकापकडून सर्वसामान्यांच्या मनातील उमेदवार दिला जाईल. शेतकरी कामगार पक्ष आणि पाटील कुटुंबीय जनतेच्या पाठीशी ठामपणे उभे राहतील, असे आश्वासन चित्रलेखा पाटील यांनी दिले.

देशसेवेसाठी नांगरवाडी येथील तरुणीची निवड झाली आहे. आपल्यासाठी ही अभिमानाची गोष्ट आहे. आई, वडिलांनी केलेल्या त्यागामुळे हे शक्य झाले आहे. गावाचे, समाजाचे, अलिबागचे आणि रायगड जिल्ह्याचे नाव वेगळ्या उंचीवर नेण्याचे काम या तरुणीने आपल्या मेहनतीने केले आहे, असे गौरवोद्‌गार चित्रलखा पाटील यांनी काढले.

## महामार्गावर बर्निंग कारचा थरार

आणि आगीचे लोळ उठू लागले. प्रसंगाचे गांभीर्य ओळखून वाहनातील सर्व प्रवासी तत्काळ बाहेर पडले. त्यामुळे सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र काही मिनिटांतच संपूर्ण कार आगीच्या भक्ष्यस्थानी सापडली आणि कारमधील सर्व साहित्य जळून खाक झाले.घटनेची माहिती मिळताच लोटे औद्योगिक वसाहत येथील अग्निशमन दलाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. अग्निशमन दलाने प्रयत्नपूर्वक आग आटोक्यात आणली; परंतु तोपर्यंत कार पूर्णतः जळून मोठे नुकसान झाले होते. आगीमुळे महामार्गावर काही काळ वाहतूक ठप्प झाली होती. पोलिसांनी घटनास्थळी बंदोबस्त ठेवून वाहतूक सुरळीत केली. या घटनेमुळे महामार्गावरील वाहनचालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. पहाटेच्या वेळी होणारी डुलकी आणि वेग यामुळे होणाऱ्या अपघातांचा धोका पुन्हा एकदा अधोरेखित झाला असून, वाहनचालकांनी अधिक सतर्कता बाळगण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

## सिडकोच्या भूखंडासाठी संघर्ष

भूसंपादनासाठी घेतली होती. सिडकोच्या दि. १५ मे १९७७च्या पत्रानुसार ही जमीन संपादित करण्यात आली होती. त्यानंतर संचिका क्र. के-६६ अंतर्गत सन १९९३ मध्ये त्यांना २०० चौ.मी. भूखंड देण्यात आला. मात्र, उर्वरित जमीनधारक हक्कानुसार मिळणाऱ्या भूखंडासाठी वारंवार मागणी करुनही आजतागायत न्याय मिळालेला नाही.


कमल मुंबईकर यांचे पती अरुण काशिनाथ मुंबई यांनी राज्य माहिती आयोग, कोकण खंडपीठ येथे द्वितीय अपील दाखल केले. अपीक क्र. केआर ३५३८/२०१७ नुसार दि. १४ मे २०१८ रोजी तत्कालीन राज्य माहिती आयुक्त थँक्सी फ्रान्सिस थेकेकरा यांनी सिडकोला संचिकेतील कागदपत्रे उपलब्ध करुन देण्याचे आदेश दिले. त्यानंतरही सिडकोने आदेशाचे पालन न केल्याने दि. ३ मार्च २०२० रोजी माहिती आयुक्त के.एल. बिश्नोई यांनी पुन्हा एकदा सिडकोला आदेश दिला.

आदेश असूनही सिडको प्रशासन के ६६ संचिकेतील कागदपत्रे देण्यास असमर्थ ठरत आहे. विशेष म्हणजे, सिडकोने राज्य माहिती आयोगाला सादर केलेल्या अहवालानुसार, पान क्र. ५२ वर नमूद आहे की, सदर संचिका दि. ४ जानेवारी २०१० रोजी व्यवस्थापक-शहरसेवा-२ यांच्या अभिलेख कक्षात जमा करण्यात आली होती. यामुळे संचिका प्रत्यक्षात उपलब्ध असूनही ती जाणीवपूर्वक लपवली जात असल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे.

सध्याचे राज्य माहिती आयुक्त, कोकण खंडपीठ शेखर चिन्ने यांच्यासमोर दि. २९ सप्टेंबर २०२५ व १२ नोव्हेंबर २०२५ रोजी सुनावण्या होऊनही संबंधित सिडको अधिकाऱ्यांवर कोणतीही कायदेशीर कारवाई झालेली नाही.

ही बाब अत्यंत गंभीर व दुर्दैवी असून, संबंधित प्रशासनाने याकडे जातीने लक्ष देत दोषी अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करुन प्रकल्पबाधित कुटुंबाला तातडीने न्याय द्यावा, अशी मागणी कमल मुंबईकर यांनी केली आहे. मी एका सर्वसामान्य प्रकल्पबाधित शेतकऱ्याची मुलगी आहे. माझ्या वडिलांची संचिका गहाळ होऊन आज ८-९ वर्षे झाली. सिडको आणि राज्य माहिती आयोगाचे उंबरठे झिजवूनही मला न्याय मिळालेला नाही. असे कमल मुंबईकर यांनी सांगितले.

## वऱ्हाडी साहित्यिकांना कवितासंग्रह भेट



। रसायनी । प्रतिनिधी ।

विदर्भातील ज्येष्ठ वऱ्हाडी साहित्यिक बाबाराव मुसळे (हल्या हल्या दुदु दे कादंबरी फ ेम) यांना वाशीम येथील त्यांच्या घरी जाऊन रसायनी येथील साहित्यिक कवी चारोळीकार अनिल दाभाडे यांनी आपले सांजधारा व काजवा हे दोन कवितासंग्रह भेट दिले. वाशीम येथील मूळ निवासी असलेले अनिल दाभाडे यांचे दोन्ही काव्यसंग्रह बघून व त्यामधील कविता वाचून बाबाराव मुसळे यांनी आनंद व्यक्त केला आणि पुढील लेखनासाठी शुभेच्छा दिल्या.

तसेच विदर्भ साहित्य संघ वाशीम शाखेचे अध्यक्ष प्रा. हरिभाऊ क्षीरसागर यांनाही कवी अनिल दाभाडे यांनी सांजधारा व काजवा कविता संग्रह सप्रेम भेट दिले. यावेळी हरिभाऊ क्षीरसागर यांनी अनिल दाभाडे या माझ्या विद्यार्थ्याने केवढी मोठी प्रगती केली असे बोलून कौतुक केले व पुढील लेखनासाठी शुभेच्छा दिल्या.

## निवडक



### हुतात्मा भाई कोतवाल यांना अभिवादन

**पाली** : हुतात्मा भाई कोतवाल यांच्या पुण्यतिथी दिनी (दि.२) सुधागड तालुका नाभिक सेवाभावी संस्थेच्यावतीने त्यांना अभिवादन करण्यात आले. हुतात्मा भाई कोतवाल यांचे कार्य महान आहे. विठ्ठल लक्ष्मण कोतवाल उर्फ भाई कोतवाल हे रायगड जिल्ह्यातील समाजसेवक व स्वातंत्र्यसेनानी होते. देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात त्यांनी आपल्या प्राणांची आहुती दिली. २ जानेवारी १९४३ रोजी सिद्धगडच्या जंगलात ते आपल्या सहकाऱ्यांसह भूमिगत असताना ब्रिटिश पोलीस अधिकारी यांच्याशी झालेल्या चकमकीत ते मारले गेले. त्यांच्या आझाद दस्त्याचे कार्य फार मोलाचे असल्याचे विवेक गुजर यांनी अभिवादन करताना सांगितले. यावेळी रायगड जिल्हा उपाध्यक्ष भगवान निमुतकर, सुधागड तालुकाध्यक्ष रुपेश पवार, उपाध्यक्ष दीपक शिंदे, गंगाधर पांडव, राकेश जाधव, रामचंद्र भोसले, रवींद्र जाधव, रमेश पांडव, विवेक गुजर, राहुल मोरे, निलेश जाधव, महेश कदम, मिलिंद भोसले, रोशन साळुंखे, राजेश पवार, मेघा जाधव, रूपाली पांडव, सुजाता पांडव, दिपाली घाडगे, समिधा मोरे, अरुणा भोसले, दिपाली घाडगे, दर्शना शिंदे, विनया गुजर, नीलम भोसले, दीप्ती साळुंके, सुषमा गुजर, श्रद्धा जाधव, मीनल गुजर, सुधागड तालुक्यातील सर्व विभागातील समाज बांधव आणि भगिनी हजर होते.

### एकपात्री अभिनय स्पर्धेचे आयोजन

**पनवेल** : रंगरचना कला मंच नाट्य संस्था पनवेल मागील अनेक वर्षापासून विद्यार्थी तसेच नाट्यप्रेमी साठी त्यांच्या अभिनय कौशल्याला वाव मिळावे म्हणून प्रयत्न करीत आहे. संस्थेच्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून २२ जानेवारी रोजी एकपात्री अभिनय स्पर्धेचे संस्थेने आयोजन केले आहे. या स्पर्धेमध्ये आपल्या शाळेतील विद्यार्थी व शिक्षक यांनी या स्पर्धेमध्ये सहभागी होऊन आपला रंगमंची अविष्कार अभिनय कुणातून सादर करावा. ही स्पर्धा ७ ते १६ या वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी व त्यापुढील खुल्या गटासाठी आयोजित केली आहे. ७ ते १६ या वयोगटाला ५ मिनिटे व खुल्या गटासाठी ७ मिनिटांचा सादरीकरणाचा कालावधी ठेवण्यात आला आहे. ही स्पर्धा विनाशुल्क असून आपल्या शाळेतील विद्यार्थी व शिक्षकांना या स्पर्धेत सहभागी होण्याचे आवाहन संस्थेच्यावतीने करण्यात आले आहे. या दोन्ही गटातील प्रथम क्रमांकासाठी ३ हजार रुपये, चषक व , द्वितीय क्रमांकासाठी २ हजार रुपये, चषक व प्रशस्तिपत्रक आणि तृतीय क्रमांकासाठी १ हजार रुपये, चषक व प्रशस्तिपत्रक देण्यात येणार आहे. ही स्पर्धा दि.२२ जानेवारी रोजी सायंकाळी ३ वाजता पनेवल महानगर पालिका कार्यालयाजवळ काँग्रेस भवन हॉलमध्ये घेण्यात येणार आहेत.

### वेगवेगळ्या अपघातात दोघांचा मृत्यू

**पनवेल** : दोन वेगवेगळ्या ठिकाणी झालेल्या अपघातात दोन दुचाकीस्वारांचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. हे दोन्ही अपघात न्हावाशेवा-पनवेल मार्गावर व टेंभोडे गावाजवळ घडले आहेत. त्यातील एकाचा मृत्यू दुचाकी रस्ता दुभाजकावर धडकून, तर दुसऱ्याचा मृत्यू डम्परने दिलेल्या धडक दिल्याने झाला आहे. न्हावाशेवा-पुणे मार्गावरील करंजाडे येथील पुलावर सकाळी सव्वासात वाजण्याच्या सुमारास पहिला अपघात झाला. वसईतील जूचंद्र नायगाव येथे राहणारा गणेश खेताल (३१) हा पहाटे वसई येथून मोटारसायकलवरून पुण्याच्या दिशेने जात होता. त्याची दुचाकी न्हावाशेवा-पुणे मार्गावरील करंजाडे येथील पुलावर आली असताना, भरधाव दुचाकीवरील नियंत्रण सुटल्याने त्याची दुचाकी रस्ता दुभाजकावर धडकून हा अपघात झाला. या अपघातात गणेश गंभीर जखमी होऊन रस्त्यावर पडला. त्यानंतर घटनास्थळी पोहोचलेल्या पोलिसांनी त्याला रुग्णालयात दाखल केले. मात्र, दाखल करण्यापूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. पनवेल शहर पोलिसांनी या अपघाताची नोंद केली आहे. दुसऱ्या अपघातात पनवेल तालुक्यातील टेंभोडे गाव येथील एकवीरा ढाब्याजवळ सकाळी सव्वादहा वाजताच्या सुमारास निखिल प्रकाश गोताळे (२१) या तरुणाचा मृत्यू झाला. निखिल हा कॉलेजमधून सुटल्यानंतर त्याच्या दुचाकीने पालेखुर्द येथे घरी परतत असताना टेंभोडे गावाजवळ समोरून भरधाव डम्परने दुचाकीला धडक दिली. या अपघातात निखिल गंभीर जखमी झाल्याने त्याला एमजीएम हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. मात्र, त्यापूर्वीच त्याचा मृत्यू झाला. खांदेश्वर पोलिसांनी या अपघाताला जबाबदार असलेला डम्पर चालक गौतम शिंदे याच्या विरोधात गुन्हा दाखल करून त्याला ताब्यात घेतले आहे. पुढील तपास पोलीस करत आहेत.

# पालीत वाहतूक कोंडीची समस्या जटिल

- **भाविक, पर्यटकांना गुगल मॅपचा चकवा**
- **सूचना फलकांकडे दुर्लक्ष; थेट नो एंट्रीमध्ये प्रवेश**

**| पाली/बेणसे | प्रतिनिधी |**

पालीत बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी तसेच पुढे तळ कोकणात जाण्यासाठी पर्यटक व भाविकांची रेलचेल सुरू असते. नववर्षात हजारोंच्या संख्येने भाविक, पर्यटक आणि त्यांची वाहने पाली शहरातून ये-जा करत आहेत. अनेकजण गुगल मॅप लावून रस्ता शोधत आहेत. मात्र, येथील नो एन्ट्रीच्या रस्त्याची गुगल मॅपला नोंदच नसल्याने अनेक वाहने नो एन्ट्रीमध्ये प्रवेश करतात. त्यामुळे वाहतुकीला अडथळा होऊन वाहतूक कोंडी होते. त्यामुळे पालीतील वाहतूक कोंडीची समस्या दिवसेंदिवस जटील होत आहे.

पाली शहरातून पुढे विळे निजामपूर मार्गे माणगाव, महाड, श्रीवर्धन तसेच तळ कोकणात व पुण्याकडे जाण्यासाठी मार्ग आहे. तर, तिकडून येणारी वाहने पाली-खोपोली राज्य महामार्गारून पुणे-मुंबईकडे जातात. या सर्व वाहनांना पालीतील अंतर्गत रस्त्यावरूनच जावे लागते. पालीत प्रवेश करण्यासाठी स्टेट बँक येथून व बाहेर पडण्यासाठी महाकाली मंदिराजवळून विक्रम स्टॅन्ड मार्गे असे दोन मार्ग निर्धारित केले आहेत. या ठिकाणी प्रवेश बंद, तसेच आत व बाहेर पडण्याचे मोठे फलक देखील लावण्यात आले आहेत. अनेकजण मार्ग शोधण्यासाठी गुगल मॅपचा वापर करत आहेत. परंतु, गुगल मॅपवर प्रवेश बंद असल्याची नोंद करण्यात आलेली नाही. त्यामुळे ही वाहने प्रवेश बंद असलेल्या मार्गावरून जातात आणि अरुंद रस्तावर समोरून येणाऱ्या वाहनांमुळे त्यांना अडकून पडावे लागते. परिणामी मोठ्या प्रमाणात वाहतुक कोंडी होत आहे.






### इतर वाहनांची रेलचेल

मुंबई-गोवा महामार्गाची दुरवस्था झाली आहे. त्यामुळे मुंबईवरून कोकणाकडे जाणारे प्रवासी पालीतून विळे मार्गे माणगाववरून किंवा वाकणवरूण पुढे जातात. तर, कोकणाकडून येणारी वाहने माणगाववरुन विळे मार्गे पालीतून खोपोलीमार्गे पुणे-मुंबईकडे जातात. परिणामी पालीत वाहनांची रेलचेल वाढून वाहतूक कोंडी अधिकाधिक जटिल होते. महाकाली मंदिराजवळील मार्गावर सिग्नल देखील लावण्यात आला आहे. परंतु, सद्यस्थितीत तो बंद असल्यामुळे कोंडीची समस्या उद्भवत असल्याचे स्थानिकांकडून बोलले जात आहे.

> **येथील रस्ते अरुंद आहेत. शिवाय नो एंन्ट्रीमधुन जाणारी वाहने तापदायक ठरतात. त्यामुळे वाहने अडकून पडून वाहतूक कोंडी जटिल होते. लवकर या नो एंट्री मार्गाची गुगल मॅपवर नोंद करावी, जेणेकरून वाहने प्रवेश बंद असलेल्या रस्त्यावर प्रवेशच करणार नाहीत. आलेले प्रवासी पर्यटक व भाविक यांचे देखील गैरसोय होणार नाही.**
>
> **- अमित निंबाळकर, माजी ग्रामपंचायत सदस्य, पाली**

> **प्रवेश बंद असलेल्या रस्त्याची नोंद गुगल मॅपवर करावी, यासाठी संबधीत विभागासोबत पत्रव्यवहार केला आहे. यासंदर्भात पाठपुरावा देखील करत आहोत. लवकरच त्यांच्यासोबत बैठक बोलावली आहे. रस्त्याच्या सुरुवातीलाच नो एंट्रीचे मोठे फलक लावण्यात आले आहेत. मुख्य रस्त्यांचे डांबरीकरण केले आहे. काही अतिक्रमण केलेली बांधकामे हटवून रस्ता रुंदीकरण केले आहे. वाहन चालकांनी देखील वाहतुकीचे नियम पाळावे व नो एन्ट्रीचे फलक पाहूनच मार्गक्रमण करावे.**
>
> **- सुलतान बेनसेकर, उपनगराध्यक्ष, नगरपंचायत, पाली**


### बाह्यवळण मार्ग लालफितीत

वाकण-पाली-खोपोली राज्यमहामार्गवर बलाप गावावरुन थेट बल्लाळेश्वर मंदिराच्या पाठीमागे झाप गावाजवळ बाह्यवळण मार्ग प्रस्तावित आहे. सार्वजनिक बांधकाम विभागज्ञ्च्या आखत्यारीत हा मार्ग होणार आहे. राज्यशासनाने सन २०१० या वर्षी या रस्त्याला मान्यता दिली आहे. तसेच, त्यावेळी रस्त्यास १८ कोटी तर भूसंपादनासाठी १० कोटींची मंजुरी मिळाली होती. हा मार्ग वाकण-पाली-खोपोली राज्य महामार्ग ५४८(ए) व पाली पाटणूस राज्यमार्ग ९४ला जोडला आहे. यासाठी बलाप, पाली, बुरुमाळी व झाप या गावातील एकूण ९ हेक्टर जागा लागणार आहे. मात्र, हा बाह्यवळण मार्ग लालफितीत अडकला आहे.







● अलिबाग तालुक्यातील नांगरवाडी येथे चित्रलेखा पाटील यांच्या मार्फत रविवारी (दि.४) विद्यार्थ्यांना मोफत सायकल वाटप कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. बीएसएफमध्ये निवड झाल्याबद्दल सृष्टी धुमाळ हिचादेखील सत्कार करण्यात आला.

## निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलिसांची कारवाई
# दीड लाखांचा गुटखा साठा जप्त

- **१ लाख ५६ हजारांचा साठा हस्तगत**
- **दोघांविरोधात गुन्हा दाखल करून अटक**

**| पनवेल | प्रतिनिधी |**

पनवेल महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पनवेल शहर पोलिसांनी आपल्या हद्दीत ऑलआऊट व कोंबिंग ऑपरेशन सुरू केले आहे. त्यानुसार मध्यरात्री पोलिसांनी पनवेल शहरातील उरण नाका येथे लावलेल्या नाकाबंदी दरम्यान कारमध्ये लपवून नेला जाणारा १ लाख ५६ हजार रुपये किमतीचा गुटख्याचा साठा जप्त केला आहे. या कारवाईत पोलिसांनी वाहतूक करणाऱ्या दोघांना अटक करून त्यांची कार देखील जप्त केली आहे.

पनवेल शहर पोलिसांनी त्यांच्या हद्दीत ऑलआऊट व कोंबिंग ऑपरेशन सुरू केली आहेत. त्यानुसार पोलिसांनी शहरातील उरण नाका येथे नाकाबंदी करून वाहनांची तपासणी सुरू केली होती. दरम्यान, मध्यरात्री पनवेल येथून करंजाडेच्या दिशेने जाणारी कार पोलिसांनी तपासणी केली असता त्यात कारच्या मागील सीटवर असलेल्या खाकी रंगाच्या खोक्यात रजनीगंधा सुगंधित पानमसाला, तसेच एका पांढऱ्या रंगाच्या गोणीमध्ये तुलसी रॉयल जाफरानी जर्दा मिळाला. तसेच, या कारच्या डिक्कीमध्ये ७ गोण्यांमध्ये बाजीराव सुगंधी पानमसाला, मस्तानी २१६ प्रीमियर च्युइंग टोबॅको असा १ लाख ५६ हजार रुपये किंमतीचा गुटखा व सुगंधित पानमसाल्याचा साठा आढळून आला. त्यावर पोलिसांनी कारमधील मनीष गोविंद कुमार (४५) व संदीप रामकरण निशाद ऊर्फ संजू या दोघांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडे या गुटख्याबाबत चौकशी केली. त्यांनी हा गुटखा विक्रीसाठी घेऊन जात असल्याचे कबूल केले. त्यानुसार पोलिसांनी या दोघांविरोधात गुन्हा दाखल करून अटक केली आहे. त्यांनी हा प्रतिबंधित गुटखा नेमका कुठून आणण्यात आला आणि त्यामागे कोणते रॅकेट कार्यरत आहे, याचा तपास पनवेल शहर पोलीस करत आहेत.

# कर्जतमध्ये भटक्या कुत्र्यांचा उपद्रव

**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्यातील उमरोली ग्रामपंचायत हद्दीत भटक्या कुत्र्यांचा उपद्रव स्थानिकांसाठी डोकेदुखी बनला आहे. या भटक्या कुत्र्यांनी अनेक लहान मुलांना चावा घेतला आहे. दरम्यान, स्थानिक ग्रामस्थ आणि लहान मुलांचे या भटक्या कुत्र्यांपासून संरक्षण व्हावे यासाठी ग्रामपंचायतीने उपाययोजना करावी, अशी मागणी किशोर गायकवाड यांनी केली आहे.

कर्जत-कल्याण राज्यमार्ग रस्त्यावर असलेल्या उमरोली, आषाणे, पोतदार वसाहत, पाली वसाहत, डिकसळ या गाव परिसरात अनेक भटकी कुत्री आढळून येत आहेत. प्रामुख्याने या भागात कुत्रे आणून सोडले जात असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. त्या नव्याने आलेल्या कुत्र्यांमुळे शाळेत जाणारे विद्यार्थ्यांच्यात प्रचंड भीती निर्माण झाली आहे. दरम्यान, या भटक्या कुत्र्यांनी एकाच दिवसात पाच जणांचे लचके तोडले आहेत. त्यात पोद्दारमधील ऋषिकेश पवार, उमरोली येथील प्रसाद लोंगले, नागो घारे यांच्यासह आणखी तिघांना चावा घेतला असून या सर्वांवर रायगड हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत. त्यामुळे उमरोली ग्रामपंचायतने याची दखल घेऊन भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी स्थानिक अनिकेत सावंत यांनी उमरोली ग्रामपंचायतकडे केली आहे. तर, किशोर गायकवाड यांनी ग्रामपंचायत प्रशासनाने कुत्रे आपल्या ग्रामपंचायत हद्दीत आणून सोडणाऱ्यावर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

## चिन्ह वाटपानंतर प्रचाराला वेग

**| पनवेल | प्रतिनिधी |**

पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक प्रक्रियेतील महत्त्वाचा टप्पा शनिवारी (दि.३) पूर्ण झाला आहे. उमेदवारांना अधिकृत निवडणूक चिन्हांचे वाटप करण्यात आल्यानंतर अंतिम उमेदवारांची यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यामुळे पनवेल महानगरपालिकेतील निवडणूक लढतीचे खरे चित्र स्पष्ट झाले आहे. निवडणूक चिन्हांच्या वाटपात राष्ट्रीय व राज्यस्तरीय पक्षांच्या पारंपरिक चिन्हांसह अपक्ष व छोट्या पक्षांच्या विविध चिन्हांचा समावेश आहे. त्यात कमळ, हात, धनुष्यबाण, खटारा, मशाल, तुतारी वाजवणारा माणूस, घड्याळ, रेल्वे इंजिन, सायकल, हत्ती यांसारख्या ओळखीच्या चिन्हांबरोबरच पुस्तक, कपबशी, शिट्टी, सिमला मिरची, स्टेपलर, गॅस सिलिंडर अशी अनेक चिन्हे यंदाच्या निवडणुकीत मतदारांच्या समोर असणार आहेत.

**पैशाच्या जोरावर भाजप बिनविरोध | मा.आ. बाळाराम पाटील यांची टीका**

# पनवेलमध्ये निवडणुकीआधी 'सत्ता'

**| पनवेल | प्रतिनिधी |**

राज्यात महानगरपालिकेच्या निवडणूकांची रणधुमाळी सुरू आहे. अनेक वर्षांनी या निवडणूका लागल्याने सर्वच पक्षांनी आपली कंबर कसली आहे. परंतु, याचदरम्यान एक मोठी धक्कादायक बातमी समोर आली आहे. यावेळी निवडणूक न लढता राज्यात तब्बल ६७ नगरसेवक निवडून आले आहेत. धक्कादायक म्हणजे हे सर्व नगरसेवक महायुतीतील आहेत. त्यात पनवेलमध्ये देखील भाजपचे सात उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. यावर शेकापचे माजी आमदार बाळाराम पाटील यांनी तिव्र नाराजी व्यक्त करत भाजपवर टिका केली आहे. भाजप पैशाचा वापर करून उमेदवारांना विकत घेत असून याचा बदला पनवेलची जनता घेईल, अशी प्रतिक्रिया देखील त्यांनी दिली आहे.



महानगरपालिका निवडणूक होऊन काही वर्षे झाली आहेत. त्यानंतरही पनवेलमध्ये भाजपच्या सात उमेदवारांची बिनविरोध निवड झाली आहे. पैशांचा वापर करून पनवेलची महायुती महाविकास आघाडीला घाबरवत असल्याचा आरोप शेकापचे माजी आमदार बाळाराम पाटील यांनी केला आहे. पनवेलमध्ये भाजपचे ७ उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. त्यात प्रभाग १८ 'अ'मधून ममता म्हात्रे, प्रभाग १८ 'ब'मधून नितिन पाटील, प्रभाग १८ 'क'मधून स्नेहल ढमाले पाटील, प्रभाग १९ 'अ'मधून दर्शना भोईर, प्रभाग १९ 'ब'मधून रुचिता लोंढे, प्रभाग २० 'अ'मधून अजय बहिरा व प्रियंका कांडपिळे अशी उमेदवारांची नावे आहेत. तसेच, पनवेल बिनविरोध निवडणून आलेल्या स्नेहल ढमाले पाटील या भाजपचे विधानपरिषद आमदार विक्रांत पाटील यांची बहीण आहेत. त्यामुळे पनवेल पालिकेत एकूण ७ उमेदवार बिनविरोध निवडून आल्याने राजकीय वातावरण तापले आहे. शेकाप देखील आक्रमक झाला आहे. दरम्यान, भाजपा महापालिकेच्या पैशांचा वापर करत असल्याचा गंभीर आरोप बाळाराम पाटील यांनी केला आहे. तसेच, बिनविरोध घोषित झालेल्या ठिकाणी मतदान घेण्याची मागणी त्यांनी केली आहे. उमेदवार बिनविरोध निवडून आल्यानंतर प्रतिक्रीया देताना ते माध्यमांशी बोलत होते.

### बिनविरोध नगरसेवकांवर आक्षेप

राज्यातील विविध महापालिका निवडणुकांमध्ये मोठ्या संख्येने उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. ठाणे, कल्याण-डोंबिवली, भिवंडी, पनवेलसह इतर महापालिकांमध्ये एकूण ६७ नगरसेवक बिनविरोध निवडून आले आहेत. एवढ्या मोठ्या संख्येने उमेदवार बिनविरोध निवडून आल्याने विरोधकांनी आक्षेप नोंदविला आहे. याची दखल निवडणूक आयोगाने घेतली असून या बिनविरोध निवडणूकीची माहिती राज्य निवडणूक आयोगाने संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी मागितली आहे. उमेदवारांनी माघार केव्हा घेतली, त्यांनी दबावाचा काही आरोप केला आहे का, याची शहानिशा करून सविस्तर अहवाल आयोगाने जिल्हाधिकाऱ्यांकडून मागवला आहे.

### मोठ्या संख्येने उमेदवार बिनविरोध

मुंबई माहापालिकेसह राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुकांमध्ये अर्ज माघारीच्या शेवटच्या दिवशी म्हणजेच शुक्रवारी (दि.२) अनेक उमेदवारांनी माघार घेतल्याने तब्बल ६७ ठिकाणी सत्ताधारी पक्षांचे उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. त्यात बाजपचे ४५, शिंदे गटाचे १९, अजित पवार गटाचे २ आणि अन्य एक नगरसेवक बिनविरोध निवडून आले आहेत.

# गहाळ झालेले मोबाईल केले परत

**| पनवेल | प्रतिनिधी |**

खारघर पोलिसांनी परिसरातील गहाळ झालेल्या तब्बल ७५ मोबाईल फोनचा शोध घेत हे मोबाईल मूळ मालकांना परत करण्याची उत्तम कामगिरी खारघर पोलिसांनी केली. या मोबाईलची एकूण किंमत सुमारे ११ लाख २५ हजार रुपये इतकी असल्याचे पोलिसांनी सांगितले. केंद्र सरकारच्या सीईआयआर (सेंट्रल इक्युपमेंट आयडेंटीटी रजिस्टर) पोर्टलच्या मदतीने ही कारवाई करण्यात आली आहे. महाराष्ट्रासह इतर राज्यांमधून या मोबाईल फोन शोधून काढत खारघर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजय कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली खारघर पोलिसांनी हे सारे मोबाईल हस्त केले करून ते मूळ मालकांच्या स्वाधीन केले. यापूर्वीही खारघर पोलिसांनी याच तंत्रज्ञानाच्या माध्यमातून ७४ गहाळ मोबाईल शोधून नागरिकांना सुपूर्द केले होते. मोबाईल चोरी व गहाळ होण्याच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर खारघर पोलिसांनी केलेल्या या तंत्रज्ञानाधारित कारवाईचे नागरिकांकडून कौतुक होत आहे. दरम्यान, मोबाईल हरवल्यास नागरिकांनी तत्काळ संबंधित पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवावी तसेच सीईआयआर पोर्टलवर आवश्यक माहिती भरावी, असे आवाहन परिमंडळ ३ चे सहाय्यक पोलीस आयुक्त विक्रम कदम यांनी केले आहे.

# ट्रम्प नावाचा गावगुंड

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी एखाद्या गावगुंडासारखी कृती केली आहे. दक्षिण अमेरिकेतील व्हेनेझुएला या छोट्या देशावर कबजा करण्याच्या शनिवारच्या कारवाईचे दुसऱ्या कोणत्याही रीतीने वर्णन करणे अशक्य आहे. व्हेनेझुएलाचे अध्यक्ष निकोलस मदुरो व त्यांच्या पत्नीला अमेरिकी सैन्याने पकडून अमेरिकेत नेले असून तेथे त्यांच्यावर खटला चालणार आहे. व्हेनेझुएलामध्ये गेली २५ हून अधिक वर्षे डाव्या पक्षाची सत्ता आहे. अमेरिकेला तीच खुपत होती. शिवाय हा खेळ क्रूड तेलाचाही आहे. व्हेनेझुएलामध्ये जगातील एकूण तेलसाठ्यांच्या १७ टक्के तेल आहे. सौदी अरेबिया किंवा अन्य कोणत्याही देशापेक्षा मोठे व जगातील सर्वाधिक तेलसाठे व्हेनेझुएलामध्ये आहेत. त्यावरच अमेरिकेचा डोळा आहे. पूर्वी एक्झॉन मोबिल व गल्फ ऑईल यांसारख्या कंपन्यांच्या हातात या खाणी होत्या. पण १९७६ मध्ये त्यांचे राष्ट्रीयकरण करण्यात आले. तेव्हापासून अमेरिका या देशावर हल्ला करण्यासाठी निमित्त शोधत असते. मदुरो यांच्यापूर्वीचे अध्यक्ष ह्युगो चावेझ यांनी १९९९ मध्ये या कंपन्यांवर अधिक कडक निर्बंध घातले. तेलाच्या धंद्यातून येणारा पैशातून त्यांनी गरिबांसाठी शिक्षण व आरोग्याच्या योजना सुरू केल्या. त्यामुळे ते देशात प्रचंड लोकप्रिय होते. २००२ मध्ये बुश अध्यक्ष असताना अमेरिकेने चावेझ यांच्याविरुद्ध बंड घडवून आणण्याचा प्रयत्न केला होता. पण जनता चावेझ यांच्या बाजूने उभी राहिल्याने ते बंड फसले होते. बुश यांना हात चोळीत बसावे लागले होते. चावेझ यांच्या मृत्यूनंतर मदुरो सत्तेत आले व त्यांनी तीच धोरणे पुढे चालू ठेवली. मात्र त्यांची राजवट अधिक हुकुमशाही पध्दतीची आहे. त्यामुळे ते फारसे लोकप्रिय नाहीत. विरोधकांना दडपून तुरुंगात टाकल्याचे तसेच निवडणुका मोकळ्या वातावरणात होऊ न दिल्याचे त्यांच्यावर आरोप आहेत. हीच संधी साधून ट्रम्प यांनी शनिवारची कारवाई केली. त्यानंतर निदान पहिल्या दिवशी तरी व्हेनेझुएलातील जनता मदुरो यांच्यासाठी रस्त्यावर आली नव्हती. त्यामुळे ट्रम्प यांची ही गुंडगिरी कदाचित खपून जाईल अशी लक्षणे आहेत.

## सगळे काही तेलासाठी

ट्रम्प यांनी या हल्ल्याची तयारी गेल्या सहा महिन्यांपासून चालवली होती. आरंभी व्हेनेझुएलामधून अंमली पदार्थांची प्रचंड तस्करी होते व व्हेनेझुएलातील गुंड येऊन अमेरिकेत अशांतता निर्माण करतात असा कांगावा सुरु करण्यात आला. प्रत्यक्षात याचे कोणतेही ठोस पुरावे उपलब्ध झालेले नाहीत असे अमेरिकेतील माध्यमेच नव्हे तर खुद्द ट्रम्प यांच्या रिपब्लिकन पक्षाचे खासदारही म्हणत आहेत. गेल्या चार महिन्यांमध्ये अमेरिकेने समुद्रातील बोटींवर असंख्य हल्ले केले असून त्यात व्हेनेझुएलाचे किमान शंभर नागरिक मारले गेले आहेत. हे सर्व अमली पदार्थांचे तस्कर होते व या बोटींमध्ये अंमली पदार्थ वाहून नेले जात होते असा अमेरिकेचा दावा आहे. पण त्यासाठीही कोणताही पुरावा आजतागायत दिला गेलेला नाही. शनिवारी लष्करी कारवाई करण्याआधीदेखील राजधानी कॅराकसवर असेच हल्ले केले गेले. व्हेनेझुएलासोबत कोणीही तेलाचा व्यापार करण्यावर बरीच बंधने आधीच घालण्यात आली आहेत. मध्यंतरी शेल नावाच्या ब्रिटीश कंपनीला व्हेनेझुएलामध्ये तेलाची खाण सुरू करायची होती तर तिला अमेरिकेने परवानगी नाकारली. अलिकडेच भारताने रशिया किंवा इराणकडून तेल घेता कामा नये असे बंधन ट्रम्प सरकारने टाकले होते. त्याहूनही भयंकर असा हा प्रकार होता. कारण व्हेनेझुएलाचे कोणतेही अपराध आंतरराष्ट्रीय कोर्टात सिध्द झालेले नाहीत. संयुक्त राष्ट्रसंघ किंवा अनेक देश असलेल्या जी–आठसारख्या संघटनांनी त्या देशाविरुध्द कोणताही ठराव संमत केलेला नाही. तरीही अमेरिकेची ही दादागिरी चालू आहे. याचे कारण चीनचे आर्थिक व औद्योगिक सामर्थ्य वाढल्यापासून अमेरिका आर्थिक अडचणीत आहे. तेथील महागाई व बेकारी वाढते आहे. त्यामुळे गरीब देशांकडच्या तेलावर डल्ला मारून आपली तिजोरी भरण्याचा ट्रम्प यांचा प्रयत्न आहे. यापूर्वी इराणवरही याच कारणास्तव हल्ले करण्यात आले. त्यासाठी इराण अण्वस्त्र निर्मिती करतो असे कारण देण्यात आले. पण प्रत्यक्षात इराणच्या तेल व्यापारावर अमेरिकेला अनेक वर्षांपासून ताबा हवा आहे. हे त्यामागचे छुपे कारण आहे. आता व्हेनेझुएलावर हल्ला केल्यानंतर तर ट्रम्प यांनी निर्ल्लज्जपणे सांगून टाकले आहे की, तिथला तेलाचा धंदा अमेरिकी कंपन्या चालवतील आणि पुढचे काही दिवस हा देश अमेरिका चालवेल.

## सगळे देश गप्प


अमेरिकी कायद्यानुसार अन्य कोणत्याही देशात लष्करी कारवाई करायची असेल तर अमेरिकी संसदेची परवानगी घ्यावी लागते. पण ही कारवाई करण्यापूर्वी संसदेला कळवण्यात देखील आलेले नाही. थोडक्यात ट्रम्प नावाच्या माफियाच्या मनात आले की तो अमेरिकेचे बॉंब उचलून कोणावरही फेकू शकतो अशी ही स्थिति आहे. निकोलस मदुरो हे हुकुमशहा होते, त्यांनी विरोधकांना तुरुंगात टाकले होते, त्यांच्या काळात लक्षावधी नागरिकांनी परदेशात पलायन केले असे सांगितले जाते. त्यात तथ्य असले तरीही म्हणून तेथे अशी कारवाई करण्याचा कोणताही अधिकार अमेरिका किंवा कोणत्याही देशाला प्राप्त होत नाही. आज ट्रम्प यांच्या आयातशुल्कांच्या धोरणांमुळे जगातील सर्व देश नाराज आहेत. ट्रम्प यांच्या गुंडगिरीमुळे खुद्द अमेरिकेतही खदखद आहे. पण म्हणून उद्या चीन किंवा युरोपीय देशांनी अमेरिकेवर हल्ला करून ट्रम्प यांचे सरकार उलथून टाकणे क्षम्य होणार नाही. तोच प्रकार इथेही आहे. दुर्दैवाने ट्रम्प यांना रोखण्यासाठी आज एकही देश पुढे येत नाही. चीन व रशियाने व्हेनेझुएलातील कारवाईचा कडक शब्दात निषेध केला आहे. पण त्यापुढे जाऊन त्यांनी अमेरिकेवर निर्बंध लादण्यासाठी काही पुढाकार घ्यायला हवा. अर्थात, युक्रेन हल्ला करणारा रशिया आणि तैवानवर हल्ला करण्याच्या तयारीत असणारा चीन याबाबत काहीही करू शकणार नाही हे उघड आहे. एरवी जगाला शहाणपणा शिकवणारे ब्रिटन, फ्रान्स इत्यादींना पहिल्या प्रतिक्रियेमध्ये ट्रम्प यांच्या हल्ल्याचा निषेध करण्याचे धाडसदेखील दाखवता आलेले नाही. जर्मनीने मात्र निषेध केला आहे. आणि, विश्वगुरु म्हणवून घेणाऱ्या भारताविषयी काय बोलावे? ट्रम्प यांच्यापुढे लोटांगण घालणारे आणि गेल्या काही काळात त्यांची थेट भेट टाळणारे नरेंद्र मोदी या हल्ल्याबाबत चकार शब्दही काढू शकणार नाहीत. भारत कदाचित गुळमुळीत भाषा वापरेल. आंतरराष्ट्रीय कायद्याचे पालन व्हावे वगैरे म्हणेलही. पण अमेरिकेच्या गुंडगिरीचा जोरदार निषेध तो नक्की करणार नाही. यंदाचे शांततेचे नोबेल पारितोषिक ट्रम्प यांना ते हवे होते. त्यासाठी आपण किती युद्धे थांबवली हे ते वारंवार सांगत होते. पण प्रत्यक्षात ते त्यांना न मिळता व्हेनेझुएलाच्या विरोधी पक्षनेत्या मारियो मच्याडो यांना देण्यात आले. मच्याडोबाईंनी ते ट्रम्प यांना अर्पण करून टाकले होते. तेव्हाच या कारस्थानाची बीजे रोवली गेली होती असे आता म्हणता येते. आता मच्याडो यांनी या कारवाईचे स्वागत केले आहे. उद्या ट्रम्प यांनी त्यांना सरकारात बसवले तरीही ट्रम्प यांच्या बाहुली म्हणूनच त्यांना वावरावे लागेल. अमेरिका व्हेनेझुएलाला कायमची गुलाम करून सोडेल यात शंका नाही.

विचार

# केरळमध्ये रणांगण सजतेय...

***गोवा आणि महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये भाजपने बाजी मारली आणि त्याचे कौतुकही झाले. या गदारोळात भाजपचा केरळमधील शिरकाव मात्र दुर्लक्षिला गेला. येथे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये पक्षाने दखलपात्र विजय मिळवला. येत्या काळात या राज्यात काँग्रेस आपले स्थान बळकट करेलच, पण भाजपचा चंचूप्रवेश आणि काही भागातील मुसंडीही दुर्लक्षिता येणार नाही.***

डॉ. सुकृत खांडेकर




गोवा आणि महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये भाजपने बाजी मारली आणि त्याचे कौतुकही झाले. या गदारोळात भाजपचा केरळमधील शिरकाव मात्र दुर्लक्षिला गेला. येथे पक्षाने नेत्रदीपक वगैरे कामगिरी बजावली नसली, तरी दखलपात्र विजय मात्र मिळवले आहेत. येत्या काळात या राज्यात काँग्रेस आपले स्थान बळकट करेल, हे स्पष्टपणे दिसत असतानाच आता भाजपचा चंचूप्रवेशही केरळमध्ये दुर्लक्षिता येणार नाही, अशी परिस्थिती आहे. म्हणूनच या राज्यातील राजकीय घडामोडींचा तपशिलात जाऊन वेध घेणे आवश्यक आहे. केरळमध्ये झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वाखालील डाव्या आघाडीला जबर फटका बसला, काँग्रेसप्रणित आघाडीची सरशी झाली तर भाजपने राज्याची राजधानी असलेल्या तिरूअनंपुरमवर भगवा फडकवला. या निवडणुकीत १०१ पैकी ५० जागा भाजपने जिंकल्या, काँग्रेसप्रणित युडीएफला २९ तर मार्क्सवादीप्रणित एलडीएफला केवळ १९ जागा मिळाल्या. तिरूअनंतपुरम येथील शहरी मतदारांनी गेल्या ४५ वर्षांची डाव्या आघाडीची मक्तेदारी यंदाच्या निवडणुकीत मोडून काढली. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भाजपने केलेल्या कामगिरीबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पक्षाच्या कार्यकर्त्यांचे ट्वीट करून अभिनंदन केले. केरळमधील सहापैकी चार जागा काँग्रेसप्रणित युडीएफने तर एक जागा भाजपाप्रणित एनडीएने जिंकली. २०२० मध्ये झालेल्या निवडणुकीमध्ये भाजपाने १५९२ वॉर्डांमध्ये विजय मिळवला होता. यंदा १९१९ वॉर्डात विजय मिळवला. पुढील वर्षी केरळ विधानसभेची निवडणूक होणार आहे. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या या निकालाकडे सेमी फायनल म्हणून बघितले जात आहे.

वस्तुत: तिरूअनंतपुरममधील भाजपाचा विजय हा काँग्रेस पक्षाला मोठा धक्का आहे. याच मतदारसंघातून काँग्रेसचे शशी थरूर लोकसभेवर खासदार म्हणून निवडून येतात. गेले काही महिने ते विविध विषयांवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची उघडपणे प्रशंसा करत आहेत. थरूर यांनी केलेले मोदी सरकारचे कौतुक ही त्यांची वैयक्तिक भूमिका आहे असे सांगून काँग्रेसचे प्रवक्ते हात झटकत असतात, पण आता मात्र तिरूअनंतपुरम महापालिकेवर भाजपाचे कमळ फुलल्यामुळे काँग्रेसला धक्का बसला आहे. शशी थरूर काँग्रेसच्या बैठकांना गैरहजर राहतात, पण काँग्रेसचे श्रेष्ठी त्यांची पक्षातून हकालपट्टी करत नाहीत. केरळमधील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये काँग्रेस पक्षाने बऱ्यापैकी कामगिरी बजावली. ग्रामीण भागात काँग्रेसप्रणित युडीएफ आणि मार्क्सवादीप्रणित एलडीएफ यांच्यातच सामना झाला. मात्र शहरी भागात भाजपाने जम बसवायला सुरूवात केली आहे. त्रिपुनिथुर आणि पलक्कड नगरपालिकेत भाजपाने चांगले यश मिळवले. २०२४ मध्ये झालेल्या निवडणुकीच्या निकालानेच केरळमधे राजकीय समिकरणे आता बदलत आहेत, याचे संकेत दिले होते. काँग्रेस पक्ष डाव्या आघाडीपेक्षा चांगली कामगिरी बजावेल अशी सर्वत्र अपेक्षा होती. पण त्रिशूरमधून भाजपाला विजय मिळेल असा अंदाज कोणी व्यक्त केला नव्हता.

लोकसभा निवडणुकीमध्ये मल्याळी चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेता सुरेश गोपी यांनी त्रिशूर मतदारसंघातून सीपीआय (भारतीय कम्युनिस्ट पक्ष) च्या उमेदवाराचा ७४,६८६ मतांनी पराभव करणे हेच मुळात आश्चर्यकारक होते. कम्युनिस्टांचे वर्चस्व असलेल्या केरळ राज्यातून कमळाच्या चिन्हावर लोकसभेत निवडून जाणारे भाजपाचे ते पहिले खासदार ठरले. केरळमध्ये लोकसभेच्या २० जागा आहेत. पैकी १८ जागांवर काँग्रेसप्रणित संयुक्त लोकशाही आघाडीचे (युडीएफ) उमेदवार खासदार म्हणून विजयी झाले तर डाव्या आघाडीचा केवळ एकच खासदार निवडून आला. लोकसभा निवडणुकीत भाजपाने खाते उघडलेच, पण आजवरची सर्वाधिक १९.१४ टक्के मते मिळवली. ही तर भाजपाची सुरूवात होती.

काही वर्षांपुर्वी पश्चिम बंगाल व केरळ ही दोन राज्ये डाव्या आघाडीचे गड म्हणून ओळखले जात असत. तृणमूल काँग्रेसच्या ममता बॅनर्जी यांनी कम्युनिस्टांचा गड उद्‌ध्वस्त करून दाखवला. आता काँग्रेसने केरळमध्ये कम्युनिस्ट गडाला हादरे देण्यास सुरूवात केली आहे. केरळमध्ये आता भाजपानेही शिरकाव केला असून डाव्या लोकशाही आघाडीबरोबरच संयुक्त लोकशाही आघाडीशी भाजपाला लढावे लागणार आहे. २०१६ मध्ये केरळमधे डाव्या आघाडीची सत्ता आली आणि पुन्हा २०२१ मध्ये केरळमध्ये सत्ता कायम राखण्यात डाव्या आघाडीला यश मिळाले. गेली दहा वर्षे केरळमध्ये डाव्या आघाडीची सत्ता आहे. काँग्रेस पक्षाचा प्रभाव आणि भाजपाचा शिरकाव डाव्या आघाडीला महागात पडू शकतो. आर्थिक घोटाळे आणि घराणेशाहीचे आरोप यांनी डाव्या आघाडी सरकारला घेरले आहे. सत्ताधारी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाला अंतर्गत वादाने पोखरले आहे. त्याचा परिणाम संघटनेवर झाला आहे.

भाजपाने पश्चिम बंगाल आणि केरळ या दोन राज्यांवर लक्ष केंद्रीत केले आहे. आगामी विधानसभा निवडणुकीमध्ये या राज्यांमध्ये सत्ता आणण्यासाठी भाजपने कठोर रणनिती बनवली आहे. केरळमध्ये भाजपाची ताकद वाढेल, तसा डाव्या आघाडीचा संकोच होत जाईल. संयुक्त लोकशाही आघाडी आणि डावी लोकशाही आघाडी या दोन आघाड्यांमधे केरळचे राजकारण आजवर फिरत आले आहे. देश पातळीवर डावे पक्ष आणि काँग्रेस एकमेकांना साथ देत असले तरी केरळमध्ये कम्युनिस्ट विरूध्द काँग्रेस या संघर्षाला धार आहे. आता या लढाईत भाजपाने तिसरा खेळाडू म्हणून प्रवेश केला आहे. आजवर भाजपाची उपस्थिती दक्षिण केरळपुरती मर्यादीत होती. पण २०१४ पासून म्हणजे राष्ट्रीय क्षितिजावर नरेंद्र मोदी यांचा उदय झाल्यापासून केरळमध्ये भाजपाचे आकर्षण वाढू लागले आहे. गेल्या वर्षी तिरूअनंतपुरम लोकसभा मतदारसंघातून काँग्रेसचे शशी थरूर हे अवघ्या १५,४७० मतांनी विजयी झाले आहेत. त्याच्या विरोधात भाजपाचे ओ. राजगोपाल यांना दुसऱ्या क्रमांकाची मते मिळाली. २०१६ मध्ये तिरूअनंतपुरम जिल्ह्यातील नेमोम विधानसभा मतदारसंघातून भाजपाचा आमदार निवडून आल्यापासून भाजपाच्या मतांच्या टक्केवारीमध्ये सतत वाढ होत आहे.

केरळमध्ये अल्पसंख्यांक मतदार ही युडीएफ आणि एलडीएफ आघाडीची व्होट बँक मानली जाते. राज्यात ४५ ते ५० टक्के मतदार अल्पसंख्य आहे. लोकसंख्येत मुस्लिमांची संख्या २८ टक्के तर ख्रिश्चनांची संख्या १८ टक्के आहे. मुस्लिम तसेच ख्रिश्चन मतदार मोठ्या संख्येने काँग्रेसप्रणित संयुक्त लोकशाही आघाडीला मतदान करतो. २६ टक्के मतदार असलेली एझवा व्होट बँक ही प्रामुख्याने एलडीएफ (डावी आघाडी) यांना मतदान करते. १४ टक्के मतदार असलेली नायर व्होट बँक मात्र भाजपाकडे वळली आहे. मुस्लिमांची मते भाजपाला मिळण्याची शक्यता कमी आहे. ख्रिश्चन तसेच एझवा मतदारांना आकर्षित केल्याशिवाय निवडणुका जिंकता येणार नाहीत, हे भाजपाला कळून चुकले आहे. येथे भारत धर्म जनसेना (बीडीजेएस) नावाची राजकीय संघटना स्थापन करण्यामागे भाजपाची भूमिका महत्वाची आहे. एझवा समाजाचे प्रतिनिधीत्व करणारे श्री नारायण धर्म परिपालन योगम यांनी नवे संघटन (एनएसडीपी) सुरू केले. बीडीजेएस भाजपाचा मित्रपक्ष म्हणून केरळमध्ये काम करत आहे. एझवा मतदारांना एनडीएकडे आकर्षित करण्याचे काम या माध्यमातून सुरू झाले आहे.

ख्रिश्चन मतदारांना आकर्षित करण्यासाठी गेल्या काही वर्षांपासून एनडीएचे प्रयत्न सुरू झाले आहेत. मान्यवर ख्रिश्चनांना एनडीएच्या मंचावर निमंत्रण देण्यास सुरूवात झाली आहे. नाताळ व ईस्टरमध्येही ख्रिश्चनांच्या घरी जाऊन शुभेच्छा दिल्या जात आहेत. नाताळनिमित्त स्नेहयात्रा आयोजित केल्या जात आहेत. त्रिशूर मतदारसंघात मागे भाजपाचा उमेदवार विजयी झाला, तेथे २१ टक्के मतदार ख्रिश्चन आहेत. त्यापैकी काहींनी निश्चितच भाजपाला मतदान केले आहे. डाव्या आघाडीच्या विरोधात राज्यात नाराजी वाढत आहे. सत्ताविरोधी लाट प्रबळ होत आहे. डाव्या आघाडीचे सरकार मुस्लिमांचे लांगुलचालन करत असल्याचा समज वाढतो आहे. मुस्लिमांचा आर्थिक प्रभाव वाढत असल्याने ख्रिश्चनांमधील नाराजी वाढली आहे. कम्युनिस्ट पक्षाचे केडर मोठे असले तरी विविध कारणांमुळे पक्षात खदखद आहे. केरळमधे ५४ टक्के लोकसंख्या हिंदू आहे पण आजवर राजकारणात हिंदू हा शब्द नव्हता. २०१४ पासून हिंदू मतदारांना त्यांच्या अस्तित्वाची जाणीव करून देण्यास सुरूवात झाली. हिंदू व्होट बँकेचा उदय झाला. त्याचाच लाभ भाजपाला होऊ लागला आहे.

# नवे वर्ष नवे ‘व्हिजन’

वैष्णवी वाडकर




सरत्या वर्षाला निरोप देत संपूर्ण जगाने नव्या वर्षात पाऊल टाकले आहे. अनेकांच्या मते काहीही बदलत नाही, सगळं जसं आहे तसचं राहतं. फक्त कॅलेंडर बदलतं. मात्र, नववर्ष म्हणजे नवी उमेद, नव्या संधी आणि नवे संकल्प घेऊन येणारा काळ असतो. अनेकांचा नववर्ष संकल्पांवर विश्वास नाही. पूर्वीच्या काळात नववर्ष साजरे करण्याची अशी संकल्पनाच नव्हती. ही संकल्पना पाश्चात्य देशांतून आलेली आहे. हिंदू नववर्ष तर गुढीपाडव्यालाच सुरू होते. मात्र, पाश्चात्य पद्धतीने साजरे होणारे नववर्ष आजच्या ‘जनरेशन झी’साठी स्वतःला शिस्त लावण्याची, आयुष्यात बदल घडवण्याची प्रेरणा देताना दिसत आहे. त्यांच्यातून दरवर्षी व्हिजन बोर्डची संकल्पना राबवली जाते. परंतु, सगळ्यांकडूनच नव संकल्पांची पुर्तता होतेच असं नाही. त्यामुळे ‘जनरेशन झी’ दरवर्षी नव नवीन व्हिजन राबवत असल्याचे निष्पन्न होत आहे.

आजकाल इंग्रजी वर्षातील शेवटचा दिवस जणू एखाद्या सणासारखाच साजरा केला जातो. नुकतेच २०२५ला निरोप देत नागरिकांनी २०२६चे जल्लोषात स्वागत केले. यावेळी संपूर्ण कुटुंब एकत्र येते, चांगल्या जेवणाचा बेत आखला जातो, गाणी लावून नाचणे, गप्पा–गोष्टी करणे अशा आनंदी क्षणांत वर्षाचा शेवट केला जातो. वर्षभराच्या आठवणी, अनुभव आणि आनंद या एका दिवसात साठवून नव्या वर्षाकडे आशेने पाहिले जाते. ‘जनरेशन झी’ने नवीन वर्ष साजरे करण्याचे खूप मनावर घेतले आहे. कारण त्यातूनच त्यांना नवे संकल्प ठरवायची संधी मिळते आणि हे नवे संकल्प सध्या त्यांच्या आयुष्यात महत्वाचे ठरत आहेत. त्यांच्यासाठी सोशल मीडिया हा कला–गुणांना वाव देणारा सर्वात मोठा मंच बनत आहे. याच सोशल मीडियाच्या माध्यमातून ‘नवे वर्ष, नवा संकल्प’ या संकल्पनेलाही चालना मिळताना दिसत आहे. इंस्टाग्राम आणि यूट्यूबसारख्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरून अनेकांनी कंटेंट क्रिएशन सुरू केले असून त्यामध्ये तरुणांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग आहे. कंटेंट क्रिएशनच्या माध्यमातून दैनंदिन आयुष्यातील घडामोडी, बाहेर फिरण्याचे अनुभव, तसेच काही वेगळे, मजेशीर किंवा विनोदी व्हिडिओ तयार करून ते सोशल मीडियावर शेअर केले जातात. या व्हिडिओंना पाहून काही जण कौतुक करतात, तर काही जण टीकादेखील करतात. मात्र, या प्रतिक्रिया तरुणांना स्वतःकडे पाहण्याची, सुधारणा करण्याची आणि पुढे जाण्याची प्रेरणा देतात. यामुळेच ‘जनरेशन झी’साठी सोशल मीडिया केवळ करमणुकीचे साधन न राहता स्वतःची ओळख निर्माण करण्याचे व कला–गुण सादर करण्याचे आणि नवे संकल्प प्रत्यक्षात उतरवण्याचे प्रभावी व्यासपीठ ठरत आहे.

या सोशल मीडिया किंवा कंटेंट क्रिएशनच्या माध्यमातूनच नवे संकल्प ठरवले जात आहे व त्या नव्या संकल्पनांवर तरुण मंडळी जिद्दीने काम करत आहे. आपले नवे संकल्प प्रत्यक्षात साध्य करत ते लोकांना कंटेंट क्रिएशनच्या माध्यमातून दाखवत आहेत. सोशल मीडियाच्या माध्यमातून मुख्यतः तरुण मंडळी त्यांचा व्हिजन बोर्ड दाखवत आहे आणि तुम्हाला पण नवीन वर्षात तुमचं ध्येय गाठायचं आहे, तर तुम्ही पण व्हिजन बोर्ड बनवा, असे आव्हान करत आहेत. त्यामुळे सध्या नवीन वर्ष नवे संकल्प आणि व्हिजन बोर्डची चर्चा चांगली रंगत आहे. त्यामुळे नव्या वर्षाचे नवे संकल्प पूर्ण करण्यासाठी व्हिजन बोर्ड ही एक वेगळीच संकल्पना निर्माण होत असल्याचे चित्र दिसत आहे.

व्हिजन बोर्डची संकल्पना अगदी मजेशीर आहे. एका कार्डबोर्डवर नवीन वर्षात आपल्याला कोणते नवीन संकल्प पूर्ण करायचे आहेत. त्याचे छायाचित्र एकत्रित चिटकवले जातात आणि तो व्हिजन बोर्ड घरातील भिंतीवर किंवा घरात कुठेही ठेवला जातो. व्हिजन बोर्ड सतत नजरे समोर पडल्याने नव संकल्पांची आठवण होते आणि ते नवे संकल्प पूर्ण करण्यासाठी सातत्याने मेहनत घेतली जाते. या व्हिजन बोर्डमुळे संकल्प पूर्ण करण्याची प्रेरणा निर्माण होते. या बोर्डचा अनुभव अनेक तरुणांनी घेतला आहे आणि तो अनुभव सोशल मीडियावर सांगितलादेखील आहे. सगळ्यांच्या व्हिजन बोर्डवरील काही संकल्प हे सारखे होते. ते म्हणजे, नियमित व्यायाम, निरोगी अन्न, करिअरसंबंधित संकल्प, पैशांची बचत आणि वर्षातून एखादी सहल करणे. यातून एक गोष्ट समजते कि, ‘जनरेशन झी’ एक चांगले आयुष्य जगण्याचे स्वप्न बघत आहेत आणि स्वतःला शिस्त लावणे हे त्यांच्यासाठी अधिकाधिक महत्वचे ठरत आहे. अर्थातच संकल्प पूर्ण करण्यासाठी नव्या वर्षाचे निम्मित किंवा व्हिजन बोर्डच हवा असे नाही, ठरवलं तर आपले ध्येय गाठण्यासाठी आपण कधी ही सुरुवात करू शकतो. मात्र, ‘जनरेशन झी’ची व्हिजन बोर्डची संकल्पना विशेषतः त्यांच्यासाठी मजेशीर आणि प्रेरणादायी ठरत आहे.

लोकसंसद

## ‘कलंकित महाराष्ट्र’

छत्रपती शिवाजी महाराज यांनी ज्या भूमीत त्यागी वृत्ती, नि:स्वार्थता, धर्माधिष्ठता, नीतिमत्ता, धर्म आणि राष्ट्र हित जोपासणाऱ्या व्यक्तींचे स्वराज्य निर्माण केले त्याच भूमीत, महाराष्ट्रात सध्या जे काही घडत आहे ते धक्कादायक चिंताजनक आणि तितकेच लाजिरवाणे ही आहे. याचे कारण म्हणजे १५ जानेवारीला महानगरपालिकेच्या निवडणुका होणार आहे. या पार्श्वभूमीवर अर्ज भरणे, उमेदवारी मिळवणे, तिकीट वाटप, जागा वाटप, आरक्षण आणि पक्षांतर्गत गटबाजी या घटनांना आलेले विकृत आणि हिंसक स्वरूप अतिशय घातक आहे. जागा मर्यादित पण इच्छुकांचे प्रचंड मोठी संख्या असल्याने मोठ्या प्रमाणात संघर्ष निर्माण होत आहे. याचे पर्यावसान वाद, हिंसा, हाणामारी होताना दिसते आहे त्यामुळे कुठेच अलबेल राहिले नाही. निवडणुकीच्या प्रारंभीच सगळीकडे गोंधळ, अस्थिरता, अनिश्चितता आणि निराशा असे चित्र दिसून येत आहे, नाराजी नाट्याच्या (कु) संस्कृतीमुळे राज्याची प्रतिमा मलीन होत चालली आहे. निवडणूक म्हणजे लोकशाहीचा उत्सव असतो. संबंधित क्षेत्राच्या सर्वांगीण विकास करणे हा निवडणुकीचा उद्देश असतो. सध्याचे अस्थिर, नितिमत्ताहीन राजकारण पाहता हा उद्देश डावलून व्यक्तिगत राजकारण असे झाले आहे. गंभीर गुन्हे करणाऱ्यांना उमेदवारी दिली जाते. कारागृहातून उमेदवार निवडणूक लढवतो ही कोणती लोकशाही आहे? या सगळ्या सावळ्या गोंधळामुळे राजकारणाची बजबजपूरी झाली असून दुर्दैवाने त्यात महाराष्ट्र बरबटला आहे. सध्याच्या राजकारणात तत्वे, मूल्ये राहिलेली नाही केवळ संधी साधूपणा आला आहे. कधी नव्हे तर अत्यंत हीन पातळीच्या राजकीय व्यभिचार सुरू झाला आहे. स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजे केवळ सत्ता मिळवण्याचे साधन होऊ नये तर लोकांच्या समस्या सोडवण्यास प्राधान्य द्यायला हवे. व्यक्तिगत महत्त्वाकांक्षा किंवा राजकारणापेक्षा निर्णय प्रक्रियेत पारदर्शकता आणि सार्वजनिक हिताला प्राधान्य देऊन महाराष्ट्रातील लोकशाहीला स्थिरत्व मिळवून द्यायला हवे. ‘‘त्यागी वृत्ती आणि निस्वार्थता यांना तिलांजली देणाऱ्या राजकारणाला तिलांजली देण्याची वेळ आता आली आहे.’’

**– लीना मकरंद गाडगीळ, पनवेल**

विशेष

# भारतीय संगीतकार सी. रामचंद्र



हिंदी तसेच मराठी चित्रपटसृष्टीतील विख्यात संगीत दिग्दर्शक व पार्श्वगायक रामचंद्र नरहर चितळकर ऊर्फ सी. रामचंद्र यांनी अनेक गाणी गायली आहेत. त्यांचा जन्म पुणतांब्याजवळील चितळी या गावी १९१८ रोजी झाला! ङ्गसी. रामचंद्रफ हे संक्षिप्त नाव त्यांनी सिनेदिग्दर्शक जयंत देसाई ह्यांच्या सूचनेवरुन धारण केले. आपल्या निकटवर्तीय व आप्तेइष्टांमध्ये ते ‘अण्णा’ या नावाने प्रसिद्ध होते. संगीतकार म्हणून त्यांची कारकीर्द कायमच झळाळती राहिली. त्यांच्या कारकीर्दीत त्यांनी १२० हिंदी, सात मराठी, पाच तामिळ, तीन तेलुगु आणि एका भोजपुरी बोलपटात त्यांनी आठशेहून अधिक गाणी संगीतबद्ध केली. त्यात ३५ हून अधिक गाणी त्यांनी स्वत: गायली आहेत. शालेय शिक्षणात त्यांना फारसे स्वारस्य नव्हते; पण संगीताची अतोनात आवड होती. नागपूरच्या ‘श्रीराम संगीत विद्यालया’त त्यांनी संगीताचे पहिले धडे गिरविले. गांधर्व संगीत महाविद्यालयात त्यांनी पं. विनायकबुवा पटवर्धन यांच्या हाताखाली गायकीचे धडे घेतले. संगीतासह त्यांना अभिनयाचीदेखील आवड होती. नागानंद या सिनेमाच्या माध्यमातून त्यांनी सिनेसृष्टीत पदार्पण केलं. पण त्यांचा हा सिनेमा बॉक्स ऑफिसवर आपली जादू दाखवण्यात कमी पडला. त्यांना जयक्कोडी हा तमिळ चित्रपट संगीतदिग्दर्शनासाठी मिळाला. सी.रामचंद्र यांनी संगीत असलेला हा पहिला चित्रपट. त्यानंतर वनमोहिनी हा आणखी एक तमिळ चित्रपट त्यांना मिळाला. मा. भगवान यांच्या सुखी जीवन या चित्रपटातील ङ्गसारे जहाँसे अच्छाफ ह्या गीतामुळे संगीतकारांच्या जगात त्यांच्या नावाचा बोलबाला झाला. जयंत देसाई प्रॉडक्शन्सचे जबान, मनोरमा, ललकार, चंद्रगुप्त असे काही चित्रपटही त्यांनी केले. पुढे हिंदी चित्रपटसृष्टीतील ख्यातनाम कवी प्रदीपजी ह्यांच्यामुळे शशीधर मुखर्जी ह्यांच्या ‘फिल्मिस्तान’ या चित्रपटसंस्थेत सी. रामचंद्रांचा प्रवेश झाला. या चित्रपटसंस्थेच्या शहनाई या चित्रपटाला त्यांनी दिलेले संगीत–विशेषतः त्यातील आना मेरी जान संडे के संडे हे गाणे खुपच लोकप्रिय ठरले. या चित्रपटामुळे सी.रामचंद्र हे नाव सर्वत्र गाजले. सी. रामचंद्र यांनी संगीतबद्ध केलेली काही हिंदी चित्रपटगीते अविस्मरणीय ठरली आहेत. यात जाग दर्दे इष्क जाग, जिंदगी प्यार की दो चार घडी होती है, आधा है चंद्रमा रात आधी, देख तेरे संसार की हालत, कैसे आऊँ जमुना के तीर, कितना हसीन है मौसम, गोरे गोरे ओ बांके छोरे, इना मिना डिका, कटते है दुख मे ये दिन, तुम क्या जानो, तुम्हारी याद मे, आँखो मे समा जाओ, इस दिलमें रहा करना, जलनेवाले जला करे या गाण्यांचा समावेश आहे.

सी. रामचंद्र यांनी हिंदीबरोबरच काही मराठी, तमिळ, तेलुगू व भोजपुरी चित्रपटांनाही संगीत दिले. भारताचे तत्कालीन पंतप्रधान पं.जवाहरलाल नेहरु यांच्या उपस्थितीत सी. रामचंद्र यांनी लता मंगेशकर यांच्या आवाजात दिल्ली येथे २७ जानेवारी १९६३ रोजी सादर केलेल्या ऐ मेरे वतन के लोगो या गीताला मिळालेला अभूतपूर्व प्रतिसाद हा त्यांच्या आयुष्यातला सर्वोच्च आनंदाचा आणि अभिमानाचा क्षण होता. हृदयस्पर्शी व प्रेरणादायी असे हे गीत आजही पूर्वीइतकेच लोकप्रिय आहे. सी. रामचंद्रांनी माझ्या जीवनाची सरगम हे आपले आत्मचरित्र १९७७ साली लिहिले. ५ जानेवारी १९८२ रोजी त्यांचे निधन झाले.

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

**५ जानेवारी**

१) श्री. सदाशिव नामदेव मोकल
श्रीबाग, ५-१-१९४१

२) श्री. शंकर लक्ष्मण बोभाटे
अलिबाग, ५-१-१९५७

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचाफोटोकृषीवलमध्येछापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

# यूपीआयला प्रवाशांची पसंती

**● एसटीच्या खात्यात ३०० कोटींचा महसूल**

**। रायगड । प्रतिनिधी ।**

राज्य परिवहन महामंडळाच्या (एसटी) बससेवेमध्ये डिजिटल व्यवहारांना प्रवाशांकडून मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळत असून फोन पे, गुगल पे व तत्सम यूपीआय पेमेंटच्या माध्यमातून तिकीट काढण्याच्या प्रमाणात सातत्याने वाढ होत आहे. सप्टेंबर ते डिसेंबर २०२५ या कालावधीतील आकडेवारीनुसार एसटी महामंडळामध्ये दररोज लाखोंच्या संख्येने यूपीआय व्यवहार यशस्वीरीत्या पूर्ण होत आहेत.

या चार महिन्यांत एसटीला डिजिटल व्यवहारांच्या माध्यमातून ३०० कोटींचा महसूल मिळाला आहे..एसटी महामंडळाच्या आकडेवारीनुसार, सप्टेंबर २०२५मध्ये एकूण सुमारे ४९.७९ लाखांहून अधिक यूपीआयद्वारे तिकीट व्यवहार झाले असून त्यातून ६४ कोटी रुपयांचा महसूल जमा झाला आहे. ऑक्टोबरमध्ये ही संख्या वाढून ७७.३२ कोटी रुपयांपर्यंत पोहोचली. तर नोव्हेंबर २०२५ मध्ये यूपीआय व्यवहारांमधून सुमारे ७८.६६ कोटी रुपयांचा महसूल मिळाल्याची नोंद करण्यात आली.डिसेंबर २०२५ मध्येही हीच वाढ कायम राहिली असून, एकूण सुमारे ६२.५९ लाखांहून




अधिक यूपीआयद्वारे तिकीट व्यवहार झाले असून, त्यातून ८३.६७ कोटी रुपये महसूल एसटीच्या खात्यात जमा झाला.

एसटी महामंडळाने बसस्थानकांवर, तिकीट खिडक्यांवर तसेच प्रवासादरम्यान कंडक्टरकडून यूपीआय पेमेंटची सुविधा उपलब्ध करून दिल्यामुळे प्रवाशांचा वेळ वाचत असून रोख रकमेचा व सुट्टे पैसे ठेवण्याचा त्रास कमी झाला आहे. अर्थात, त्यामुळे सुट्ट्या पैशावरून वाहकांशी होणाऱ्या अनावश्यक वादविवादाला पूर्णविराम मिळाल्याचे प्रशासनाने सांगितले.

एसटीच्या काही वाहकांकडून होणारा पैशांचा अपहार रोखण्यासाठीदेखील डिजिटल पेमेंट प्रक्रियेची मदत झाली आहे. त्यामुळे यूपीआय व्यवहारांमुळे पारदर्शकता वाढली असून महसूल गळतीला आळा बसण्यास मदत होत आहे. येत्या काळात डिजिटल पेमेंटचा वापर आणखी वाढेल, असा विश्वास राज्य परिवहन महामंडळाच्या प्रशासनाने व्यक्त केला आहे.



## विद्यार्थ्यांना खरड पाटी वाटप

**। कोर्लई । प्रतिनिधी ।**

राजमाता माँसाहेब जिजाऊ आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांना अभिवादन करत जयंतीचे औचित्य साधून, शाळा क्र. ३ व २ मधील अंगणवाडीतील मुलांना, धडा पाहिला गिरविणे आणि तोही मातृभाषेतूनच म्हणून शाळेतील मुलांना अक्षर सराव व्हावा याकरिता सराव पाटीचे वाटप माजी विद्यार्थ्यांनी केले.

क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची भूमिका लघुपटाच्या माध्यमातून साकारणारी अभिनेत्री जुईली गुंजाळ, ॲड. अंकिता माळी, युविका भगत, युवराज भगत, ॲड.मनिष माळी, सागर पाटील, सुशांत म्हात्रे, अंगणवाडी सेविका व मदतनीस उपस्थित होत्या. शाळा व भाषा अबाधित रहावी व मराठी शाळांना पुन्हा सुगीचे दिवस आले पाहिजे. अशी भावना ॲड.मनिष माळी यांनी व्यक्त केली तर सावित्रीबाई फुले ही मालिका विद्यार्थी व पालकांनी आवर्जून पाहावी आणि सावित्रीबाई फुलेंची संघर्षगाथा अनुभवावी, असे जुईली गुंजाळ यांनी सांगितले.

## शेलू येथे नामफलक अनावरण

**नेरळ :** शेलू येथे राजमाता जिजाऊ माँसाहेब चौक उभारण्यात आला आहे. या चौकाचे नामफलक अनावरण आयुष्यवर्धिनी रुग्णालयाचे डॉ. रुपेश सोनावळे यांचे हस्ते-झाले.कर्जत कल्याण राज्यमार्ग रस्त्याच्या दुभाजक असलेल्या ठिकाणी हा नामफलक बसवण्यात आला आहे.

# बालविवाह रोखल्यास कुपोषण कमी होईल

**● गटविकास अधिकारी सुशांत पाटील यांचा विश्वास**

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

युनायटेड वे चे माध्यमातून कर्जत तालुक्यातील कुपोषण कमी करण्यासाठी गेली दहा वर्षे नियोजनबद्ध कार्य सुरू आहे. या अभियानाचे माध्यमातून आदिवासी भागातील ग्रामपंचायतीमधील महिला वर्गाला एकत्र करून आदिशक्ती अभियान राबविले जात आहे. या अभियानात बोलताना कर्जत पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सुशांत पाटील यांनी कर्जत तालुक्यातील कुपोषणाचे प्रमाण खाली आणण्यात युनायटेड वे आणि एकात्मिक बालविकास विभागाचे योगदान मोठे आहे.मात्र बालविवाह रोखल्यास हे प्रमाण आणखी कमी होण्यास मदत होईल असा विश्वास व्यक्त केला.



कर्जत पंचायत समितीचे गट विकास अधिकारी सुशांत पाटील यांनी आदिशक्ती अभियान चे माध्यमातून महिला आणि किशोरवयीन मुलींना मार्गदर्शन केले जात आहे. तर पोषण आहार प्रकल्पाच्या माध्यमातून गरोदर माता आणि नवजात बालके यांच्या आहाराचा प्रश्न सोडविला असल्याने त्याचा परिणाम कर्जत तालुक्यातील कुपोषण कमी होण्यावर होत आहे. आदिशक्ती अभियानात महिलांचा सहभाग दिसून येत असून महिलांनी आता बालविवाह रोखण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले.

युनायटेड वे कार्यान्वित पोषण प्रकल्पाच्या प्रतिनिधी रेखा जाधव यांनी कुपोषण मुक्ततेवर भर देत संस्था राबवत असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. खांडस प्राथमिक आरोग्य केंद्राच्या डॉ.प्राची यांनी गरोदर माताची घ्यावयाची विशेष काळजी, नवजात शिशूची घ्यावयाची काळजी आणि हिमोग्लोबीनचे महत्त्व या विषयी मार्गदर्शन केले.



## महिलांसाठी आरोग्य तपासणी शिबीर

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड, पाताळगंगा व रिलायन्स फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने महिलांसाठी मूलभूत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन वावरले प्राथमिक आरोग्य केंद्र येथे यशस्वीरित्या पार पडले.

या शिबिरामध्ये महिलांच्या आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या सीबीसी, आरबीएस, पॅप स्मिअर तपासणी, स्तन तपासणी करण्यात आले.

या उपक्रमासाठी रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड कडून डॉ. रणजित खंडारे, डॉ. विष्णू बुलबुले, मनाली कवडे, पप्पूलाल पुनिया, रिलायन्स फाउंडेशन यांच्याकडून डॉ. तेजस्विनी, निलेश स्मार, सुजाता शिंदे, वावरले प्राथमिक आरोग्य केंद्र येथील डॉ. कल्याणी इंगोले, डॉ. प्रसाद रोकडे, डॉ. प्रतिभा देशमुख, डॉ. तांडेल यांनी कामकाज केले. स्थानिक महिलांनी या शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

# मॉर्निंग क्लबने केला ज्येष्ठांचा सन्मान

**। रोहा । प्रतिनिधी ।**

मॉर्निंग क्लबने नववर्षाच्या पहाटे कुंडलिका नदी किनारी ट्रॅकवर नियमित चालायला येणाऱ्या ज्येष्ठांचा सन्मान केला. यावेळी मॉर्निंग क्लबच्या सदस्यांनी प्लास्टिक पिशवी न वापरण्याचा संकल्प केला असल्याचे अध्यक्ष प्रज्योत गुरव यांनी जाहीर केले.

येथील मॉर्निंग क्लबने चला आरोग्य जपूया, रोज चालण्याची सवय लावूया. हे मंत्र देत नवीन वर्षाच्या सकाळी मॉर्निंग क्लबच्या सदस्यांनी एकत्र येत वॉकसाठी येणाऱ्या सर्वांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत केले. वॉकिंग ट्रॅकवर आयोजित कार्यक्रमात रोहा सिटिझन फोरम ट्रस्टचे अध्यक्ष नितिन परब यांच्या हस्ते

**● प्लास्टिक पिशवी न वापरण्याचा केला संकल्प**




रविंद्र वैद्य, विजय देसाई, चंद्रकांत जाधव या नियमित वॉकसाठी याणाऱ्या ज्येष्ठांचा सन्मान करण्यात आला. यावेळी अध्यक्ष नितिन परब, मॉर्निंग क्लबचे अध्यक्ष प्रज्योत गुरव यांनी मनोगत व्यक्त केले. मॉर्निंग क्लब मेंबर्स आजपासून प्लास्टिक पिशवी वापरणार नसल्याचा संकल्प सोडण्यात आला. क्लबचे सरचिटणीस शैलेश कोळी यांनी नियोजन केले तर रत्नाकर कनोजे यांनी आभार मानले. यावेळी फारुक सवाल, गणेश सावंत, किरण गुल्हाने, प्रज्ञेश भांड, वामन चव्हाण, भाई पाटील, बाबू कडू, ऋतुराज अष्टीवकर, प्रवीण कापडी आदी उपस्थित होते.

> निसर्गाचा समतोल राखण्यासाठी प्लास्टिकचा वापर टाळणे अत्यंत गरजेचे आहे. याची सुरुवात स्वत:पासून करीत प्लास्टिकच्या पिशव्यांचा वापर न करण्याचा संकल्प केला आहे.
>
> -प्रज्योत गुरव, अध्यक्ष मॉर्निंग क्लब रोहा

पहाटे चालणे ही आपली जीवनशैली व आरोग्याच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाची गोष्ट आहे. इतरांनी याची प्रेरणा घेऊन सकाळी चालणे सुरू करावे असे आमचे प्रयत्न आहेत. प्लास्टिक बंदी व्हावी यासाठी सिटीझन फोरम ट्रस्ट कायम प्रयत्नशील आहे, असे नितीन परब म्हणाले.

# क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

स्वयंसिद्धा संचलित स्पर्धा विश्व अकॅडमीमध्ये क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली.

सदर कार्यक्रमाकरिता राष्ट्रीय युवा पुरस्कारार्थी भारत सरकार तथा आंतरराष्ट्रीय खेळाडू तपस्वी गोंधळी, स्वयंसिद्धा सामाजिक विकास संस्था सानेगांव रोहाच्या अध्यक्षा सुचिता साळवी उपस्थित होत्या.



सुचिता साळवी यांनी उपस्थित स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांबरोबर संवाद साधताना ३ जानेवारी बालिका दिनाचे महत्व तसेच हा दिवस साजरा करण्यामागचा हेतू यासंदर्भात माहिती दिली. स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना आपले ध्येय निश्चित करून त्यावर कठोर मेहनत घ्या. आज आपण ज्यांची जयंती साजरी करत आहोत त्यांनी जर जिद्द सोडली असती तर आज कित्येक महिला या शिक्षणापासून वंचित राहिल्या असत्या. महिला कोणत्याच क्षेत्रात कमी राहिलेल्या नाही. असे उत्तम मार्गदर्शन केले.

## विद्यार्थ्यांना सेल्फ डिफेन्सचे धडे

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत येथील शारदा मंदिर मराठी माध्यम येथे सावित्रीबाई फुले जयंती आणि राष्ट्रीय बालिका दिन साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांना अनेक विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले आणि प्रामुख्याने विद्यार्थ्यांसाठी सेल्फ डिफेन्सचे धडे देण्यात आले.

कर्जत येथील अभिनव ज्ञान प्रबोधिनी एज्युकेशनल ट्रस्टचे शारदा मंदिर, कर्जत शाळेत सावित्रीबाई फुले जयंती आणि राष्ट्रीय बालिका दिन साजरा करण्यात आला.

यावेळी कायदेविषयक मार्गदर्शन करण्यासाठी ॲड रेशमा ताम्हणकर यांना निमंत्रित करण्यात आले होते.

सुरुवातीला शाळेच्या मुख्याध्यापिका अंजली किसवे यांनी स्वागत केले, तर सावित्रीबाई फुले कार्यक्रमाचे निमित्ताने प्रतिमा पूजन करण्यात आले.

**विना नंबरप्लेट, ओव्हरलोड डंपरमुळे अपघातांची भीती | नागरिकांमधून कारवाईची मागणी**

# खालापुरात गौण खनिजांची धोकादायक वाहतूक

**। खालापूर । प्रतिनिधी ।**

खालापूर तालुक्यातून जाणाऱ्या राज्य महामार्ग व राष्ट्रीय महामार्गावर सध्या गौण खनिजांची, म्हणजेच ग्रीट, खडी, माती आणि रेतीची मोठ्या प्रमाणावर वाहतूक सुरू आहे. ही वाहतूक अत्यंत धोकादायक आणि नियमबाह्य पद्धतीने होत असल्याचा आरोप केला जात आहे. विशेष म्हणजे, अनेक डंपर विना नंबरप्लेट रस्त्यावरून भरधाव वेगात धावत असल्याने पर्यटकांसह स्थानिक नागरिकांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.



खालापूर तालुक्यात औद्योगिक वसाहती, मोठ्या प्रमाणावर सुरू असलेले गृहप्रकल्प, तसेच विविध पायाभूत सुविधा विकासकामांमुळे बांधकामासाठी लागणाऱ्या कच्च्या मालाची मागणी प्रचंड वाढली आहे.

याच पार्श्वभूमीवर माती, खडी, रेती व ग्रीटची वाहतूक करणारे डम्पर मोठ्या संख्येने रस्त्यावरून धावत आहेत; मात्र ही वाहतूक बहुतांशी वेळा नियमांचे उल्लंघन करून, परवानगीपेक्षा अधिक माल भरून आणि सुरक्षेची कोणतीही काळजी न घेता केली जात असल्याचे आढळून येत आहे.

या ओव्हरलोड डंपरमुळे रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खडी व ग्रीट सांडत असून त्यामुळे रस्ते घसरडे बनत आहेत. हवेत उडणारी धूळ व ग्रीटमुळे वाहनचालकांचे दृश्य मर्यादित होत असून अपघातांची शक्यता अनेक पटींनी वाढली आहे. सावरोली-खारपाडा राज्य मार्गावर अशा ओव्हरलोड डंपरची वाहतूक सातत्याने दिसून येत असून स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

धक्कादायक बाब म्हणजे, काही डम्परचालक मद्यपान करून वाहन चालवत असल्याच्या तक्रारीही समोर आल्या आहेत.

भरधाव वेग, बेदरकार वाहन चालवणे आणि ओव्हरलोड वाहतूक यामुळे यापूर्वीही या मार्गावर किरकोळ तसेच गंभीर अपघात घडले आहेत. तरीही संबंधित यंत्रणा या गंभीर बाबीकडे दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

बहुतेक डंपरना नंबरप्लेट नसल्यामुळे अपघात झाल्यास संबंधित वाहनाचा माग काढणेही कठीण होत आहे. ही बाब कायद्याच्या दृष्टीने गंभीर असून, अशा बेकायदा डम्परवर तातडीने कारवाई होणे आवश्यक असल्याची मागणी प्रवासी, वाहनचालक आणि स्थानिक नागरिकांकडून केली जात आहे.

## निवडक



### सुभाष राठोड यांची निवड

**रसायनी :** रायगड जिल्हा परिषद ग्रामीण उत्कृष्ट उच्च प्राथमिक शाळा वडगावचे शिक्षक सुभाष रामचंद्र राठोड यांची सध्या सुरू असलेल्या महाराष्ट्र राज्य शालेय शिक्षण विभागा तर्फे महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे आयोजित विविध स्पर्धा सुरू आहेत. त्यातील आत्मचरित्र लेखन स्पर्धेत वडगाव शाळेचे उपक्रमशील व अभ्यासू शिक्षक सुभाष राठोड यांची केंद्र, तालुका व विभागात उत्कृष्ट लेखन, वास्तव घटना व स्वतःच्या आयुष्यातील प्रत्येक प्रसंगाचे वर्णन करत मुद्द्यांच्या आधारे लिहिलेले आत्मचरित्र मुंबई विभागातून राज्यस्तरासाठी निवडले गेले आहे. ही स्पर्धा रायगड, ठाणे, मुंबई, नवी मुंवई, पालघर या जिल्ह्यातून मुंबई विभाग स्तरांवर घेण्यात आली होती. त्यामुळे त्यांचे जिल्हाभर कौतुक होत असुन शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. सुभाष राठोड यांचे विशेष कौतुक यासाठी होत आहे की त्यांचा अलीकडेच जीवघेणा अपघात झालेला असून सुद्धा राठोड सरांनी चार स्पर्धेत भाग घेत चारही ठिकाणी अव्वल बक्षीस जिंकलेली आहेत.



### विद्यार्थ्यांनी भरवला आठवडा बाजार

**रसायनी :** रसायनी पाताळगंगा परिसरातील वाशिवली येथील विमलताई पारनेकर प्राथमिक विद्यामंदिर शालेय विद्यार्थ्यांचा आठवडा बाजार भरविण्यात आला. आठवड बाजाराचे उद्घाटन पालकांच्या हस्ते करण्यात आले. सौ विमलताई पारनेकर प्राथमिक विद्यालयातील पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांचा आठवडा बाजार भरण्यात आला होता. यामध्ये खाऊचे स्टॉल स्टेशनरी पालेभाज्या फळभाज्या, भेल, बिस्किटे, मंचूरन, आदी पदार्थ ठेवण्यात आले होते. कार्यक्रमासाठी शाळेचे अध्यक्ष तुळशीदास पाटील व मुख्याध्यापिका मिनाक्षी मिलिंद रणदिवे,यांच्या नेतृत्वाखाली शालेय शिक्षक कल्पना द.गव्हाणे, लहू ना.वारगुडे, संजीवनी अ.म्हात्रे, अंजू शिंदे, दिपा पाटील, अर्पणा जाधव, निकीता म्हात्रे आदींसह पालक शाळा व्यवस्थापन समिती आजी-माजी पालक यांनी विशेष सहकार्य केले. व मुलांना चांगल्या प्रकारचे प्रोत्साहन दिले.



### दशरथ भोईर सेवानिवृत्त

**रसायनी :** खालापूर नायब तहसीलदार (निवडणूक) दशरथ भोईर हे शासकीय नियत नियमानुसार सेवा निवृत्त झाल्याने खालापूर तहसील कार्यालयाने त्यांना निरोप दिला. खालापूर निवडणूक नायब तहसीलदार दशरथ भोईर हे आज शासकीय नियत नियमानुसार सेवा निवृत्त झाले. खालापूर तहसीलदार अभय चव्हाण यांनी नायब तहसीलदार दशरथ भोईर व त्यांच्या पत्नी यांचा शाल श्रीफळ पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन सत्कार केला, व त्यांच्या सेवा काळातील कार्याचा गौरव केला.तर त्यांच्या पत्नी यांचा सन्मान महिला अधिकारी यांनी केला. निवासी नायब तहसीलदार सुधाकर राठोड, विकास पवार, पुरवठा अधिकारी पवार,मंडळ अधिकारी श्रीनिवास खेडकर, माणिक सानप, सावंत, सचिन वाघ, संदेश पानसरे, तलाठी यांनी नायब तहसीलदार दशरथ भोईर यांच्या कार्यकाळाचा यथोचित परिचय केला. शांत, संयमी, प्रशासनाची जाण असलेला अधिकारी म्हणून त्यांचा उल्लेख केला आहे.




### दुर्गवीर संस्थेने केला दुर्गवीरांचा सन्मान

**खांब :** गेली अनेक वर्षे गडसंवर्धनाचे कार्य करणारे दुर्गवीर संस्थेचे दुर्गवीर म्हणून सुपरिचित असणारे महेंद्र पार्टे व किशोर सावरकर यांचा त्यांच्या अलौकीक कामगिरीबद्दल विशेष सन्मान करण्यात आला आहे. तालुक्यातील खांब येथे ग्रा.पंचायतीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या एका कार्यक्रमात गडकिल्ले प्रेमी महेंद्र पार्टे व किशोर सावरकर यांचा विशेष सत्कार करण्यात आला आहे. सुरगडाच्या पायथ्याशी वसलेल्या वैजनाथ या गावचे गडकिल्लेप्रेमी महेंद्र पार्टे व किशोर सावरकर हे गेल्या अनेक सुरगड या गडावर दुर्गवीर संस्थेमार्फत चाललेल्या गडसंवर्धन कार्यात भूमिका निभावत आहेत. गडावरील स्वच्छता, वाटा मोकळ्या करणे, ऐतिहासिक वास्तूंचे जतन तसेच दुर्गप्रेम आणि इतिहासाविषयी जनजागृती करण्यासाठी संस्थेने केलेले कार्य अत्यंत उल्लेखनीय व प्रेरणादायी आहे.

### प्राण्यांसाठी सामाजिक संस्था सरसावली



**रोहा :** निसर्ग वन्यजीव संवर्धन संस्था रायगड या सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थेतील सर्पमित्र प्रथमेश कोळी, आशिष धुमाळ, प्रणय जंगम, सनी जाधव, साहिल भगत, करण कराळे, सुधीर मांझी, परेश साळूंखे यांनी हनुमान टेकडीवर असलेल्या जंगलामध्ये वाहणाऱ्या झऱ्यातील पाणी अडवून मुक्या प्राण्यांसाठी पाण्याची व्यवस्था केली.

# जिंदाल कंपनीतील कामगारांचा उद्रेक

## भारतीय मजदूर संघाच्या कमिटीची स्थापना

। वावोशी/ प्रतिनिधी ।

खालापूर तालुक्यातील खानाव येथील जिंदाल इंडस्ट्रीज कंपनीतील कामगारांना शासनाच्या नियमांनुसार किमान वेतन, इएसआयसी, प्रोव्हिडंट फंड, बोनस व सन्मानपूर्वक न्याय मिळावा, या ठाम मागणीसाठी कामगारांनी एकत्र येत भारतीय मजदूर संघाची अधिकृत कमिटी स्थापन करून कंपनी आवारात युनियनचा नामफलक उभारला आहे. या निर्णायक पावलामुळे जिंदालमधील कामगार संघर्षाला अधिकृत आणि संघटित स्वरूप प्राप्त झाले आहे. ही कमिटी भारतीय मजदूर संघाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष अण्णा धुमाळ आणि जनरल सेक्रेटरी ॲड. अनिल ढुमणे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थापन करण्यात आली असून, सुनील सोनवणे यांची अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.



यावेळी भारतीय मजदूर संघाच्या खानाव युनिटचे अध्यक्ष सुनील सोनवणे यांनी सांगितले की, २०१५ पासून येथे पीएस स्टील कारखाना सुरू असून २०२३ मध्ये जिंदालसारखी ब्रॅण्डेड कंपनी आल्याने कामगारांच्या अपेक्षा उंचावल्या होत्या. चांगले वेतन, पीएफ, मेडिकल, बोनस व ओव्हरटाईम मिळेल, अशी आशा होती; मात्र, प्रत्यक्षात कोणत्याच सुविधा मिळाल्या नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे. तसेच, भारतीय मजदूर संघाशी जोडल्यानंतरच किमान वेतन मिळू लागले आणि १२ तासांचे काम ८ तासांवर आल्याचे देखील त्यांनी नमूद केले. त्यामुळे हे उपकार नसून आमचे कायदेशीर हक्क आहेत. अजूनही अनेक मागण्या प्रलंबित असून त्या पूर्ण करण्यासाठी आम्ही संघटित संघर्ष करणार आहोत, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे.

पुढे ते म्हणाले की, काही संघटना कामगारांचे हित न पाहता स्वतःचे हित साधतात. मात्र, भारतीय मजदूर संघाची शिस्तबद्ध व पारदर्शक कार्यपद्धती कामगारांचा विश्वास वाढवणारी आहे. तुटपुंज्या सवलती देऊन दबाव टाकण्याचा कोणताही प्रयत्न सहन केला जाणार नाही, असा स्पष्ट इशाराही त्यांनी दिला आहे.

दरम्यान, ॲड. अनिल ढुमणे यांनी कामगार आयुक्तांकडे मध्यस्थीसाठी पत्र दिल्याची माहिती देत, गरज पडल्यास कामगार मंत्र्यांकडेही दाद मागण्याची भूमिका स्पष्ट केली आहे. उद्योग प्रगतीसोबत कामगारांचे जीवनमान उंचावले पाहिजे, यावर त्यांनी भर दिला. तर, भारतीय मजदूर संघाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष अण्णा धुमाळ यांनी, किमान वेतन, पीएफ, इएसआयसी व बोनस देणे हे कंपनीचे उपकार नसून कायदेशीर कर्तव्य असल्याचे स्पष्ट करत, संवादाला प्राधान्य देऊ; मात्र, न्याय न मिळाल्यास कायदेशीर चौकटीत ठोस संघर्ष केला जाईल, असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला आहे.

> “जिंदालसारखी ब्रॅण्डेड कंपनी आल्याने आमच्या अपेक्षा वाढल्या होत्या; परंतु, सुविधा मिळाल्याच नाहीत. किमान वेतन आणि ८ तास काम हे आमचे हक्क आहेत. तुटपुंज्या सवलती देऊन दबाव टाकण्याचा प्रयत्न सहन केला जाणार नाही.”
>
> – सुनील सोनवणे, अध्यक्ष, भारतीय मजदूर संघ, खानाव युनिट

> “कामगारांच्या घामाचा योग्य मोबदला मिळायलाच हवा. स्थानिक कामगारांना वेतनवाढ न देण्याच्या तक्रारी गंभीर आहेत. कामगार आयुक्तांकडे दाद मागितली असून, गरज पडल्यास कामगार मंत्र्यांपर्यंत जाण्याची आमची तयारी आहे.”
>
> – ॲड. अनिल ढुमणे, जनरल सेक्रेटरी, भारतीय मजदूर संघ

## निवडक

### रावे गावातील दोन महिला बेपत्ता

**पेण :** दादर सागरी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील रावे गावातील मिनल पाटील (२५) व चैताली मोकल (२७) या दोघी बेपत्ता झाल्या आहेत. त्यातील मिनल पाटील ही हरविल्याची तक्रार तिचे पत्नी किरण पाटील यांनी दादर सागरी पोलीस ठाण्यात २४ डिसेंबर रोजी दिली आहे. मिनलची उंची ४ फुट ५ इंच असून केस काळे लांब, नाक सरळ, कानात सोन्याची कुडी, डोळे बारीक काळे,





उजव्या हातावर किरण नाव गोंदविलेले, अंगात पिवळ्या रंगाचा कुर्ता व लेगीज, पायात चप्पल असे वर्णन आहे. तसेच, चैताली मोकल हरविल्याची तक्रार तिचा भाऊ विशाल पाटील याने १९ नोव्हेंबर रोजी दादर सागरी पोलीस ठाण्यात दिली आहे. चैताली रंगाने सावळी असून उंची ४ फुट ५ इंच, अंगाने मध्यम, कानात सोन्याची रिंग, गळ्यामध्ये सोन्याचे मंगळसूत्र, पायात साधी चप्पल, अंगात नेसून निळसर रंगाचा फुलांचा ड्रेस, डाव्या हातावर इंग्रजीमध्ये किरण असे नाव गोंदवलेले, कपाळावर जुनी टाके पडलेली जखम असून सोबत सॅमसंग कंपनीचा मोबाईल आहे. या वर्णनांच्या दोन्ही महिला कुणाला अढळल्यास त्यांनी तातडीने दादर सागरी पोलीस ठाण्याशी संपर्क करावा, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.



### तिवरे येथे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

**पाली :** रायगड जिल्हा परिषद शाळा तिवरे येथे नुकतेच वार्षिक स्नेहसंमेलन पार पडले. सालाबादप्रमाणे यंदाही तिवरे शाळेतील विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांचे प्रदर्शन करत उपस्थितांची मने जिंकली. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून डॉ. माया मल्होत्रा उपस्थित होत्या. २०२३ पासून शाळेतील दोन्ही शिक्षक श्रावणी मोरे व रविंद्र आंधळे यांनी या अनोख्या कार्यक्रमाची सुरुवात केली. गावातील ग्रामस्थ, महिला, तरुण मंडळ, पालक यांनी सहकार्य करून याही वर्षी हा कार्यक्रम यशस्वी केला. शाळेने वेळोवेळी विविध उपक्रमामध्ये भाग घेऊन तिवरेचे नाव नावारूपास आणले आहे. अशी भावना उपस्थित मान्यवर मनोहरनाना देशमुख यांनी व्यक्त केली. यावर्षी परसबाग स्पर्धेमध्ये शाळेने तालुक्यात तृतीय क्रमांक मिळवला म्हणून शाळा व्यवस्थापन समिती यांचा सन्मान करण्यात आला. तसेच, डॉ. माया मल्होत्रा यांचा सन्मान मुख्याध्यापक श्रावणी मोरे यांनी केला.

### कामोठ्यातून ५७ वर्षीय व्यक्ती बेपत्ता

पनवेल : कामोठे प्रभाग ६मधील साईनाथ अपार्टमेंटमधून एक ५७ वषीय व्यक्ती बेपत्ता झाल्याची तक्रार कामोठे पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. रविकुमार सुदर्शन बल्ला असे बेपत्ता व्यक्तीचे नाव असून त्यांची उंची ५ फूट ३ इंच, नाक सरळ, केस पांढरे व मध्यम, दाढी पांढरी वाढलेली, डोळे काळे, रंग गोरा, बांधा सडपातळ, गालावर खड्डे, गळ्यात चांदीची चेन व रुद्राक्षाची माळ आणि उजव्या हातात दोन अंगठ्या आहेत. तसेचव, त्यांनी अंगात निळा पांढरा रंगाचा हाफ टि-शर्ट व निळी पॅन्ट घातली आहे. त्यांना हिंदी, मराठी, तेलगु व इंग्रजी भाषा येते. अशा वर्णनाची व्यक्ती कोणाला दिसल्यास त्यांनी कामोठे पोलीस ठाण्यात संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



### पोपटीसाठी पावट्याच्या शेंगांचा आधार

**तळा :** नव्या वर्षाच्या सुरुवातीस वातावरणात पुन्हा गारवा जाणवू लागल्याने सर्वत्र खवय्यांकडून पोपटीचा बेत आखला जात आहे. मात्र, पोपटी करण्यासाठी वालाच्या शेंगा अजूनही बाजारपेठेत उपलब्ध न झाल्याने त्याला पर्याय म्हणून पावट्याच्या शेंगांना नागरिकांनी पसंती दर्शवली आहे. यावर्षी अवकाळी पाऊस व बदलत्या हवामानाचा फटका वाल पिकाला बसला असून मोठ्या प्रमाणावर वालाच्या शेतीचे नुकसान झाले आहे. परिणामी बाजारपेठेत वालाच्या शेंगा उपलब्ध झालेल्या नाहीत. त्यामुळे तळा बाजारपेठेत पावट्याच्या शेंगांना मागणी वाढली आहे. दरवर्षी साधारणपणे वर्षाच्या शेवटी व नविन वर्षाच्या सुरुवातीस थंडी पडू लागली की कोकणात विशेषतः रायगड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर पोपटीच्या पार्ट्या आयोजित केल्या जातात. विशिष्ट पद्धतीने ही पोपटी तयार केली जाते. पोपटी तयार झाली की ती एकत्र बसून गप्पा मारत खाल्ली जाते. पोपटी पार्टीच्या निमित्ताने कुटुंब, नातेवाईक, मित्रपरिवार एकत्र येऊन आपुलकीने एकमेकांची विचारपूस करून स्नेहपूर्वक शब्दांची देवाणघेवाण करतात. त्यामुळे रायगड जिल्ह्यात सर्वत्र पोपट्यांचे आयोजन केले जात आहे.



## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- कुरुळ ता. अलिबाग येथे दोन तीन गुंठे प्लॉट त्वरीत देणे आहे. ७७२०८४३९९९, ८०८७४७३९९९
- मंगल ग्रेन स्टोअर्स, बाजारपेठ, अलिबागमध्ये packing व Delivery साठी मूल मुली पाहिजेत. Contact No : 7875990092
- अलिबाग कोकोनट रिसॉर्टसाठी वेटर व हाऊसकीपिंग कामासाठी मुलांची गरज आहे. इच्छुकांनी खालील मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा.+९१९९७००४१५७९ पत्ता: अलिबाग कोकोनट रिसॉर्ट, हॉटेल शालीमारच्या समोर, अलिबाग, रायगड.

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## फोफेरी हायस्कूलच्या विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

। वाघ्रण । प्रतिनिधी ।

फोफेरी हायस्कूलच्या दहावीच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा शुक्रवारी (दि.२) जलपाडा येथे संपन्न झाला. या कार्यक्रमादरम्यान, सन १९८२-८३च्या माजी विद्यार्थ्यांमध्ये भारतीय तटरक्षक दलाचे निवृत्त प्रधान अधिकारी जयदिप पाटील, सेवानिवृत्त सैनिक गणेश पाटील, दिपक पाटील व भारतीय हवाई दलातून निवृत्त आणि बीआरसी अधिकारी दिलीप भोईर आदींचा माजी विद्यार्थ्यांनी सत्कार केला.





मुरूड समुद्रकिनारी सध्या मोठ्या प्रमाणात धुके असल्याने आणि मासे देखील कमी प्रमाणात मिळत असल्याने येथील कोळी बांधवांनी आपल्या बोटी किनाऱ्यावर नांगरल्या आहेत. (छायाचित्र : सुधीर नाझरे)

## ठाकरे गटाची तातडीची बैठक

। नागोठणे । प्रतिनिधी ।

शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे स्थानिक नेतृत्व, काही पदाधिकारी व शिवसैनिकांनी राष्ट्रवादी पक्षात प्रवेश केल्यामुळे निष्ठावंत शिवसैनिक या बैठकीला मोठ्या संख्येने उपस्थित राहिले. त्यामुळे नागोठण्यातील गळती थांबविण्यात स्थानिक शिवसैनिकांना शंभर टक्के यश आल्याचे शिवसैनिकांच्या उपस्थितीवरून दिसून येत आहे. शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षासोबत असलेली आपली निष्ठा अशीच अबाधित ठेवा, पक्षाची सर्व ताकद तुमच्या पाठीशी उभी करू. अशी ग्वाही पक्षाचे जिल्हा संपर्क प्रमुख प्रसाद भोईर यांनी शिवसैनिकांना दिली.



नागोठण्यातील शिवसेना पदाधिकाऱ्यांनी मुंबई येथे राष्ट्रवादीत प्रवेश केल्याचे, तसेच सोमवारी (दि.५) नागोठण्यात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते होणाऱ्या जाहीर प्रवेशाच्या पार्श्वभूमीवर नागोठणे शिवसेना (उद्धव ठाकरे) शाखेत शनिवारी (दि.३) शिवसैनिकांची तातडीची बैठक बोलविण्यात आली होती. यावेळी ते बोलत होते. या बैठकीला जिल्हा संपर्क प्रमुख प्रसाद भोईर यांच्यासह जिल्हा प्रमुख सुरेंद्र म्हात्रे, विविध पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## चंद्रकांत कांबळी यांचे निधन

। उरण । प्रतिनिधी ।

उरण शहरातील बोरी येथे राहणारे चंद्रकांत नथुराम कांबळी यांचे गुरुवारी (दि.१) निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ८५ वर्षे होते. त्यांच्या पश्चात दोन मुलं, दोन मुली व नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांचे दहावे श्री क्षेत्र माणकेश्वर येथे रविवारी (दि.१०) होणार असून उत्तरकार्य मंगळवारी (दि.१२) बोरी येथील राहत्या घरी होणार आहे.



## जेएनपीएची सर्वाधिक कंटेनर हाताळणी

। उरण । प्रतिनिधी ।

भारतातील सर्वात मोठे कंटेनर बंदर असलेल्या जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरणात २०२५मध्ये माल हाताळणीत वाढ झाली आहे. यावेळी जेएनपीएमध्ये कंटेनर हाताळणी ७.९४ दशलक्ष टीईयू इतकी झाली असून, २०२४ मधील ७.०५ दशलक्ष टीईयूच्या तुलनेत त्यात १२.६४ टक्के लक्षणीय वाढ नोंदवली आहे. याच कालावधीत एकूण कार्गो हाताळणी ९९.१७ दशलक्ष मेट्रिक टनांवर पोहोचली असून, मागील वर्षातील ९०.२७ दशलक्ष मेट्रिक टनांच्या तुलनेत ९.८६ टक्के वाढ झाली आहे. ही



उल्लेखनीय कामगिरी जेएनपीएच्या सक्षम पायाभूत सुविधा, तंत्रज्ञानाधारित कार्यपद्धती आणि वाढत्या व्यापार क्षमतेचे स्पष्ट प्रतिबिंब आहे. या पार्श्वभूमीवर, जेएनपीएने वर्षभरातील टर्मिनलनिहाय कामगिरी, माल प्रवाह आणि कार्यात्मक परिणामांचा आढावा घेण्यासाठी भागधारकांची बैठक आयोजित केली होती.



## शाळेत अवतरल्या सावित्रीच्या लेकी

। म्हसळा । प्रतिनिधी ।

रा.जि.प. म्हसळा मराठी शाळेत शनिवारी (दि.३) सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करून त्यांना अभिवादन करण्यात आले. शाळेतील मुलींनी सावित्रीच्या वैशभूषेत जयंती कार्यक्रमात सहभाग घेतला. यावेळी मुख्याध्यापिका सुमित्रा खेडेकर, इंदिरा चौधरी, उमदी, मुंडे, गायकवाड यांनी विद्यार्थ्यांना सावित्री बाईंच्या जीवनावर माहिती सांगून विद्यार्थ्यांना प्रबोधन केले. सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस मुख्याध्यापिका सुमित्रा खेडेकर यांनी पुष्पहार अर्पण करून सावित्रीबाईंना अभिवादन केले. यावेळी शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य व मान्यवर उपस्थित होते.

## नेरळमध्ये सांस्कृतिक कार्यक्रमांचे सादरीकरण

। नेरळ । प्रतिनिधी ।

नेरळ येथील विद्या विकास मंदिर शाळेमध्ये वंदे मातरम् या गीताला १५० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल सांस्कृतिक कार्यक्रमांचे सादरीकरण प्राथमिक विभागाच्या विद्यार्थ्यांच्या माध्यमातून करण्यात आले होते. देशातील विविध राज्यात वंदे मातरम् गीताचे ज्या प्रमाणे सादरीकरण होते, त्याप्रमाणे शाळेच्या प्राथमिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उत्तम संगम झालेला दिसून आला.



वंदे मातरम् या राष्ट्रीय गीताला १५० वर्षे पूर्ण झाल्याचे औचित्य साधून अखंड भारत दर्शन घडवणार असल्याचे स्पष्ट केले. या सोहळ्याला प्रमुख अतिथी म्हणून मंडळाचे उपाध्यक्ष बल्लाळ जोशी, कार्याध्यक्ष प्रसन्न खेडकर, कार्यवाहक अमित जोगळेकर यांच्यासह इंग्रजी माध्यम शालेय व्यवस्थापन समिति अध्यक्ष तसेच मंडळाचे सदस्य सुर्वे, पिंपुटकर व मंडळाचे सल्लागार अरुण धारप यांच्यासह मुख्याध्यापिका शैलजा निकम, विनया काकडे, स्वाती दिघे व स्नेहा म्हसे आदी उपस्थित होते. यावेळी प्राथमिक विभागाच्या सांस्कृतिक कार्यक्रमात शाळेतील प्रत्येक वर्गातील विद्यार्थ्यांनी एका स्वतंत्र राज्यातील भाषा आणि पोशाख यांची माहिती सादर करणाऱ्या गीतावर नृत्य सादर केले. स्नेह संमेलनाचे सूत्रसंचालन वर्षा गायकवाड यांनी केले.

प्रवाशांचीही काळजी घेत वाहन चालवावे | पोलीस निरीक्षक संजय जाधव यांचे आवाहन

## एसटी महामंडळातर्फे सुरक्षितता मोहीम

। हमरापूर । प्रतिनिधी ।

प्रवाशांची काळजी घेत एसटी कर्मचाऱ्यांनी एसटी बस चालवावी, असे आवाहन वडखळ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष जाधव यांनी केले. एस.टी. महामंडळातर्फे दरवर्षी दि.१ ते ३१ जानेवारी या कालावधीत सुरक्षितता मोहीम कार्यक्रम राबवला जातो. यावर्षीही पेण एसटी आगारात ही मोहिम राबविण्यात येत आहे. या मोहिम कार्यक्रमाचे उद्घाटन पेण एसटी आगारात करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून वडखळचे निरीक्षक संतोष जाधव, एसटी विभागीय कार्यालयातील पालक अधिकारी विशाखा ढमाले, पेण आगार प्रमुख अपर्णा वर्तक, वाहतूक निरीक्षक आलोक गायकवाड, स्वाती मोकल यांच्यासह अधिकारी, चालक, वाहक व तांत्रिक कर्मचारी उपस्थित होते.



पुढे बोलताना पोलीस निरीक्षक संतोष जाधव म्हणाले की, चालकावर एसटीमधील ५० ते ६० प्रवाशांची जबाबदारी असते. त्यामुळे सुस्थितीतील बस त्यांच्या ताब्यात देणे हे मेंटनस विभागाचे काम आहे. एखादा अपघात झाला तर त्याला जबाबदार एसटी चालकाला धरले जाते. हे लक्षात घेऊन प्रशासनाने याकडे लक्ष द्यावे. तसेच, चालकाने रस्त्याच्या परिस्थितीकडे बघून वाहन चालवा, जेणेकरून अपघात होणार नाही, असे सांगून त्यांनी सर्व चालक व कर्मचाऱ्यांना शुभेच्छा दिल्या.

त्यानंतर पालक अधिकारी विशाखा ढमाले, आगार प्रमुख अपर्णा वर्तक, कार्यशाला अधीक्षक सहाय्यक अनिल पाटील यांनीही चालक व वाहकांना मार्गदर्शन करताना सुरक्षित सेवा देण्यासाठी सर्व नियम पाळावे. तसेच, केपीटीएल वाढवून एसटीचे उत्पन्न देखील वाढले पाहिजे यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन केले.

या कार्यक्रमादरम्यान, जास्त कॅपिटल तसेच १० वर्षे सुरक्षित सेवा केल्याबद्दल चालक के.ए. सिडोम, जास्त उत्पन्न होणारे वाहक एम.एन. उगलमुगले, तसेच ५ वर्षे सुरक्षित सेवा केल्याबद्दल चालक विश्वास ठाकूर यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वाती मोकल यांनी केले. तर, आभार प्रदर्शन आलोक गायकवाड यांनी केले.

## द्रोणागिरी महोत्सवाचे आयोजन

। उरण । प्रतिनिधी ।

उरण नवीन शेवा आई शांतेश्वरी या सामाजिक संस्थेच्या माध्यमातून दि.८ ते २१ जानेवारी या कालावधीत उरण तालुक्यातील द्रोणागिरी येथील शांतेश्वरी मैदानात आगरी, कोळी, कराडी द्रोणागिरी महोत्सव २०२६ चे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवाच्या माध्यमातून नागरिकांना विविध मनोरंजनाचा, कला, नाट्य, खाद्य संस्कृती, विविध स्पर्धा कार्यक्रमाचाआनंद लुटता येणार आहे. नागरिकांनी या महोत्सवात मोठ्या संख्येने सहभागी होऊन द्रोणागिरी महोत्सव २०२६ चा आनंद लुटावा, असे आवाहन आई शांतेश्वरी सामाजिक संस्था नवीन शेवा तर्फे करण्यात आले आहे.

# मुंबई-गोवा महामार्ग चौपदरीकरणात आंबेवाडीवर अन्याय



**। कोलाड । प्रतिनिधी ।**

मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणात लोणेरे, नागोठणे, महाड आणि पेण येथे अंडरपास देण्यात आले असताना कोलाड-आंबेवाडी परिसराला मात्र डावलण्यात आल्याचा आरोप करीत विविध संघटनांनी सोमवारी (दि.५) आंबेवाडी नाका येथे

### ■ अंडरपाससाठी आज साखळी उपोषण

साखळी उपोषण छेडण्याचा इशारा दिला आहे. यासंदर्भात जिल्हाधिकारी रायगड यांना निवेदन देण्यात आले आहे.

या आंदोलनात रोहा तालुक्यातील आंबेवाडी, वरसगाव, कोलाड व पंचक्रोशीतील नागरिकांसह व्यापारी संघटना, टेम्पो, इकोव्हॅन व रिक्षा संघटना सहभागी होणार आहेत. कोलाड आंबेवाडी येथे दोन अंडरपास देण्यात यावेत, दोन्ही बाजूंचे सर्व्हिस रोडचे रखडलेले काम पूर्ण करावे, तसेच गटारांवर झाकणे बसवावीत, या प्रमुख मागण्या आहेत. एनएचएआयमार्फत पळस्पे ते इंदापूर या महामार्गाचे रुंदीकरणाचे काम गेल्या १५ वर्षांपासून सुरू असून या प्रक्रियेत अनेक नागरिकांच्या जागा, घरे व जमिनी बाधित झाल्या आहेत; मात्र काम सुरू करताना स्थानिक नागरिकांना विश्वासात न घेता, जनसुनावणी न घेता आणि ग्रामपंचायतीमध्ये रस्त्याचे ड्रॉईंग न दाखवता काम सुरू केल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. एक किलोमीटर लांबीच्या या रस्त्याच्या दुतर्फा बाजारपेठ, प्राथमिक आरोग्य केंद्र, शाळा, अंगणवाडी, ग्रामपंचायत कार्यालय, ज्येष्ठ नागरिक सभागृह, सार्वजनिक गणेश मंडळ, आठवडा बाजार व स्मशानभूमी यांसारख्या अत्यावश्यक व लोकोपयोगी सुविधा आहेत. त्यामुळे रस्ता ओलांडताना नागरिकांना जीव धोक्यात घालावा लागत असल्याचे वास्तव संघटनांनी मांडले आहे. आजपर्यंत एनएचएआयकडून कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने साखळी उपोषणाचा मार्ग स्वीकारला आहे.

**भविष्यात आंदोलन**

**आंबेवाडी येथे दोन अंडरपासची गरजआंबेवाडी परिसरात महामार्गाच्या दोन्ही बाजूंना दैनंदिन जीवनाशी निगडित अत्यावश्यक सेवा असल्याने नागरिकांना वारंवार महामार्ग ओलांडावा लागतो. अपघातांचा धोका लक्षात घेता रस्त्यापासून सुमारे २०० मीटर अंतरावर दोन्ही बाजूंना दोन अंडरपास देणे अत्यावश्यक असून, ही एकच मागणी पूर्ण न झाल्यास भविष्यात तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशाराही संघटनांनी दिला आहे.**


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने नविन डिझाइन्स



**मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.**

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


## समीर साळुंखे सन्मानाने सेवानिवृत्त

**खांब :** धानकान्हे गावचे सुपुत्र समीर सदानंद साळुंखे भारतीय सैन्यदलातून सन्मानाने सेवानिवृत्त झाले आहेत. समीर सदानंद साळुंखे यांनी १७ वर्ष भारतीय सैन्य दलात उत्कृष्ट कामगिरी बजावत तसेच देशाची सेवा करून सैन्यदलातून सेवानिवृत्त झाले असून ते २ जानेवारी रोजी स्वगृही परतल्यावर कोलाड-आंबेवाडी नाक्यावर त्यांचे मिरवणूक काढून स्वागत करण्यात आले. समीर साळुंखे यांनी १७ वर्ष जम्मू-काश्मीर व लडाख अशा अनेक ठिकाणी देशाची सेवा निष्ठेने केली. १७ वर्षाची सेवा पूर्ण होऊन परिवारात आल्यानंतर त्यांच्याही चेहऱ्यावर आनंद दिसत होता.

# प्रभारी प्राचार्यपदी डॉ. सचिन बंगाळे

**। तळे । प्रतिनिधी ।**

श्री गोपीनाथ महादेव वेदक प्रतिष्ठान संचालित जी.एम. वेदक कॉलेज ऑफ सायन्स, तळा च्या प्रभारी प्राचार्यपदी रसायनशास्त्र विभागाचे प्राध्यापक डॉ. सचिन बंगाळे यांची नुकतीच नियुक्ती करण्यात आली आहे.अलीकडेच त्यांनी या पदाचा कार्यभार स्वीकारला आहे.

या आनंदाच्या प्रसंगी प्रतिष्ठानचे चेअरमन शिक्षणमहर्षी डॉ. नंदकुमार जी. वेदक तसेच उमेश वेदक यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देण्यात आले.

यावेळी स्थानिक व्यवस्थापन समितीचे सदस्य रायगड भूषण पत्रकार पुरुषोत्तम मुळे, तसेच द.ग. तटकरे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नानासाहेब यादव यांनी डॉ. बंगाळे यांना मोलाचे मार्गदर्शन केले आहे. गेले १५ वर्षे वेदक कॉलेज ऑफ सायन्स या महाविद्यालयात रसायनशास्त्र विभागाचे प्राध्यापक म्हणून काम करत असताना अनेक नाविन्य पूर्ण उपक्रम राबविले आहेत.



रसायनशास्त्र विभागाचा निकाल चांगल्या प्रकारे लागण्याच्या दृष्टीने ते प्रयत्नशील असतात. राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी म्हणून गेली अनेक वर्षे उत्तम प्रकारे जबाबदारी पार पाडली आहे. या व्यतिरिक्त महाविद्यालयातील विविध उपक्रमात त्यांचा प्रामुख्याने सहभाग असतो.

# ‘परमार्थ निष्ठेने केल्यास फळ निश्चित मिळते’

**। कर्जत । प्रतिनिधी ।**

परमार्थ करीत असताना अंतरंगाने आणि बाह्यअंगाने असा दोन अंगानी करावा लागतो. तरच फलश्रुती मिळते. आपल्यात परिवर्तन झाले पाहिजे. आज पर्यंत केलेल्या परमार्थामुळे अंतरंगात बदल घडवून आला पाहिजे. अंतरंगाच्या प्रमार्थाची परीणीती चेहऱ्यावर दिसते. आपल्यात काय बदल झाला तो आपल्यालाच कळतो. दुसऱ्याने सांगण्याची आवश्यकता भासत नाही. परमार्थ निष्ठान्नभावनेने केल्यास परमार्थाचे फळ निश्चित मिळते, असे प्रतिपादन दिलीप राणे यांनी केले.

कर्जत परिसराच्या सात दिवस चाललेल्या ज्ञानेश्वरी पारायण व ज्ञानयज्ञ सोहळ्याचा सांगता सोहळा काल्याच्या किर्तनाने संपन्न झाला. दत्तात्रेय म्हसे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. राणे यांनी किर्तनातून मार्गदर्शन करताना पुढे सांगितले,



आपण घातलेली तुळशीची माळ तुमच्या जीवाचा उद्धार होण्यासाठी असावी. दुसऱ्याने घातली म्हणून घालू नका. कुणाला दाखवायला माळ घालू नका. संतांचे साहित्य सर्वांसाठी आहे. केवळ कीर्तनकारांसाठी नाही. अभ्यासाची उजळणी करणे गरजेचे आहे. परमार्थाचे स्मरण करून द्यावे लागते मात्र व्यवहाराचे समरण करून द्यावे लाग नाही. तो आपोआप होत असतो.किर्तन सेवा केल्यानंतर दहीहंडी सोहळा करण्यात आला. श्रीकृष्णाच्या वेशातील शौर्य भासे या चिमुरड्याच्या हस्ते हंडी फोडण्यात आली. त्यानंतर महाप्रसादाचे हरी नाम सप्ताहाची सांगता झाली.

# विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

**। उरण । प्रतिनिधी ।**

नवीन वर्षाचे औचित्य साधून दरवर्षी प्रमाणे उरण तालुक्यातील चिरनेर येथील आश्रम शाळेत खाऊ, शैक्षणिक साहित्य आणि इतर गरजेच्या अत्यावश्यक वस्तू देऊन नवीन वर्षाची गोड सुरूवात करण्यात आली.

यावेळी चंदन भगत, तुषार पाटील, गणेश पाटील, सागर मसुरकर, दिनेश चव्हाण, कुणाल पाटील, कमलेश पिंपळे, सूरज भोईर, साहिल कांबळे, वृषाली पाटील, प्रदिप्ती पाटील, माधुरी पाटील, तेजस्विनी माळगावकर आदी अश्विन पाटील क्रीडा, शैक्षणिक व सामाजिक संस्थेचे पदाधिकारी सदस्य उपस्थित होते.

मित्राच्या पश्चातही सामाजिक कार्याचा आदर्श कायम ठेऊन अश्विन पाटील क्रीडा, शैक्षणिक व सामाजिक संस्थेच्या मत्र परिवाराने एकत्र येत राबवित असलेल्या व अखंडीतपणे चालू ठेवलेल्या अविरत समाजसेवेचे तालुक्यातून सर्वत्र कौतुक होत आहे.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे - नागांव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील क्षेत्राचे वर्णनाची बागायत जमिन मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) श्री. मंगेश पंडित पोवळे व २) सौ. प्रज्ञा मंगेश पोवळे यांचेकडून त्यांचा असणारा हिस्सा कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र व उपविभाग | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु. पै) |
|---|---|---|---|
| नागांव, ता. अलिबाग | १११८/३ | बागायत ००.०९.१०<br>पो.ख. ००.००.५०<br>एकुण ००.०९.६० | ०२.९० |

वरील बागायत मिळकत ही नोटीसीचा विषय आहे.

वर वर्णन केल्याप्रमाणे क्षेत्राची जमिन मिळकती ह्या त्यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबे कब्जा वहिवाटीतील असून, त्या विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतींवर अथवा तिचे कोणत्याही भागावार कोणतीही व्यक्ती वा संस्था कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचाकरार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, सरकारी, निम सरकारी संस्था यांचा बोजा थकबाकी या अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत आल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रार ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासहीत लेखी स्वरूपात आणून द्यावीत, मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदर मिळकती विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्काच्या आहेत व त्यावर अन्य कुणाचा ही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असुनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे. असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : ०४/०१/२०२६

**ॲड. राहुल रमेश नाईक**
मु. नागांव, ता. अलिबाग
मोबा. क्र. ९९२२७९८५२८

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी जमीन मालक श्री. तुकाराम नामदेव ठाकुर आणि श्री. हनुमान नामदेव ठाकुर, यांच्या सामाईक मालकी हक्कातील, ताबे कब्जातील व वहीवाटीतील मौजे दिघाटी (५५३५००), ता. पनवेल, जि. रायगड, ग्राम महसूल अधिकारी केळवणे यांच्या हद्दीत आणि उपनोंदणी विभाग आणि तालुका पनवेल, जि. रायगड, महाराष्ट्र येथील जमिन मिळकत कायमस्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरच्या विक्री करण्यात येणाऱ्या जमिन मिळकतीचे सविस्तर वर्णन खालीलप्रमाणे:

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे दिघाटी (५५३५००), ता. पनवेल, जि. रायगड**

| भुधारणा पद्धती | सर्व्हे/गट/हिस्सा /उपविभाग क्रमांक | क्षेत्रफळ (हे.आर. प्रति) | | |
|---|---|---|---|---|
| | | लागवडी योग्य | पोटखराबा | एकूण |
| भोगवटादार वर्ग १ | ३४/३ | ०-३०-१० | ००-०२-५० | ०-३२-६० (३२६० चौ.मी.) |

तरी या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, वरील मिळकती संदर्भातील समझौताज्ञापन/विक्री करारनामा/साठेखत/खरेदीखत हे आमचे अशिल आणि जमिन मालक यांच्यामध्ये करण्यात येणार आहे, त्यापुर्वी सदरची मिळकत ही निर्वेध, बिनकर्जी, बोजारहित व निजोखमी असणे आवश्यक आहे, त्याकरिता जर वरील नमुद केलेल्या जमीन मिळकतीवर अन्यथा कोणाचाही कोणत्याही प्रकाराचा हक्क, हितसंबंध म्हणजेच कोणत्याही व्यक्तीला, देवाणघेवाण, हक्क, व्याज, वाटा, लीज, उप-लीज, भाडेकरार, उप-भाडेपट्टा, परवाना, धारणाधिकार, गहाण, शुल्क, भार, व्यवसाय, करार, ट्रस्ट, आराम, भेट, वारसा, मृत्युपत्र, देखभाल, ताबा, विकास हक्क, राइट ऑफ वे, आरक्षण, करार, लिस-पेंन्डस, कौटुंबिक व्यवस्था/सेटलमेंट, कोणत्याही न्यायालयाचा हुकुम किंवा आदेश, एलएलपी, भागीदारी किंवा इतर कोणत्याही स्वरूपाचे त्यांचे आक्षेप असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा (१५) दिवसांचे आत त्यांचे आक्षेप लिखित स्वरूपात पुराव्यानिशी खालील पत्त्यावर नोंदवणे आवशक आहे. या मिळकतीबाबत लिखित स्वरूपात कोणतेही दावे स्वाक्षरीसह, दस्तऐवजासह प्राप्त झाले नाहीत, कोणांकडूनही, कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत आली नाही, तर वर नमूद केल्याप्रमाणे नोटीस कालावधीत त्याच्या/तिच्या/त्यांच्या दाव्याचे समर्थन केले जाणार नाही. आणि त्यावर विचारही केला जाणार नाही तर आमचे अशिल सदर जमिन मिळकतीसंदर्भातील व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी, कळावे.

सही : वकील अजीत व्ही. सिंह (खरेदीदारासाठी)
अजीत सिंह ॲण्ड असोसिएटस्
(वकील व कायदेशीर सल्लागार)
पत्ता: १६/१७, १ मजला, साई चेंबर,
प्लॉट नं. ४४, सेक्टर- ११, सी.बी.डी. बेलापूर,
नवी मुंबई, ता. आणि जि. ठाणे
फोन नं. ०२२-४००२ ६१४२/९८२०५२३०७७
ई मेल -ajeet_advocate@yahoo.co.in
दिनांक: ०५/०१/२०२६

## जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्री. अशोक जनार्दन माळी व सौ.अश्विनी अशोक माळी यांच्याकडुन कायमचे खरेदीकरण्याचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे हेदवली, ता कर्जत, जि रायगड येथील मिळकत**

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं १९/३ एकुण ०.७७.०० गुंठे पैकी लिहुन देणार यांचे हिश्याचे ०.४०.०० गुंठे जागा विकत घेणार आहेत.तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखत, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ११ दिवसाच्या आत लेखी पुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलाच्या लाभात सोडून दिलेला असून त्यांनी आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहुन कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनांक ०५/०१/२०२६

**ॲड. देविदास यशवंत देवघरे**
पत्ता. मु.पो कडाव, ता कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे कोंदीवडे, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक श्री ऋषभ हेमंत व्यास व वंदना हेमंत व्यास यांचेकडुन विकत घेण्याचे ठरविले. सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे कोंदीवडे, ता. कर्जत, जि. रायगड येथे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| १२ | २/क | ०-३४-०० | ०-८१ |

तरी सदर मिळकतींमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यानिशी खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासुन ०७ (सात) दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता.०५/०१/२०२६
मो. ९९२१७२२२००

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**समीर हरिश्चंद्र लाड**
शॉप नं ०२, साई सावली अपार्टमेंट,
कर्जत दिवाणी कोर्टासमोर, कर्जत, रायगड

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनांची मिळकती त्यांचे मालकांकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन:-**
**मौजे भालिवडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील शेतजमीन मिळकत**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे-आर-पॉ | आकार रु-पै |
|---|---|---|---|
| १३ | २ | ०-०४-०० | ०-०३ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमांचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

मोबाईल:-
०९३२६२३६९२३
०९६८९६९९५९५

**ॲड. प्रवीण शांताराम खडे**
पत्ता:- २, ''लक्ष्मी सदन'', जुने एस. टी. स्टॅण्ड,
मु.पो. नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड.

## जाहिर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली मौजे नागाव, ता. अलिबाग जिल्हा रायगड येथील मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) रजत गुप्ता, २) मुमल मेहता, ३) गौरव मेहता, ४) रितु लाल यांसकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तशी बोलणी आमचे अशिल व विद्यमान मालक यांच्यात झालेली आहे. व सदरची मिळकत ही निर्वेध व बोजाविरहीत असल्याचा भरवसा आमच्या अशिलांस विद्यमान मालकाने दिलेला आहे. सदर मिळकतीच्या मालकी हक्काबाबत शोध घेण्याकरिता व त्या मिळकतीच्या विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करण्याकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमच्याकडे दिले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| मु. नागाव, ता. अलिबाग | १९८३/२००९/२२०२ | ०-८२-४०<br>पो.ख. ०-०४-००<br>एकूण ०-८६-४० | १४.०६ |

वर नमुद मिळकती पैकी १) रजत गुप्ता, २) मुमल मेहता यांच्या हिश्श्यांचे क्षेत्र ०-२२-४२, पो.ख. ०-०१-०० एकूण क्षेत्र ०-२३-४२, आकार ३.८२ रू. पै ही मिळकत तसेच १) गौरव मेहता, २) रितु लाल या हिश्श्यांचे क्षेत्र ०-१७-४०, पो.ख. ०-०१-००, एकूण क्षेत्र ०-१८-४०, आकार २.९९ रू. पै या मिळकती जाहिर नोटिशीचा विषय आहे.

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लीज, फरोक्त पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाणेयेणेचे मार्ग आदि कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्या मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन पुढील ७ (सात) दिवसांच्या मुदतीत खाली सही करणार यांच्याकडे कळवावी.

येणे प्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न असल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीचा विक्री व्यवहार पुर्ण करतील व मागाहुन येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम जनतेने नोंद घ्यावी

कळावे.

अलिबाग,
दिनांक- ०४/०१/२०२६

सही/-
**ॲड. समिक्षा सिद्धार्थ शेंबेकर,**
जिल्हा न्यायालय, रायगड
पत्ता मु. लोणारे, पो. थळ,
ता. अलिबाग, जि. रायगड
पिन नं. ४०२२०७
मो.नं. ७७१९९०७२६१

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक उमेश भरत मिसाळ यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे

**मौजे गौरकामत तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| सर्व्हे नंबर/हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| ६/३/अ/१ | एकुण क्षेत्र ०-५६-०० हे आर पॉ यापैकी क्षेत्र ०-४०-०० हे आर पॉ | ६-५२ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : ०५/०१/२०२६

**खरेदीदारातर्फे वकील ॲड. वृषाली रघुनाथ मोरे**
मोबा. ८५३०१४६८५४
ऑफिस पत्ता- शॉप नं. २९, तळ मजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग,
भारत गॅस समोर. अमराई रोड,
कर्जत ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१

**खरेदीदारातर्फे वकील ॲड. निलेश कान्हु मोरे**
मोबा. ९८२२६९११०९
ऑफिस पत्ता- शॉप नं. २९. तळ मजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग,
भारत गॅस समोर अमराई रोड,
कर्जत ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१

## जाहिर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, विद्यमान जमीन मालक संभाजी पांडुरंग मचाले यांचेसोबत ताबेकब्जातील व वहिवाटीतील त्यांचे कायदेशीर मालकी हक्कातील व हिश्यातील खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन आमचे अशिलांनी त्यांचेकडुन कायमस्वरुपी खरेदी करण्याचा व्यवहार ठरविला आहे. सदरहु जमिनीचे वर्णन खालीलप्रमाणे:-

**मौजे मिरचोली, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकतीचे वर्णन**

| सर्वे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| २६ | १७ | एकुण ०-३६-०० क्षेत्रापैकी खरेदी देणार यांचे मालकीची ०-१६-१० क्षेत्र मिळकतीचे खरेदीखत | ०-१८ |
| २५ | ४/ब | ०-१३-९० पो.ख. ०-०१-४० एकुण ०-१५-३० क्षेत्रापैकी खरेदी देणार यांचे मालकीची ०-०३-९० क्षेत्र मिळकतीचे खरेदीखत | ०-५४ |

वरील वर्णनाच्या जमिनीचे संदर्भात अन्य कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, ट्रस्ट, पोटगी, वारसा, भाडेपट्टा, वहिवाट वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासहित सदर नोटीस झाल्यापासुन १४ (चौदा) दिवसांच्या आत खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात.

वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर जमीन निर्वेध व बोजारहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालकाबरोबर पुर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत,
दिनांक : ०५/०१/२०२६

**ॲड. मोनाली रामदास हजारे**
एम.कॉम. एल. एल. बी.
पत्ता : दहिवली, ए. व्ही. एफ. रेसिडेन्सी,
ललानी रोड, कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड
मो.नं. ९२६०१०९२८२

## जाहीर नोटीस

सर्व जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे-बामणगांव, ता. अलिबाग, जि.रायगड येथील खालील नमूद वर्णनाची जमीन मिळकत १ श्री. शार्दुल दामोदर म्हात्रे, २. श्री. शशांक दामोदर म्हात्रे, ३. संपदा पांडुरंग पाटील, ४. अमिता शशांक म्हात्रे, ५. श्री. शिरीष दामोदर म्हात्रे रा.७०४, अलपस हिट्स बिल्डींग, डॉ. आर पी रोड, रेल्वे स्टेशन जवळ, मुंलूड वेस्ट, मुंबई, यांच्या मालकीची असून, सदर जमिन मिळकत माझे अशिलांनी विकत घेण्याचे ठरविले असून, तशा आशयाची बोलणी सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिलां दरम्यान झालेली आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे. आर) | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| बामणगांव, ता. अलिबाग जि. रायगड | ३८४/१ | ०-१९-१०<br>पो.ख. ०-०१-९०<br>एकूण ०-२१-०० | ५.४८ |

सदर जमीन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे. मात्र तरी देखील सदर मिळकतीवर कोणत्याही प्रकारचा हक्क - हितसंबंध व अन्य कोणताही बोजा, साठेकरार, ताबा, कब्जा, कुळव्यवहार, चार्ज, पोटगी हक्क, बक्षिस भाडेपट्टा, फरोक्तखत, लिज, दावा वगैरे अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही सूचना प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून १४ चौदा दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : ०४/०१/२०२६

सही/-
**(ॲड. वैभव वसंत पाटील)**
रा. नवेदर बेली, ता. अलिबाग जि. रायगड,
मो ९८५०२६१००८ खरेदीदाराचे वकील

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, खाली नमुद केलेली मौजे-बोरगांव, ता. पेण, जि. रायगड येथील सामाईक क्षेत्राची शेत जमिन मिळकत ही रजि. खरेदीखताने खरेदी करण्याबाबत आमचे अशिल यांच्यासोबत सदर जागेचा व्यवहार ठरविण्यात आलेला आहे. सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यास सामाईक मालकीच्या शेत जमिन मिळकतीचे विद्यमान मालक यांनी अनुमती दिलेली आहे.

सदरहू सामाईक शेत जमिन मिळकतीचे ७/१२ उताऱ्याप्रमाणे असलेले वर्णन खालीलप्रमाणे-

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार (रु. पै.) |
|---|---|---|---|
| बोरगांव | ३४ | ०.१५.२०<br>पो.ख. ०.०२.८०<br>एकूण ०.१८.०० | ३.३१ |

**वरील सामाईक मालकी असलेल्या शेत जमिन मिळकतीचे संपूर्ण क्षेत्र म्हणजेच ०.१८.०० हे.आर.चौ.मी. (१८ गुंठे) क्षेत्र या जाहीर नोटीसचा विषय आहे.**

वरील वर्णनाची सामाईक मालकीची शेत जमीन मिळकत पूर्णतः निर्वेध, बोजाविरहित व विनाजोखीम असल्याबाबतचा हवाला सदरच्या सामाईक शेत जमीन मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिलांस दिला आहे. याउपरही सदरहू सामाईक मालकीच्या शेत जमीन मिळकतीमध्ये अन्य कोणाचाही भाडेपट्टा, गहाण, बोजा, कुळ वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, खरेदीखत, विकसन करारनामा मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, लिन अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क व हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह अगर लेखी दाखल करण्यात याव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने ७ दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे पोहचतील अशा रीतीने पाठवाव्यात.

याप्रमाणे वरील मुदतीत हरकत न आल्यास सदरहू सामाईक मालकीची शेत जमीन मिळकत ही निर्वेध व बोजाविरहीत आहे असे समजून त्यासंबंधी कोणाचेही कोणत्याही प्रकारचे कायदेशीर हक्क, हितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे समजण्यात येऊन आमचे अशिल हे विद्यमान मालकांसोबत वरील सामाईक मालकी असलेल्या शेत मिळकतीच्या खरेदी व्यवहाराबाबत सुरू असलेली बोलणी पूर्ण करून सदरहू सामाईक मालकीच्या शेत जमिन मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील. तसेच सदरच्या वरील मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही तक्रार अगर हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

पेण - रायगड
दिनांक ०५/०१/२०२६

अशिलांचे वकील
**ॲड. श्री. जयंत घ. वैरागी**
ऑफिस : ''वैरागी व्हिला'',
पेण नगरपरिषद कार्यालय समोर, पेण,
चिंचपाडा रोड, पेण, ता. पेण, जि. रायगड.
मो.नं. ९८८१६७१४२४

## निवडक

### भारतीय कबड्डी शिबिरात महाराष्ट्रातील ७ खेळाडूंची निवड

**मुंबई :** चौथी विश्‍वचषक कबड्डी स्पर्धा आणि आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी भारतीय वरिष्ठ पुरुष कबड्डी संघाच्या पहिल्या विशेष प्रशिक्षण शिबिरात महाराष्ट्रातील सात खेळाडूंची निवड झाली आहे. नवी दिल्लीच्या भारतीय क्रीडा प्राधिकरण (साई) केंद्रात येथे ५ जानेवारी ते ५ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत होणाऱ्या या पहिल्या राष्ट्रीय शिबिरासाठी देशभरातून एकूण ७३ खेळाडूंची निवड करण्यात आली आहे. त्यामध्ये आकाश शिंदे, अजित चौहान आणि शिवम पटारे (तिघेही डावे चढाईपटू), जयेश महाजन (डावा कोपरारक्षक), अस्लम इनामदार (अष्टपैलू), आदित्य शिंदे (उजवा चढाईपटू) आणि अजित पवार (डावा मध्यरक्षक) अशा महाराष्ट्राच्या सात खेळाडूंचा समावेश आहे. त्याच बरोबर पूर्वी महाराष्ट्रा कडून खेळलेले व सध्या भारतीय रेल्वे संघाकडून निवडण्यात आलेले पंकज मोहिते व शुभम शिंदे यांची देखील या शिबिराकरिता निवड झाली आहे.राष्ट्रीय शिबीर द्रोणाचार्य पुरस्कार विजेते मुख्य प्रशिक्षक बलवान सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडणार असून, अर्जुन पुरस्कार विजेते बी. सी. रमेश सहाय्यक प्रशिक्षक म्हणून तर अर्जुन पुरस्कार विजेते अनुप कुमार संघ व्यवस्थापक म्हणून जबाबदारी सांभाळणार आहेत. चौथ्या विश्‍वचषक कबड्डी स्पर्धेचा कार्यक्रम अद्याप घोषित झालेला नाही. परंतु आशियाई क्रीडा स्पर्धा १९ सप्टेंबर ते ४ ऑक्टोबर २०२६ दरम्यान जपानला होणार आहे.

### क्रिकेटपटूच्या हेल्मेटवर पॅलेस्टाईनचा झेंडा?

**नवी दिल्ली :** जम्मू-काश्मीरमध्ये झालेल्या एका क्रिकेट स्पर्धेतील घटनेमुळे वाद निर्माण झाला आहे. एका स्थानिक क्रिकेटपटूने हेल्मेटवर पॅलेस्टाईनचा झेंडा असल्यासारखे चिन्हे लावल्याचा आरोप झाल्यानंतर पोलिसांनी त्याची चौकशी केली आहे. जम्मू जिल्ह्यात गुरुवारी झालेल्या जम्मू-काश्मीर चॅम्पियन्स लीग या खासगी स्पर्धेत फुरकान भट नावाचा क्रिकेटपटू खेळत होता. सामन्यादरम्यान त्याने घातलेल्या हेल्मेटवर पॅलेस्टाईनचा झेंडा असल्याचा दावा सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या व्हिडीओतून करण्यात आला. त्यानंतर या प्रकरणावरून चर्चा सुरू झाली.या घटनेनंतर जम्मू-काश्मीर पोलिसांनी फुरकान भट यांना चौकशीसाठी बोलावले. तसेच या स्पर्धेचे आयोजक साजिद भट यांनाही डोमाना पोलीस ठाण्यात हजर राहण्यास सांगण्यात आले. मात्र गुरुवारी संध्याकाळपर्यंत या प्रकरणी कोणताही गुन्हा दाखल करण्यात आलेला नव्हता, अशी माहिती पोलिसांच्या सूत्रांनी दिली.दरम्यान, सोशल मीडियावर व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर काही लोकांनी फुरकान भट यांच्यावर कारवाईची मागणी केली. एका खेळाडूने सांगितले की, या घटनेमुळे खेळाडूंमध्येही नाराजी व्यक्त केली जात आहे. जम्मू-काश्मीर क्रिकेट असोसिएशनने या स्पर्धेशी कोणताही संबंध नसल्याचे स्पष्ट केले आहे. ही स्पर्धा खासगी पातळीवर आयोजित करण्यात आली होती आणि त्यात स्थानिक खेळाडू सहभागी होते, असे असोसिएशनने सांगितले. असोसिएशनचे प्रभारी अधिकारी ब्रिगेडियर अनिल गुप्ता यांनी सांगितले की, हे प्रकरण त्यांच्या अधिकारक्षेत्रात येत नाही आणि पोलिस त्यावर योग्य ती कारवाई करतील.

### पुन्हा घोंगावलं वॉर्नरचं वादळ

**नवी दिल्ली :**ऑस्ट्रेलियाचा स्फोटक फलंदाज डेव्हिड वॉर्नर  जरी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये दिसत नसला, तरी तो सध्या बिग बॅश लीगमध्ये मैदान गाजवताना दिसत आहे. सध्या ऑस्ट्रेलियात बिग बॅश लीग २०२५-२६ स्पर्धा सध्या सुरू आहे. या स्पर्धेत त्याने शनिवारी (३ जानेवारी) सिडनी थंडर्ससाठी होबार्ट हरिकेनविरुद्ध आक्रमक शतक केले आहे. हे त्याच्यासाठी विक्रमी शतकही ठरले. या सामन्यात प्रथम फलंदाजी करणाऱ्या सिडनी संघाने मॅथ्यू गिल्क्स आणि सॅम कोन्स्टास यांच्या विकेट शून्यावरच गमावल्या होत्या. मात्र त्यानंतर कर्णधार डेव्हिड वॉर्नरने डाव सावरला. त्याने सॅम बिलिंग्स (२०), निक मॅडीसन (३०) आणि डॅनिएल सॅम्स (१४*) यांना साथीला घेत डाव पुढे नेला. त्याने या तिघांसोबत भागीदारी करत वादळी शतक ठोकले. तो एका बाजूने खंबीरपणे उभा राहिला आणि त्याने चौकार-षटकारांसह पाऊस पाडताना ५७ चेंडूत शतक ठोकले. त्यानंतर तो ६५ चेंडूत ११ चौकार आणि ९ षटकारांसह १३० धावांवर नाबाद राहिला. त्यामुळे संघाला २० षटकात ४ बाद २०५ धावांपर्यंत पोहचता आले. दरम्यान, वॉर्नरने हे शतक केले, तेव्हा त्याचे वय ३९ वर्षे ६८ दिवस होते. त्यामुळे तो बिग बॅश लीगमध्ये शतक ठोकणारा सर्वात वयस्कर खेळाडू ठरला आहे. त्याने शेन वॉटसनचा विक्रम मोडला आहे. शेन वॉटसनने २०१९ मध्ये ३७ वर्षे २१४ दिवस वय असताना सिडनी थंडर्ससाठीच ब्रिस्बेन हिटविरुद्ध शतक ठोकले होते.

---

### ज्युनिअर राष्ट्रीय अजिंक्यपद खो-खो स्पर्धा

# महाराष्ट्राची अंतिम सामन्याकडे कूच!

**| बेंगळुरू| वृत्तसंस्था |**

गुंजूरच्या मैदानावर खो-खोचा अक्षरशः महासंग्राम रंगला आणि त्यात मराठी ताकदीचा डंका पुन्हा एकदा वाजला! भारतीय खो-खो महासंघाच्या मान्यतेने व कर्नाटक खो-खो असोसिएशनच्या यजमानपदाखाली आयोजित ४४ वी कुमार, मुली (ज्युनिअर) राष्ट्रीय अजिंक्यपद खो-खो स्पर्धा आता अंतिम टप्प्यात पोहोचली आहे.

उपांत्य फेरीतील थरारक लढतींमध्ये मुलांच्या गटात महाराष्ट्र व यजमान कर्नाटक, तर मुलींच्या गटात महाराष्ट्र व ओडिशा या संघांनी प्रतिस्पर्ध्यांना नामोहरम करत दिमाखात अंतिम फेरी गाठली. चपळाई, ताकद, डावपेच आणि जिद्दीचे अद्‌भुत दर्शन घडवत या सामन्यांनी क्रीडाप्रेमींच्या डोळ्यांचे पारणे फेडले असून, आता संपूर्ण देशाचे लक्ष महाअंतिम सामन्यांकडे लागले आहे.

**हाय-व्होल्टेज थरार! महाराष्ट्र, कोल्हापूर अटीतटीची लढत**

मुलांच्या उपांत्य सामन्यात महाराष्ट्र विरुद्ध कोल्हापूर हा सामना प्रेक्षकांच्या श्‍वास रोखून धरणारा ठरला. मध्यंतराला कोल्हापूर १७१६ असा एका गुणाने पुढे होता; मात्र उत्तरार्धात महाराष्ट्राने जोरदार मुसंडी मारत ३३३१ असा २ गुणांनी विजय खेचून आणला.





महाराष्ट्राकडून जितेंद्र वसावे (२.२० मि. संरक्षण, ६ गुण), राज जाधव (१ मि., १.४० मि. संरक्षण, ६ गुण), सोत्या वळवी (१.४० व १.१० मि. संरक्षण, ४ गुण) आणि आशिष गौतम (१.४० मि. संरक्षण, २ गुण) यांनी निर्णायक भूमिका बजावली.

#### महाराष्ट्राची पंजाबवर ‘डावाने’ मात;

मुलींच्या उपांत्य फेरीत महाराष्ट्र विरुद्ध पंजाब हा सामना एकतर्फी ठरला. मध्यंतराला २६८ अशी भक्कम आघाडी घेत महाराष्ट्राने अखेर २८१ असा १४ गुण आणि एक डाव राखून विजय मिळवला. महाराष्ट्राकडून स्नेहा लामकाणे (१.५० मि. संरक्षण, ८ गुण) हिने आक्रमक खेळ करत चमक दाखवली; श्रावणी तामखाडे (३.२० मि. संरक्षण), धनश्री कंक (३ मि. नाबाद संरक्षण, २ गुण), सानिका चाफे (३ मि. संरक्षण, २ गुण) आणि श्‍वेता नवले (२ मि. संरक्षण, २ गुण) यांनी मोलाची भर घातली.

#### ओडिशाची कोल्हापूरवर निसटती मात

मुलींच्या दुसऱ्या उपांत्य फेरीत ओडिशाने कोल्हापूरवर ९२७ अशी २ गुणांनी निसटती मात करत अंतिम फेरी गाठली. अखेरच्या क्षणापर्यंत रंगलेल्या या सामन्यात ओडिशाने ४० सेकंद शिल्लक राखत विजय निश्‍चित केला. ओडिशाकडून अर्चना प्रधान, सुभाश्री, लीसाराणी आर, देबस्मिता दास आणि के. रम्या यांनी चमकदार कामगिरी केली. कोल्हापूरकडून श्रावणी पाटील, अमृता पाटील, चैत्राली वाडेकर (१.३० व १ मि. संरक्षण, ४ गुण) आणि सई सावंत यांनी जोरदार प्रतिकार केला.

#### महाअंतिम लढतीसाठी महाराष्ट्र सज्ज!

स्पर्धेच्या अंतिम टप्प्यात मुलांच्या गटात महाराष्ट्र विरुद्ध कर्नाटक आणि मुलींच्या गटात महाराष्ट्र विरुद्ध ओडिशा हे महाअंतिम सामने रंगणार आहेत. खो-खो प्रेमींना थरार, कौशल्य आणि जिद्दीचा सर्वोच्च अनुभव देणारे हे सामने क्रीडाइतिहासात नवी भर घालतील, यात शंका नाही! उपांत्यपूर्व सामन्यात महाराष्ट्राच्या मुलांनी प. बंगालवर ३६-२८ असा ७.१० मि. राखून ८ गुणांनी मात केली. महाराष्ट्राने विदर्भाचा ३०-११ असा एक डाव राखून १९ गुणांनी धुव्वा उडवला.

कोल्हापूरकडून शरद घाटगे (१.४० व १.३० मि. संरक्षण, ८ गुण), उदय पडळकर (१.२० मि. संरक्षण, ४ गुण) व श्रावण वाडेकर (२ मि., १.१० मि. संरक्षण, २ गुण) यांनी झुंजार लढत दिली; मात्र नशीब महाराष्ट्राच्या बाजूने राहिले.

**घरच्या मैदानावर कर्नाटकचा दबदबा; मध्य भारतवर मात**

मुलांच्या उपांत्य फेरीत यजमान कर्नाटकने मध्य भारत संघाचा ३३२० असा १३ गुण आणि एक डाव राखून पराभव केला. मध्यंतराला कर्नाटक ३११० अशी मोठी आघाडी घेऊन पुढे होते.

कर्नाटककडून अनिकेत (२.१० व ३.५० मि. संरक्षण, २ गुण), योगेश पवार (२.३० मि. संरक्षण, ६ गुण), विजय बी. (३ मि. संरक्षण, २ गुण), तसेच मल्लिकार्जुन व इब्राहिम (प्रत्येकी ४ गुण) यांनी विजय साकारला. मध्य भारताकडून चैतन्य इंगोले व आदर्श वानखेडे (प्रत्येकी ४ गुण), तर ईशांत करोसिया (१.५० मि. संरक्षण) यांनी प्रयत्न केले; मात्र ते अपुरे ठरले.

---

## कळंबोलीमध्ये भव्य वॉकथॉनचे आयोजन

**| पनवेल | वार्ताहर |**

आगामी निवडणुकांच्या पार्श्‍वभूमीवर नागरिकांमध्ये मतदानाबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने पनवेल महानगरपालिकेच्या वतीने मतदान जनजागृती कार्यक्रम (स्वीप) अंतर्गत के. एल. ई. कॉलेज, कळंबोलीमध्ये भव्य वॉकथॉनचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात सुमारे २०० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला.

या वॉकथॉनची सुरुवात के.एल.ई. कॉलेज येथून करण्यात आली. कळंबोली सिटी हॉस्पिटल, शिव मंदिर रोड, अमर हॉस्पिटल, राजकमल को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटीमार्गे सरळ, गुरूनानक देवजी चौक, होली स्पिरिट चर्च, गुरू रविदास चौक, डॉ. राम बाबू अदेवी हॉस्पिटल, एमएसईबी कळंबोली कार्यालय, भारत पेट्रोलियम सीएनजी पंप, सेंट सेबॅस्टियन चर्च, सेंट जोसेफ स्कूल रोड, एच.पी.सी.एल. रोड व हनुमान मंदिर रोड असा मार्ग पार करून पुन्हा के.एल.ई. कॉलेज येथे समारोप करण्यात आला. लोकशाही बळकट करण्यासाठी प्रत्येकाने मतदानाचा हक्क बजावावा, असा संदेश या वेळी देण्यात आला.

## चैतन्य योगेश पितळेची सुवर्ण कामगिरी

**| तळा | प्रतिनिधी |**

सहाव्या आंतरराष्ट्रीय मिक्स बॉक्सिंग स्पर्धा रोहा तालुक्यातील धाटाव येथे संपन्न झाली. या चॅम्पियन स्पर्धेत देशातील ११ राज्यातील खेळाडू सहभागी झाले होते. यापैकी इयत्ता ८वीतील एस.एस. निकम इंग्लिश स्कुल तळाचा विद्यार्थी चैतन्य पितळे याने सुवर्ण पदक प्राप्त केले आहे.

मार्गदर्शक शिक्षक राकेश म्हसकर यांच्या नेतृत्वाखाली या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्या स्पर्धेमधून कॅनडामध्ये त्याची निवड झाली आहे. यापूर्वी काठमांडू येथे देखील स्पर्धेत आपली चुणुक दाखवून उत्तम यशस्वी कामगीरी करून पदक मिळवले आहे.



सहावी आंतरराष्ट्रीय मिक्स बॉक्सिंग स्पर्धा

चैतन्य पितळे याने तळा तालुक्याचे नाव मोठे केले आहे. त्याचे तळा शिवसेना शाखेमार्फत शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह, सन्मानपत्र देऊन गौरवण्यात आले.

त्याचबरोबर श्री चंडिका देवी पुन:दर्शन सोहळ्याच्या वेळी राज्याचे रोजगार हमी फलोत्पादन खारभुमी मंत्री नामदार भरत गोगावले यांच्या हस्ते विशेष सन्मान करण्यात आला.

या विद्यार्थ्याला जीवनात भरपूर काही करण्याची इच्छा आहे. त्यासाठी आर्थिक मदतीची गरज आहे. तरी सामाजिक संस्था, दानशूरदात्यंनी मदतीचा हात पुढे करावा, अशी विनंती करण्यात येत आहे त्याचे दैवज्ञ ब्राह्मण समाज व विविध स्तरावर कौतुक व अभिनंदन केले जात असून शुभेच्छा दिल्या जात आहेत.

---

## नीरज चोप्राचे दुरुस्तीला प्राधान्य

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

भारताचा भालाफेकपटू नीरज चोप्रा सध्या तरी पुनर्वसन प्रक्रिया राबवत आहे, त्यामुळे यंदाच्या मोसमात कधीपासून स्पर्धेत उतरायचे हे त्याने ठरवलेले नाही, अशी माहिती भारतीय ॲथलेटिक्स फेडरेशनचे अध्यक्ष आदील सुमारीवाला यांनी दिली. गतवर्षी सप्टेंबर महिन्यातील जागतिक अजिंक्यपद स्पर्धेसाठी सराव करताना नीरजची पाठ दुखावली होती. दुखापतीतही तो टोकियोत झालेल्या या स्पर्धेत सहभागी झाला होता. परिणामी, त्याची आठव्या क्रमांकावर घसरण झाली होती. त्याला केवळ ८४.०३ मीटर इतकाच भाला फेकता आला होता.

## गिलमुळे इशानचा पत्ता कट

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

टीम इंडिया मायदेशात नववर्षात न्यूझीलंड विरुद्ध एकदिवसीय मालिका खेळणार आहे. उभयसंघात एकूण ३ एकदिवसीय सामने खेळवण्यात येणार आहेत. बीसीसीआय निवड समितीने मालिकेसाठी शनिवारी ३ जानेवारीला भारतीय संघाची घोषणा केली.

एकदिवसीय मालिकेतून भारतीय संघात अनेक खेळाडूंचं कमबॅक झालं. मात्र विकेटकीपर बॅट्समन इशान किशन याला संधी मिळाली नाही. इशानचा देशांतर्गत क्रिकेटमधील कामगिरीनंतर आगामी टी २० वर्ल्ड कप २०२६ स्पर्धेसाठी भारतीय संघात समावेश करण्यात आला. त्यानंतर इशानने तडाखेदार कामगिरी करत एकदिवसीय मालिकेसाठी आपला दावा ठोकला होता. इशानला संधी मिळणार असल्याचं मीडिया रिपोर्ट्‌समध्ये म्हटलं होतं. मात्र बीसीसीआयकडून इशानला संधी देण्यात आली नाही.

निवड समितीकडून इशानला चांगल्या काम गिरीनंतरही संधी देण्यात आली नाही. निवड समितीने पुन्हा एकदा इशानऐवजी ऋषभ पंत याला प्राधान्य देत संघात कायम ठेवलं.

निवड समिती अध्यक्ष अजित आगरकर आणि कर्णधार शुबमन गिल या दोघांनी इशान ऐवजी ऋषभ पंतला प्राधान्य दिलं. निवड समितीच्या या भूमिकेला कर्णधार म्हणून शुबमन गिल यानेही समर्थन दिलं आहे.

## न्यूझीलंडविरुद्ध भारताचा संघ जाहीर

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने न्यूझीलंडविरुद्धच्या तीन सामन्यांच्या वनडे मालिकेसाठी १५ सदस्यीय भारतीय संघाची घोषणा केली आहे. या मालिकेसाठी शुभमन गिलला भारतीय संघाचा कर्णधार म्हणून कायम ठेवले आहे. ऋतुराज गायकवाड आणि तिलक वर्मा या दोघांना संघातून वगळण्यात आले आहे. तर हार्दिक पांड्या आणि जसप्रीत बुमराहला विश्रांती दिली आहे. श्रेयस अय्यरचे संघात पुनरागमन झाले आहे.

मधल्या फळीतील फलंदाज श्रेयस अय्यरचे पुनरागमनही जमेची बाजू आहे. ऑस्ट्रेलिया दौऱ्यात दुखापतग्रस्त झाल्यामुळे तो काही काळ मैदानापासून दूर होता, मात्र आता तो पूर्णपणे फिट झाला आहे. श्रेयसच्या पुनरागमनामुळे फॉर्मात असलेल्या ऋतुराज गायकवाड आणि तिलक वर्मा यांना संघातून बाहेर पडावे लागले आहे. गायकवाडने दक्षिण आफ्रिकेविरुद्ध शानदार शतक झळकावूनही त्याला या मालिकेत स्थान मिळालेले नाही. कोहली आणि रोहित या अनुभवी खेळाडूंना या वनडे मालिकेसाठी संघात कायम ठेवण्यात आले आहे. वर्कलोड मॅनेजमेंटचा विचार करून बुमराह आणि पांड्या यांना विश्रांती दिली आहे.




### भारतीय वनडे संघ

शुभमन गिल (कर्णधार), रोहित शर्मा, विराट कोहली, केएल राहुल (यष्टिरक्षक), श्रेयस अय्यर, यशस्वी जैस्वाल, ऋषभ पंत, वॉशिंग्टन सुंदर, रवींद्र जडेजा, मोहम्मद सिराज, अर्शदीप सिंह, प्रसिद्ध कृष्णा, कुलदीप यादव, हर्षित राणा आणि नीतीश कुमार रेड्डी.

---

### द. आफ्रिकेचा २५ धावांनी पराभव | डकवर्थ लुईस नियमानुसार निकाल

# भारताचा दमदार विजय

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

वैभव सूर्यवंशीच्या नेतृत्वामध्ये भारताने दक्षिण आफ्रिकेच्या संघावर दमदार विजय साकारला. भारताने या सामन्यात टॉस जिंकला आणि कर्णधार वैभव सूर्यवंशीने प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. वैभव सूर्यवंशी भन्नाट फॉर्मात गेले काही दिवस होता. पण या सामन्यात मात्र त्याला चमक दाखवता आली नाही.

भारताला पहिला धक्का आरोन जॉर्जच्या रुपात बसला, त्याला पाच धावा करता आल्या. वैभवकडून यावेळी मोठी अपेक्षा होती. पण वैभवला या सामन्यात ११ धावांवरच समाधान मानावे लागले. भारताचे एकामागून एक विकेट पडत गेले आणि त्यांनी ४ बाद ६७ अशी अवस्था झाली होती. यावेळी भारताचा संघ गडगडेल, असे वाटत होते. पण त्यावेळी भारताच्या मदतीसाठी हरवंश पांगलिया आणि आरएस अंब्रिश हे दोघे धावून आले. या दौघांनी पाचव्या विकेटसाठी १३७ धावांची भागीदारी रचली आणि संघाला दोनशे धावांचा महत्वाचा टप्पा गाठून दिला.



हरवंशने यावेळी धमाकेदाज फटकेबाजी करत आपले अर्धशतक पूर्ण केले. हरवंश त्यानतर शतकाच्या दिशेने कूच करायला लागला, पण शतक पूर्ण करण्यात त्याला अपयश आले. हरवंशने या सामन्यात सात चौकार आणि दोन षटकारांच्या जोरावर ९३ धावा केल्या, त्याचे शतक सात धावांनी हुकले.

हरवंशला यावेळी अंब्रिशने चांगली साथ दिली, त्याने सात चौकारांच्या जोरावर ६५ धावा केल्या. अखेरच्या षटकांमध्ये खिलान पटेलने १२ चेंडूंत तीन षटकारांच्या जोरावर २६ धावा केल्या, त्यामुळे भारताला या सामन्यात तिनशे धावांचा पल्ला गाठता आला. भारताने या सामन्यात ३०१ धावांचा डोंगर उभारला.

भारताच्या ३०२ धावांचा पाठलाग करताना दक्षिण आफ्रिकेची सुरुवात चांगली झाली नाही. कारण त्यांची ३ बाद ६२ अशी अवस्था झाली होती.

यजमानांचा सलामीवीर जोरिच व्हॅनने नाबाद ६० धावा केल्या होत्या. दक्षिण आफ्रिकेची २७.४ षटकांत ४ बाद १४८ अशी धावसंख्या असताना पावसाचे आगमन झाले. पावसाचा जोर एवढा होता की, या सामन्याचा डकवर्थ लुईस नियमांनुसार निकाल लावण्यात आला. भारताने हा सामना २५ धावांनी जिंकल्याचा निकाल देण्यात आला.

## वैभव सूर्यवंशीचा भीमपराक्रम

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

भारतीय क्रिकेटमधील उगवता तारा वैभव सूर्यवंशी याने दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या अंडर-१९ पहिल्या युवा एकदिवसीय सामन्यात मैदानावर पाऊल ठेवताच जागतिक क्रिकेटमध्ये खळबळ उडवून दिली.

वयाच्या अवघ्या १४ व्या वर्षी भारतीय १९ वर्षांखालील संघाचे नेतृत्व करत त्याने १९ वर्षे जुना जागतिक विक्रम मोडीत काढला.

शनिवारी, ३ जानेवारी रोजी बेनोनी येथील विलोमूर पार्क येथे झालेल्या या सामन्यात वैभव सूर्यवंशी हा कोणत्याही फॉरमॅटमध्ये आंतरराष्ट्रीय १९ वर्षांखालील संघाचे नेतृत्व करणारा जगातील सर्वात तरुण खेळाडू ठरला आहे.

युवा भारतीय संघाचा नियमित कर्णधार आयुष म्हात्रे आणि उपकर्णधार विहान मल्होत्रा हे दोघेही दुखापतग्रस्त झाल्यामुळे या तीन सामन्यांच्या मालिकेची धुरा वैभवच्या खांद्यावर सोपवण्यात आली.

जरी तो पहिल्या सामन्यात फलंदाजीत विशेष चमक दाखवू शकला नसला (१२ चेंडूत ११ धावा), तरी कर्णधार म्हणून त्याची ही उपस्थिती भारतीय क्रिकेटच्या भविष्यातील मोठ्या बदलाची नांदी मानली जात आहे. वैभव सूर्यवंशी हे नाव केवळ कर्णधारपदासाठी नाही, तर त्याच्या स्फोटक फलंदाजीसाठी ओळखले जाते.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्‍वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)